22

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

- लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
- डॉ. टी. एस. भोसले • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर


स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.


- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४०७


- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various
  Spheres at National and International Levels


- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com



- © S.R.I.



- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ** : स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 39 - 2

- **पृष्ठसंख्या** : १७१

- **मूल्य : ₹ २५०/–**
  **$ 4**

*वैश्विक पातळीवर विविध प्रकारच्या भूमिका*
*यशस्वीरित्या करणाऱ्या, चैतन्यमयी असणाऱ्या,*
*आपल्या कार्यकर्तृत्वाची मोहोर उमटविणाऱ्या*
***सर्व पुरुष कर्तृत्वांना...***
*आदरपूर्वक सस्नेह अर्पण.*

**– संपादक**

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... **– संपादक** / ७
१. यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान **डॉ. पी. बी. पाटील** / ९
२. प्रतिसरकार संस्थापक, समाजसुधारक क्रांतिसिंह नाना पाटील **डॉ. राजेंद्र सोनावले** / १६
३. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान **डॉ. सचिन चव्हाण** / १९
४. ...तरीही आगरकर उरतात ते कोणते? **डॉ. शीतल पाटील** / २५
५. कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या निर्मितीत मा.यशवंतराव चव्हाण व लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे योगदान **प्रा. डॉ. विश्वनाथ पवार** / २९
६. सातारचे प्रतिसरकार : स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील एक सुवर्णपान **प्रा. डॉ. अशोक खाडे** / ३४
७. कॅप्टन रामभाऊ लाड : तुफानी स्वातंत्र्यसेनानी **प्रा. डॉ. गौरी पाटील** / ३९
८. स्वातंत्र्यसैनिक रामचंद्र विठ्ठल पुदाले (सूर्यवंशी) यांच्या जीवनकार्याचा आढावा **प्रा. प्रतिभा पुदाले** / ४६
९. क्रांतिकारकांचे कृतिशील वारसदार : स्व.कॉम्रेड शिवाजी दौंडे (अण्णा) **प्रा. आशा मडावी** / ५०
१०. महात्मा जोतीराव फुले यांचे कृषीविषयक विचार आणि भारतीय शेतकऱ्यांच्या वर्तमानकालीन समस्या **प्रा. अनिता ममलय्या** / ५५
११. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य **प्रा. धनेश गवारी** / ६३
१२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे देशाच्या जडणघडणीतील योगदान **प्रा. युवराज साबळे** / ७२
१३. पुरोगामी विचारांचे सामाजिक सेवक – मा. व्ही. वाय. (आबा) पाटील **प्रा. सतीश मस्के** / ७७
१४. छत्रपती राजर्षी शाहू महाराज : सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष **प्रा. स्वाती मगदूम** / ८२

१५. व्यवस्थापनातील जागतिक गुरू – डॉ. सी. के. प्रल्हाद **प्रा. बबन पाटील** / ९०

१६. सावित्रीबाई फुले व समाज परिवर्तन **प्रा. सागर कुंडले** / ९४

१७. महात्मा जोतीराव फुले – कृतिशील समाजसुधारक **प्रा. दिलीप कोने** / ९९

१८. प्रेमचंद – साहित्यिक जीवन एवं साहित्य में योगदान **डॉ. काकासो भोसले** / १०५

१९. महान साहित्यकार रवींद्रनाथ टैगोर **डॉ. नितीन कुंभार** / १०८

20. Dr. Patangrao Kadam A Great Social Reformer & Educationalist **Dr. Tanaji Bhosale / 112** **Abhijit Mane**

21. Shashi Tharoor’s Contribution to Indian Novel in English **Dr. Ujjwala Patil / 116**

22. The Indian Statistician : Dr. Vasant Shankar Huzurbazar (1919-1991) **Dr. Neeta Patil / 121** **Ms. Priyanka Jirge**

23. Yashwantrao Chavan : A Literary Genius **Dr. Ashwini Tatugade / 127**

24. The Indian Biochemist : Har Gobind Khorana **Anita Mamlayya / 132**

25. The Legendary Tribal Freedom Fighter **Sneha Wagh / 141**

26. Noble Laureate Dr. John Bannister Goodenough, an outstanding Visionary, an Extraordinary Scientist! **Ms. Namrata Kamble / 145**

27. Contribution of Stephen Hawking’s in Physics **Mr. Prashant Kundalik / 150**

28. Sigmund Freud : The Father of Modern Psychology **Ms. Shubhangi Lavate / 154**

29. Karmaveer Bhaurao Patil : A legendary personality **Mr. Santosh Shinde / 164**

30. Dr. A. P. J. Abdul Kalam **Ms. Bhagyashree Jamadale / 168**

# पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने...

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान' या विषयावर एक आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद आयोजित करावी जेणेकरून अखिल विश्वातील पुरुष कर्तृत्वाच्या योगदानाबद्दल अनेकांना माहिती होईल या विचाराने प्रेरित होऊन आम्ही उपरोक्त विषयाबाबत चर्चा केली. तेव्हा लक्षात आले की वैश्विक पातळीवर विविध प्रकारच्या भूमिका यशस्वीरीत्या करणाऱ्या, सदैव चैतन्यमयी असणाऱ्या आणि आपल्या कार्यकर्तृत्वाची मोहोर उमटविणाऱ्या सर्व पुरुष कर्तृत्वाचे स्मरण करणे ही काळाची एक गरज आहे. केवळ सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणारेच स्मरणात राहतात असे नाही तर आपल्या घरासाठी रात्रंदिवस परिश्रम करणाऱ्या कर्त्या पुरुषापासून देशाचे रक्षण करणाऱ्या पुरुषांपर्यंत सर्वांचेच कार्य अलौकिक स्वरूपाचे असते. जो तो आपापल्यापरीने कार्यकर्तृत्व सिद्ध करीत असतो.

असेही म्हटले जाते की प्रत्येक यशस्वी स्त्री मागे एक पुरुष असतो. मग तो पिता, पती वा गुरू या भूमिकेतील असतो. म्हणूनच उपरोक्त विषयावर आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद ब्रिक्स वर्ल्ड ऑफ ट्रॅडिशन या संस्थेच्या अध्यक्ष मा. लुदमिला सेकाचेव्हा, रयत शिक्षण संस्थेची संपूर्ण महाराष्ट्रातील ४३ महाविद्यालये आणि स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्युट या तीन संस्थांच्या माध्यमातून ही परिषद आयोजित करण्यात आली आणि तिला भरघोस असा प्रतिसाद मिळाला.

या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे रयत शिक्षण संस्थेच्या प्रत्येक महाविद्यालयाचे स्वतंत्र पुस्तक प्रकाशित होत आहे. या प्रत्येक महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घालणारी ही घटना आहे. किंबहुना संस्थात्मक पातळीवर हा एक अभिनव प्रयोग महाराष्ट्रातच नव्हे तर जगाच्या पाठीवर कोठे झाला असेल असे वाटत नाही. त्यामुळेच आज १०३ वर्षांचा इतिहास असलेल्या रयत शिक्षण संस्थेने ब्रिक्स आणि स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्युट यांच्या सहकार्याने एक नवा अभिनव इतिहास निर्माण केला असे नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

या परिषदेला यशस्वी करण्यात सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक,

शिक्षकेतर सेवक आणि संशोधन करणारे विद्यार्थी यांचा प्रचंड सहभाग आहे. विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वावर आलेले शोधनिबंध एकत्रित करून अभ्यासकांच्या सोयीसाठी मराठी, हिंदी आणि इंग्लिश भाषेतील हे ग्रंथ प्रकाशित होत आहेत हे या परिषदेचे यश आहे.

या परिषदेला आभासी स्वरूपात महाराष्ट्राचे लोकप्रिय ज्येष्ठ नेते मा.ना. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या हस्ते या सर्व पुस्तकांचे प्रकाशन होत आहे हा आम्हाला मिळालेला वरदहस्तच आम्ही समजतो. तसेच मा. डॉ. अनिल अप्पासाहेब पाटील साहेब अध्यक्ष म्हणून लाभले. मा. लुदमिला सेकाचेव्हा या रशियाहून आल्या. त्यांच्याबरोबर दमित्री कुर्बातोव,अनस्तासिया शिकिटिना, दमित्री चिग्लीतसेव आणि राहुल शर्मा तसेच रशियाच्या मुंबई येथील कौन्सल ॲडव्हायजर मा.सर्गेई मेश्रिकोव आणि रयत शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांपैकी मा.श्री. राजेंद्र फाळके, मा. डॉ. विठ्ठल शिवणकर, मा.डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्‌घाटन सत्राचे प्रास्ताविक डॉ. स्नेहल तावरे आणि आभार प्रदर्शन डॉ. संजय नगरकर यांनी केले. मध्यंतराच्या सत्रामध्ये डॉ.एस.आर. ढेरे, डॉ.अरुण आंधळे, डॉ.के. एच. शिंदे, डॉ.कैलास जगदाळे, डॉ. एस. टी.साळुंखे, डॉ. के.जी.कानडे, डॉ. चंद्रकांत खिलारे,डॉ. टी.एन.घोलप, डॉ.मंजुश्री बोबडे, डॉ.ज्ञानदेव मस्के आणि डॉ.मोहन राजमाने या सर्व प्राचार्यांनी बहुमोल मार्गदर्शन करीत सर्व सत्रांचे आयोजन यशस्वीरित्या केले. समारोपाच्या सत्रामध्ये मॉरिशस येथील महात्मा गांधी इन्स्टिट्युटचे मराठीचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. गौरिया होमराजन आवर्जून आले आणि ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले. एस.एम. जोशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नानासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली या २३व्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषदेचा सांगता समारोप झाला.

महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधन करणारे विद्यार्थी आणि अनेक मान्यवर या परिषदेला आवर्जून उपस्थित राहिले या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

अभ्यासकांना पुरुष कर्तृत्वाच्या विविध पैलूंवर लिहिलेल्या शोधनिबंधातून एक वेगळी दिशा मिळेल आणि समाजप्रबोधनाच्या निर्मितीमध्ये आमचा हा खारीचा वाटा यशस्वी झाला या अतीव समाधानात आम्ही आपल्या सर्वांचे आभार मानतो.

**– संपादक**

# यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान

**– डॉ. पी. बी. पाटील**

**प्रस्तावना –**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रातील पुरोगामी विचारसरणीचे राजकीय नेते म्हणून प्रसिद्ध आहेत. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. याशिवाय राष्ट्रीय पातळीवरदेखील त्यांनी अनेक महत्त्वाची पदे भूाविली होती. यशवंतरावांचे संपूर्ण नाव यशवंतराव बळवंतराव चव्हाण असे होते. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी १२ मार्च, १९१४ रोजी झाला. त्यांचे शिक्षण देवराष्ट्रे, कऱ्हाड व कोल्हापूर या ठिकाणी झाले. यशवंतरावांच्या घरची परिस्थिती अतिशय गरिबीची होती. ते लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले, त्यामुळे त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्या आईवर येऊन पडली. साहजिकच, अतिशय खडतर परिस्थितीत त्यांना शिक्षण घ्यावे लागले होते. तथापि, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी आपले बी.ए.एलएल.बी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान यशवंतराव चव्हाणांनी मिळविला. या पदावर काम करताना एक उत्कृष्ट प्रशासक असा नावलौकिक त्यांनी मिळविला. महाराष्ट्रातील कृषी-औद्योगिक क्षेत्राच्या विकासाचा पाया घालण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी त्यांनी बजावली. महाराष्ट्राच्या राजकारणाला पुरोगामी वळण लावण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. याशिवाय महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी त्यांनी चांगल्या पद्धतीने केली होती.

२७ जून, १९७० ते १० ऑक्टोबर, १९७४ या काळात ते केंद्रीय अर्थमंत्री होते. तत्कालीन राजकीय परिस्थितीच्या रेट्यामुळेच १० ऑक्टोबर, १९७४ पासून त्यांच्याकडे परराष्ट्रव्यवहार खात्याचे मंत्रिपद देण्यात आले होते. २६ जून, १९७० रोजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी यशवंतराव चव्हाणांची अर्थमंत्रिपदी नियुक्ती केली आणि एका अर्थाने त्यांची कठोर परीक्षाच घेतली. याचे कारण असे की, १९६९-७० या काळात, आखाती राष्ट्रांनी एकत्र येऊन OPEC

(पेट्रोल निर्यातदार देशांची संघटना) स्थापन केली होती आणि प्रथमच आपल्या मक्तेदारी शक्तीचा वापर करून कच्च्या तेलांच्या किमतीत तब्बल अडीच पटीने वाढ केली होती. त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून भारतासह अनेक देशांत मोठ्या प्रमाणात भाववाढ होत होती. त्यात अन्य दोन गोष्टींची भर पडली होती. एकतर सलग तीन वर्षे भारताला मोठा दुष्काळ सहन करावा लागला होता. त्यामुळे अन्नधान्याचा तुटवडा, अन्नधान्यांची प्रचंड वेगाने होणारी भाववाढ सहन करत असतानाच पाठोपाठ लाखो निर्वासितांचा लोंढा पूर्व पाकिस्तानातून (बांग्लादेशातून) भारतात आला होता. या सर्वांची परिणती म्हणून अर्थव्यवस्था युद्धपूर्व स्थितीला आणणे, हे सर्वांत मोठे आव्हान त्यांना पेलावे लागले. १९७१ ते १९७४ या चार वर्षांतील अर्थ मंत्रालयाशी संबंधित असणारे विविध निर्णय व त्यासंबंधी त्यांनी वेळोवेळी संसदेत व्यक्त केलेले विचार व भाषणे यांमधून राज्यशास्त्र आणि कायदा यांतील पदव्या घेणाऱ्या साहेबांना अर्थशास्त्राचे मूलभूत व सम्यक ज्ञान होते, हे निर्विवादपणे दिसते. कठोर निर्णय घेण्याची क्षमता आणि त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जिद्द, हेही गुणविशेष त्यांच्या भाषणातून ठळकपणे दिसून येतात.

**कृषी औद्योगिक समाजरचनेचा ध्यास –** महाराष्ट्रामध्ये लहान लहान शेतकऱ्यांची आणि शेतीच्या लहान लहान तुकड्यांची संख्या जास्त व बागायती शेतीच्या तुलनेत कोरडवाहू शेतीचे क्षेत्र फार मोठे होते. अशा स्थितीत शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी प्रथम कृषी औद्योगिक समाजरचनेची कल्पना मांडली. शेतीला जोड व्यवसाय किंवा पूरक उद्योग जोडणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे महत्त्व मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना पटवून दिले. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना सूतगिरणी, भुईमुगाच्या उत्पादकांना सहकारी तेलगिरण्या, उसाच्या क्षेत्रात साखर कारखाने या माध्यमातून उद्योग, व्यवसाय आणि सहकारक्षेत्र यांचा नातेसंबंध जोडला. त्यासाठी आर. जी. सरय्या, वैकुंठभाई मेहता, डॉ. गाडगीळ आदींची मदत घेतली. थोडक्यात, मंत्रिमंडळ निर्णय घेत असताना, यशवंतरावांनी कधी समंजसपणा, तर कधी कधी जनहितासाठी कठोर भूमिका घेतली.

**कृषी औद्योगिक विकासाचे प्रारूप –** यशवंतरावांची दूरदृष्टी – महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक विकासाच्या यशवंतरावजींच्या प्रारूपमध्ये या दोनही क्षेत्रांचा समतोल व समन्वय विकास प्रक्रियेत आवश्यक होता. जागतिक पातळीवरदेखील १९८० नंतरच्या दशकात नेमका हाच विचार पुढे आला, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. १९८६ मध्ये नवी दिल्ली येथे भरलेल्या जागतिक अर्थशास्त्र परिषदेमध्येदेखील याच सूत्रावर आधारित चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यातच

यशवंतरावांच्या दूरदृष्टीचे दर्शन घडते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये शेती क्षेत्राचा वाटा कमीकमी होतो व तुलनेत दुसऱ्या टप्प्यात कारखानदारी क्षेत्राचा व नंतर सेवा क्षेत्राचा वाटा वाढत जातो. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत ही सकल राष्ट्रीय उत्पादनाची बदलती रचना गृहीत धरण्यात आली होती. सायमन कुझनेटस यांनी आपल्या केंब्रिज येथील प्रबंधामध्ये याची अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. तथापि, भारतासारख्या विकसनशील देशामध्ये विकासाच्या प्रारूपामध्ये अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचा समतोल अधिक योग्य ठरेल, अशी यशवंतरावांची भूमिका दिसते. अर्थात, जागतिक अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या परिप्रेक्षात त्यांनी आपल्या कृषिऔद्योगिक विकासाच्या प्रारूपाची मांडणी केली होती व त्याला सैद्धांतिक बैठक दिली होती, असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्राच्या, किंबहुना देशाच्या विकाससंबंधीची विकासनीती या देशातील उत्पादक घटकांच्या उपलब्धतेनुसार ठरवणे आवश्यक असून, विविध क्षेत्रांशी तिची सांगड 'सामान्य माणूस' केंद्रस्थानी मानून घातली पाहिजे, हा यशवंतरावजींचा विचार स्वानुभवातून पक्का झाला होता. या देशात भांडवलाची असणारी कमतरता लक्षात घेऊन, विकासप्रक्रियेमध्ये मोठी गुंतवणूक lumpiness of investment त्यांना अपेक्षित नव्हती. कृषीवर आधारित छोट्यामोठ्या उद्योगांचे जाळे तयार करून देशातील मनुष्यबळाला रोजगार देणे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अपरिहार्य आहे, यावर ते ठाम होते.

**कृषी औद्योगिकीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था** – यशवंतरावांनी महाराष्ट्रात कृषी औद्योगिक अर्थव्यवस्थेची पायाभरणी केली आणि शेती, उद्योगधंदे या क्षेत्रात समतोल साधण्याचा प्रयत्न केला होता. भांडवलदार व सधन शेतकरी यांच्या हितसंबंधातील तणावपूर्ण संतुलन साधण्यात यशवंतरावांनी यश मिळवले होते, पण त्यांच्या राजकीय वारसदारांना ते साधले नाही. शेतकी हितसंबंधांची त्यांनी हेळसांड केली आणि मराठा–कुणबी जातिसमूहांच्या केवळ संख्याबळावर भिस्त ठेवून औद्योगिक हितसंबंधांचीच पाठराखण केली. आज तर जागतिकीकरण–उदारीकरण–खासगीकरणाच्या रेट्याखाली नवभांडवलशाहीची तळी उचलणे भाग पडते, पण तसे केल्यास ग्रामीण महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे हितसंबंध धोक्यात येतात अशा शृंगापत्तीत काँग्रेस पक्ष अडकला असल्याचे स्पष्ट दिसते. शिवसेना–भाजप युतीचे काम त्यामानाने सोपे आहे. ते पक्ष औद्योगिक भांडवलदारीचे उजळ माथ्याने समर्थन करतात आणि संख्याबळ जोडण्यासाठी उन्मादी झुंडशाहीचे राजकारण करतात.

ज्या राज्यातील राज्यकर्ते १९९५ ते १९९९ या अपवाद वगळता सतत ग्रामीण शेतकी हितसंबंधांशीच संलग्न राहिले, तेथील शेतीची परिस्थिती दोलायमान

असावी यातील अंतर्विरोध स्पष्ट करताना सुहास पळशीकरांनी नोंदवलेली पुढील निरीक्षणे खूप बोलकी आहेत, मध्य प्रदेश, राजस्थान, ओरिसा यांच्याहून महाराष्ट्रातील शेतीचे दरहेक्टरी उत्पादन कमी आहे; (१००० किलोग्रॅमहून कमी). मात्र उसाविषयीचा राज्याचा अतिउत्साह कायम आहे. एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी जेमतेम तीन टक्के क्षेत्रात पिकणारा ऊस राज्यातील एकूण सिंचनापैकी निम्मे पाणी फस्त करतो. शेतीच्या एकंदर दुरावस्थेमुळे राज्याच्या एकूण उत्पादनातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा १९९९-२००० साली १७ टक्के एवढाच होता. राज्यात ३२ लाख सीमांत शेतकरी आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्यांपैकी ४५ टक्के भूमिहीन शेतमजूर असून, शेतजमिनीची मालकी विषम प्रमाणात विभागलेली आहे.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात बिगर-कृषी क्षेत्रावरच अवलंबून राहिल्यामुळे शेतकऱ्याची अवस्था चिंताजनक आहे. अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्र स्वावलंबी नाही. येथील शेतजमिनीचा दर्जा खालवलेला आले. १.७७ कोटी हेक्टर कसण्यायोग्य जमिनीपैकी केवळ १४.५ टक्के जमिनीवर सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यापैकी ५५ टक्के सिंचन विहिरींमुळे शक्य आहे. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतीला दुष्काळाचा अनेकदा फटका बसतो. परिणामी भूमिहीन शेतमजुरांना व छोट्या शेतकऱ्यांना स्थलांतर करणे अटळ होऊन बसते. नगदी पिकांना प्राधान्य दिल्यामुळे सिंचन सुविधांच्या वापरात असमतोल निर्माण होतो. परिणामी अनेक लोकांना कायम टंचाईच्या छायेत राहावे लागते. राज्याच्या विकासावर याचा गंभीर दुष्परिणाम होतो. राज्याचा विकास शहरकेंद्री व बिगरशेतीप्रधान झाला आहे.

महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रातील वाढीवर आणि उत्पादक रोजगारनिर्मितीवर जाचक बंधने पडली आहेत. राज्यात बेकारीचे प्रमाण मोठे असून, दोन तृतीयांशांना उदरनिर्वाहासाठी शेतीवरच विसंबून राहावे लागते. राज्याचे दरडोई उत्पन्न ग्रामीण भागात कमालीचे खालच्या पातळीवर आहे. त्यामुळेच महाराष्ट्राला बिगर कृषिक्षेत्राकडे रोजगारनिर्मितीसाठी वळावे लागते. महाराष्ट्राचा मोठा भाग अल्प उत्पन्नामुळे गरीब राहिला आहे. अन्नधान्याचा खप आणि दरडोई मिळणारे उष्मांक ही मोजपट्टी लावली तर निराशाच पदरी पडते. ग्रामीण व शहरी या दोन्ही भागांतील बहुतांश लोक आज कुपोषित असल्याचे आढळते. जमीन हाच राज्याच्या मालमत्तेतील महत्त्वाचा घटक असूनही मशागतीखालील जमिनीचा दर्जा खराब असल्यामुळे महाराष्ट्रात मोठ्या संख्येने भूमिहीन शेतमजुरांनी ग्रामीण भागातील बेरोजगारांत प्रचंड भर घातली आहे.

**बँकांविषयीचे धोरण –** राजकोषीय धोरणातील महत्त्वपूर्ण बदल, त्यांची आवश्यकता व त्या विषयाच्या त्यांच्या सखोल ज्ञानाची प्रचिती त्यांनी केंद्रीय

अर्थमंत्री म्हणून २५ मार्च, १९७१ व २७ मार्च, १९७१ ला लोकसभेत केलेल्या दोन आणि २९ मार्च, १९७१ रोजी केलेल्या राज्यसभेतील भाषणांतून येते. सतत आणि वेगाने होणारी भाववाढ हा त्या वेळचा ऐरणीवरील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न होता. तसेच, जुलै १९६९ मध्ये चौदा बँकांच्या राष्ट्रीयीकरणावरही देशभरातून उलटसुलट चर्चा होती. त्याचे प्रतिबिंब संसदेतील प्रश्नोत्तरांच्या तासात उमटत असे. राजकोषीय धोरण आणि त्या अनुशंगाने येणारी अन्य आर्थिक धोरणे यांचा एकत्रित विचार करावा लागेल, असे ठाम मत त्यांच्या भाषणातून व्यक्त गेले आहे. प्रचलित अर्थशास्त्राच्या सैद्धांतिक विवेचनातून मौद्रिक धोरण, राजकोषीय धोरण, विदेशी चलनाबाबतचे धोरण, तसेच औद्योगिक धोरण या सर्वांचा विचार करणे आवश्यक आहे, हे अलीकडील काळात मान्य करण्यात आले आहे. साहेबांना, याची नक्कीच जाणीव होती.

राष्ट्रीयीकृत बँकांच्या कर्मचाऱ्यांच्या संघटना आणि त्यांचे प्रश्न योग्य रीतीने मार्गी लावून देण्याचेही श्रेय अर्थमंत्री या नात्याने त्यांनाच दिले पाहिजे. राष्ट्रीयीकरणाचे ठाम समर्थक, अशीच त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती व ते त्यांनंतरच्या निर्णयांतून वारंवार प्रत्ययास येत गेले. बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर देशाच्या आर्थिक, सामाजिक विकासातील राष्ट्रीय बँकांची भूमिका नेमकी काय असावी, याचेही सुस्पष्ट विवेचन त्यांच्या विचारांतून दिसून येते. ११ व्या पंचवार्षिक योजनेची रूपरेषा मांडताना, सर्वसमावेशक वृद्धी (lnclusive Growth) ही संकल्पना प्रचलित करण्यात आली. परंतु, त्याआधी कितीतरी वर्षे प्राथमिकतेचे क्षेत्र व दुर्लक्षित समाजगट या दोन्ही संकल्पनांतून त्यांना तेच मांडावयाचे होते. लहान व सीमांत शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, ग्रामीण कारागीर, छोटे व्यावसायिक या सर्वांना अशा क्षेत्रांत बँकांनी सामावून घ्यावे व त्यांना एकूण कर्जाच्या किमान ४०% (चाळीस टक्के) इतका कर्जपुरवठा करण्याविषयी त्यांचा आग्रह होता. 'एकात्मिक ग्रामीण विकास योजना (IRDP),' अवर्षण प्रवणक्षेत्र योजना (DPAP) अशा विविध योजनांचे अप्रत्यक्ष श्रेय साहेबांनाच द्यावे लागेल.

राष्ट्रीयीकरणानंतरच्या बँकांच्या वेगवेगळ्या समस्यांची त्यांना परिपूर्ण माहिती होती. उदाहरणार्थ, बँकांचा १९६९ पूर्वीचा विकास व विस्तार हा शहरी भागांतच मर्यादित होता. त्यामुळे राष्ट्रीयीकरणानंतर ग्रामीण भागांत शाखाविस्तार होताना, शहरी भागांतील कर्मचारीवर्ग अशा नव्या शाखांत जाण्यास टाळाटाळ करीत असत. यावर थेट संसदेत प्रश्नोत्तरांच्या तासात बोलताना त्यांनी असा उल्लेख केला की, ग्रामीण भागांत गेलेले हेतूपूर्वक अकार्यक्षमतेने काम करतात, जेणेकरून अशा कर्मचाऱ्यांना शिक्षा म्हणून पुन्हा दिल्लीसारख्या शहरात परत पाठविण्यात येते. त्यामुळे शिक्षा देताना कर्मचारी खरेच अकार्यक्षम आहेत किंवा कसे, याची

खात्री करून घेणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी मांडले. राष्ट्रीयीकृत बँकांच्या धोरणात अनेक धोरणात्मक बदल १९७१ च्या निवडणुकीनंतर त्यांनीच घडवून आणले. वर उल्लेख केलेल्या एकात्मिक ग्रामीण विकास योजना, प्राधान्य क्षेत्रांना बँकांच्या कर्जाचा विशिष्ट वाटा, DRI (Differential Rate of Interest) विभेदी व्याजदर योजना, यांसारख्या अनेक योजनांचा पुरस्कार त्यांनी अर्थमंत्री या नात्याने केला होता. राष्ट्रीयीकृत बँकांच्या संदर्भातील आणखी एक प्रश्न म्हणजे या बँकांच्या संचालक मंडळावरील नेमणुका व त्यामधील राजकीय हस्तक्षेप. या प्रश्नांबाबत काही धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला होता.

**आंतरराष्ट्रीय आर्थिक नीती –** यशवंतराव चव्हाण अर्थमंत्री असताना (१९७०-१९७४) त्यांनी आंतरराष्ट्रीय चलनपद्धतीतील सुधारणांसंदर्भात घेतलेली भूमिका ही भारताच्याच नाही, तर सर्व विकसनशील देशांच्या अपेक्षा अतिशय समर्पकपणे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडल्या जाण्याचे त्या काळातील कदाचित एकमेव उदाहरण असावे. आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या संस्था, मग ती आंतरराष्ट्रीय नाणेनिधी असो, जागतिक बँक असो वा जागतिक व्यापारासंदर्भातील सर्वसाधारण करार असो, या सर्व बाबतींत विकसित राष्ट्रांचे वर्चस्व ही निश्चित अशी गोष्ट होती. अशा परिस्थितीत विकसनशील देशांचे प्रतिनिधित्व करीत, त्यांच्या समस्या मांडण्याचा प्रयत्न म्हणजे विकसित देशांच्या वर्चस्वाला, त्यांच्या दादागिरीला आव्हान देण्यासारखे होते. परंतु, यशवंतराव चव्हाणांनी असे धाडस केले होते. त्यांच्या भूमिकेचा अभ्यास केल्यास, त्यांच्या भूमिकेतील त्या अनुषंगाने येणाऱ्या प्रभावी मांडणीचा प्रत्यय येतो. आर्थिक बाबी, तसेच आंतरराष्ट्रीय चलनपद्धतीतील सुधारणा यांसारख्या क्लिष्ट व विकसनशील देशांच्या दृष्टीने संवेदनशील असणाऱ्या विषयावरील त्यांचा अभ्यास व ज्ञान प्रकर्षाने जाणवते.

**उत्पन्नविषयक राष्ट्रीय धोरण –** यशवंतराव चव्हाण हे वास्तवत: समाजवादाचे समर्थक होते. जवाहरलाल नेहरूंसारख्यांकडून लाभलेला समाजवादी विचारांचा वारसा त्यांच्या आर्थिक धोरणविषयक विचारांतून दिसून येतो. त्यांच्या मते, राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप उत्पादन घटकांच्या मर्जीनुसार होऊ दिले, तर मोठी अनावस्था निर्माण होईल. त्यामुळे त्यावर काहीतरी नियंत्रण हवेच. संपूर्ण जगभर उत्पन्नविषयक धोरणाचा स्वीकार होत असल्याचा दाखला देऊन, पूर्ण रोजगार, आर्थिक विकासाचा वाढता वेग, स्थिर किंमतपातळी आणि व्यवहारतोलातील समतोल या सर्वांत मेळ राखायचा असेल, तर उत्पन्नविषयक धोरण एक प्रभावी साधन असल्याचे मत त्यांनी मांडल्याचे निष्पन्न होते. गरिबी आणि विषमता या जुन्या प्रश्नांचाही सामना करण्यासाठी उत्पन्नविषयक धोरणाची आवश्यकता

त्यांनी अधोरेखित केली आहे. बेकारी कमी करण्याच्या उद्देशाने गुंतवणूक वाढविणे गरजेचे असल्याचे मत मांडून त्यांनी संघटित उद्योग क्षेत्राकडे प्रगतीची फळे सर्वांना चाखू देण्याच्या दृष्टीने गुंतवणूक वाढविण्याची अपेक्षा व्यक्त केल्याचे त्यांच्या विचारांतून प्रकट होते.

**समारोप –** ग्रामीण विकास हा आर्थिक विकासात भर घालणारा महत्त्वाचा घटक आहे. त्यामध्ये कृषी विकास आणि औद्योगिक समाजरचनेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रथम कृषी औद्योगिक समाजरचनेची कल्पना मांडली. शेतीवर आधारित जोड व्यवसाय किंवा पूरक उद्योग जोडणे आवश्यक असल्याने त्याला अधिक महत्त्व दिले. त्यातून त्यांनी सूतगिरण्या, तेलगिरण्या, साखर उद्योग इत्यादीच्या माध्यमांतून उद्योग, व्यवसाय आणि सहकार क्षेत्र यांचा नातेसंबंध जोडला. ग्रामीण भागात कृषी औद्योगिक वसाहती स्थापन झाल्यातर तेथे रस्ते, वीज, पाणीपुरवठा यांसारख्या सुविधा उपलब्ध होतील, आणि छोटे छोटे उद्योग सुरू करण्यास चालना मिळेल. शहरी भागात केंद्रित झालेल्या मोठ्या व मध्यम आकाराच्या उद्योगांना हे छोटे उद्योग पूरक ठरतील. मोठ्या व मध्यम उद्योगांतील उत्पादन विभागाचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागातील छोट्या उद्योगांकडे हे काम सोपविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**संदर्भ सूची –**


१. मानव विकास अहवाल : महाराष्ट्र २००२, १२५

२. व्ही. एस. क्षीरसागर : 'महाराष्ट्रातील समाजसुधारक, साहित्यिक, भारतीय विचारवंत व अन्य महनीय व्यक्ती', के. सागर पब्लिकेशन, पुणे.

३. यशवंतराव चव्हाण : 'युगांत', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

४. रामभाऊ जोशी : 'विरंगुळा', श्रीयशोदा प्रकाशन, पुणे.

५. प्रा. डॉ. जे. ए. पाटील : 'सह्याद्रीचा सूर्य', समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.

६. भास्कर लक्ष्मण भोळे : 'यशवंतराव चव्हाण राजकारण व साहित्य', साकेत प्रकाशन, औरंगाबाद

७. यशवंतराव चव्हाण : यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र 'कृष्णाकाठ', रोहन प्रकाशन, पुणे.

८. शरदचंद्र पवार : यशवंतराव चव्हाण यांची विधिमंडळातील निवडक भाषणे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

९. रा. तु. पाटील : यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी, राजेदेसाई प्रकाशन, कोल्हापूर.

# प्रतिसरकार संस्थापक,
# समाजसुधारक क्रांतिसिंह नाना पाटील

**– डॉ. राजेंद्र रघुनाथ सोनावले**

**गोषवारा –**

इतिहास म्हणजे गत अनुभवांचे पुनर्जीवन होय. इतिहासातील सर्वांत महत्त्वाचा इतिहास म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास होय. भारताच्या इतिहासातील अनेक महत्त्वपूर्ण घटनांमधील स्वातंत्र्याचा क्षण हा अतिशय महत्त्वपूर्ण आहे. १९ व्या शतकामध्ये भारताला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करणे गरजेचे होते. यासाठी अनेक व्यक्तिमत्त्वांनी आपले योगदान दिले होते. भारतीय स्वातंत्र्यसुधारणेचा वसा जपणारे व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक ठळक व्यक्तिमत्त्व म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील. प्रतिसरकारच्या माध्यमातून ग्रामीण जनतेत स्वातंत्र्याची मूल्ये रुजवण्याचे काम नाना पाटलांनी केले. महाराष्ट्रात प्रामुख्याने सांगली, सातारा भागात स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारे तसेच प्रतिसरकार हा समांतर शासनाचा एकमेव प्रयोग राबवणारे महान व्यक्तिमत्त्व म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील होय.

**जन्म –** नाना पाटलांचा जन्म ३ ऑगस्ट १९०० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील बोरगाव या ठिकाणी झाला. त्यांचे मूळ गाव सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील येडेमच्छिंद्र होय. त्यांचे मूळ नाव नाना रामचंद्र पिसाळ. पण त्यांचे वडील रामचंद्र पाटील हे गावचे पाटील म्हणून कार्यरत होते. लहानपणापासून नाना पाटलांना दणकट शरीरयष्टी लाभलेली होती. ते १९१६ साली सातवी परीक्षा उत्तीर्ण झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नानांनी काही काळ तलाठी म्हणूण नोकरी केली नंतर समाजकार्यासाठी त्यांनी नोकरीचा त्याग केला व १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी सहभाग घेतला. नानांवरती वारकरी संप्रदायाचा खूप मोठा प्रभाव होता.

**सामाजिक कार्य –**

ग्रामीण भागातील बहुजन समाजातील लोकांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेतले. हे क्रांतिसिंहांचे मोठे योगदान होते. लोकभाषेत प्रभावी भाषणे करून त्यांच्यात प्रेरणा उत्पन्न करण्याची हातोटी नानांकडे

होती. ग्रामीण जनतेला गुलामगिरीची जाणीव करून देऊन जनतेला धाडसी बनवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्यातील आत्मविश्वास जागृत करण्याचे कार्य नानांनी केले.

**स्वातंत्र्यलढ्यातील योगदान –**

क्रांतिसिंहांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान हे अतिशय महत्त्वपूर्ण होते. ब्रिटिश शासनाला समांतर अशी शासन यंत्रणा उभा केली पाहिजे असा नाना पाटलांचा विचार होता. 'आपला आपण करू कारभार' हे सूत्र त्यांनी इ. स. १९४२ च्या चलेजाव चळवळीत प्रत्यक्ष अमलात आणले. आपल्या देशाचा कारभार आपणच केला पाहिजे या जाणिवेतून प्रतिसरकारची संकल्पना नानांनी प्रत्यक्षात आणली.

**प्रतिसरकार –**

**प्रतिसरकारची पार्श्वभूमी–**

सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकाच्या पार्श्वभूमीचा इतिहास १९४२ चे चले जाव आंदोलन व सातारा जिल्ह्यात नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या भूमिगत आंदोलनात जाणवतो. चले जाव आंदोलनाच्या सुरुवातीला महात्मा गांधी व प्रमुख काँग्रेस नेत्यांना अटक झाल्यामुळे लोक संतप्त झाले. गांधीजी हे संपूर्ण देशाचे आराध्य दैवत असल्यामुळे 'करेंगे या मरेंगे' या मंत्राप्रमाणे संतापलेल्या जनतेने उत्स्फूर्तपणे जे करणे शक्य होते ते केले. आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी नाना पाटलांनी कुंडलला एक बैठक बोलावली आणि या बैठकीत जिल्ह्यामधील हे आंदोलन व्यापक करण्यासाठी तसेच लढायला दिशा ठरवून देण्यासाठी सर्वांना आदेश देण्याची जबाबदारी आम जनतेने कोणताही ठराव न घेता नाना पाटील यांच्याकडे सोपवली. नाना पाटील लढ्याचे सेनापती होते.

**प्रतिसरकारची स्थापना –**

१ जून १९४३ रोजी नाना पाटलांनी जिल्ह्यातील प्रमुख भूमिगत बैठक कामेरी येथील एका उसाच्या मळ्यात घेतली. बैठकीला नाना पाटील, नाथाजी लाड, किसन वीर, लक्ष्मण कासेगावकर वैद्य, जी. डी. लाड, पांडू तात्या बोराटे, बरडे मास्तर, नागनाथ नाईकवडी, भिकू नाना साळुंखे, डी. जे. देशपांडे, बापूजी पाटणकर, शेख काका, के. डी. पाटील, निवृत्ती पाटील, शंकरराव निकम इ. हजर होते. बैठकीत लढा तीव्र करण्यासाठी प्रतिसरकारची कल्पना एक मुखाने समंत करण्यात आली. प्रतिसरकाच्या कारभाराची धोरणे व कक्षा ठरविण्यात आल्या. प्रतिसरकारच्या रचनेचे तीन भाग होते – १) तुफान सेना २) ग्रामराज्य किंवा लोकराज्य ३) न्यायव्यवस्था

**प्रतिसरकारचे कार्य –**

शस्त्रधारी देशभक्त व भूमिगतांच्या गटापासून इंग्रजी राजवटीला मोठा धोका

आहे असे ब्रिटिशांना वाटत होते. त्यामुळे काट्याने काटा काढण्यासाठी ब्रिटिशांनी धंदेवाईक गुन्हेगारांच्या टोळ्यांना जवळ केले. सरकारचे त्यांना अभय मिळाल्यामुळे त्यांनी गांधी टोप्या घालून व महात्मा गांधीजींचा जयजयकार करीत दरोडे घालण्यास सुरुवात केली. त्यामुळे भूमिगतांची चळवळ बदनाम होऊ लागली आणि खबऱ्यांचा आणि फितुरांचा सुळसुळाट वाढू लागला. त्यामुळे लोक हवालदिल झाले. जनतेला या खादीधारी धंदेवाईक गुन्हेगारांपासून संरक्षण देणे, खबऱ्यांना व फितुरांना धडा शिकवण्यासाठी प्रतिसरकारने पत्री ठोकण्यास सुरुवात केली. देवराष्ट्र या यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मगावच्या पोलीस पाटीलास कुंडल गटाच्या नाथाजी लाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पत्र्या ठोकून खबऱ्यांना शिक्षा देण्यास सुरुवात केली.

**नाना पाटलांचे स्वातंत्र्योत्तर कार्य –**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नाना पाटलांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात आपला सहभाग नोंदवला. त्यांनी शेतकरी कामगार पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष या पक्षांच्या माध्यमातून कार्य केले. १९५७ मध्ये ते उत्तर सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले. १९६७ मध्ये कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार म्हणून ते बीड मतदारसंघातून लोकसभेत निवडून आले. संसदेत मराठी भाषण करणारे ते पहिले खासदार होय. २६ मे १९६६ साली मुंबईच्या शिवाजी पार्कमध्ये भरलेल्या सभेत आचार्य अत्रे यांनी नाना पाटील यांना 'क्रांतिसिंह' पदवी बहाल केली. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे ६ डिसेंबर १९७६ रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा येथे निधन झाले. शेतकऱ्यांशी संवाद साधणारे प्रभावी असे व्यक्तिमत्त्व व सर्व दीनदुबळ्यांचा आधार म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील हे सर्वांच्या मनामध्ये सदैव राहिले.

**सारांश –**

सर्वसामान्य घरातून उदयास आलेले सर्वसामान्यांसाठी झगडणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे नाना पाटील. सर्व जनतेच्या मनात स्वाभिमान व आत्मविश्वास निर्माण करून सर्व लोकांना स्वजाणीव करून देण्यासाठी क्रांतिसिंह नाना पाटील यांनी प्रयत्न केले.

**संदर्भ –**


१. आधुनिक भारताचा इतिहास –प्रा. डॉ. पी. एन. शिंदे व ए. जी. थोरात, फडके प्रकाशन.
२. सिंहगर्जना क्रांतिसिंह नाना पाटील यांची निवडक भाषणे– रा. तू. भगत, क्रांती वैभव प्रकाशन.
३. पत्री सरकार चरित्र व्यक्तिमत्त्व व चळवळ – प्राचार्य व. न. इंगळे.

# राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान

– डॉ. सचिन श्रीरंग चव्हाण

**प्रस्तावना –**

बहुजन समाजाच्या उद्धारासाठी शिक्षण ही एक गुरुकिल्ली आहे हे ओळखून शाहू महाराजांनी शिक्षणावर भर दिला. बहुजन समाज हा वर्षानुवर्षे शिक्षणापासून वंचित राहिला होता. बहुजन समाजाला शोषणमुक्त करण्यासाठी आणि त्यांचा विकास करण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे प्रभावी माध्यम नाही. म्हणूनच 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते. 'शिक्षण' हे समाजबदलाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे हे राजर्षी शाहूनी ओळखले होते. याकरिता त्यांनी प्राथमिक शिक्षणसक्तीचा आग्रह धरला. शिक्षण सर्वांसाठी खुले केले. शिक्षण हे सर्वांसाठी आणि सर्व प्रकारचे शिक्षण हा त्यांचा ध्यास होता. आपल्या प्रजेला शिक्षण मिळावे आणि शिक्षण देताना कुठल्याही प्रकारचा भेदभाव नको शाहू महाराजांना होता. तत्कालीन कालखंडात स्पृश्यास्पृश्य, गरीब – श्रीमंत, उच्च – नीच हा भेदभाव मोठ्या प्रमाणात होता तरीही शिक्षण देत असताना असला कोणताही भेदभाव न होता सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे हा त्यांचा मूळ हेतू होता. शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती, त्यांचे वेतन, यासाठी होणारा खर्च याकडे शाहू महाराज व्यक्तीशः लक्ष देत. संस्थानातून दिले जाणारे शिक्षण हे केवळ कागदोपत्री राहू नये याकडेही त्यांचा कटाक्ष होता. सर्व जाती धर्मांना एकत्र बांधणारी त्यांची शिक्षण व्यवस्था होती. शिक्षणाचा लाभ हा मुलांबरोबर अधिकाधिक मुलींनीही घ्यावा अशी त्यांची धारणा होती. महिलांनी शिक्षण घेण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले.

**सक्तीचे प्राथमिक शिक्षण –**

सर्वांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण मिळावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी चतु:सूत्री कार्यक्रम बनविला होता.

१. दलित आणि अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ असावे.
२. खेड्यापाड्यांतील विद्यार्थ्यांना शहरात वसतिगृहाची सोय करण्यात यावी.
३. समाजातील सर्व वर्गासाठी सक्तीचे प्राथमिक शिक्षण असावे, तसेच उच्च शिक्षणाचीही सोय करण्यात यावी.

४. समाजातील सर्व वर्गासाठी उपजीविकेसाठी आवश्यक असलेल्या शिक्षणाची आणी औद्योगिक शिक्षणाची सुविधा असावी.

राजर्षी शाहू महाराजांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला. तत्कालीन समाजात आलेली मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी किमान प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे दिले गेले पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. शिक्षणाशिवाय कनिष्ट वर्गाची ऐहिक आणि बौद्धिक गुलामगिरीतून सुटका होणार नाही हे जाणून महात्मा फुले यांनी समाजातील शूद्रातिशूद्र यांच्या मुलांसाठी शाळा तर काढल्याच; त्याचबरोबर सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे याकरिता पाठपुरावा केला. अशाच पद्धतीने शाहू महाराजांनी शिक्षणाची गरज ओळखून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.

समाजामध्ये शिक्षणाची बीजे रुजल्याशिवाय समजातून उत्तम शेतकरी, शिक्षक, व्यापारी, उद्योजक निर्माण होणार नाही त्याकरिता गोरगरिबांची मुले शिकली पाहिजेत, खेड्यापाड्यांमध्ये शिक्षण पोहचले पाहिजे, असे शाहू महाराजांचे मत होते. मागासलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्राथमिक शिक्षण सर्वांपर्यंत पोहचले पाहिजे, याकरिता शाहू महाराजांचे प्रयत्न सर्वतोपरी होते.

**मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा –**

राजर्षी शाहू महाराजांना संस्थानातील इतर खात्यांपेक्षा शिक्षण खात्याकडे त्यांचे औदार्य अधिक दिसून येते. मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आणि शिक्षणाचा पाया विस्तृत करण्यासाठी प्राथमिक शिक्षण सर्वांना सुलभ करून देणे महाराजानां जरूर वाटत होते. सार्वत्रिक शिक्षणाचा विचार अमलात आणण्यासाठी महाराजांना एक अभिनव प्रयोग केला. प्रत्येक खेड्यात एक शाळा स्थापन करण्याची व त्या शाळेत खेड्यातील बहुसंख्य असणाऱ्या समाजातून 'वतनी शिक्षक' नेमायचा अशी ती योजना होती. पण हा शाहू महाराजांचा प्रयत्न यशस्वी झाला नाही.

१९९७ साली शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात दमदार पाऊल टाकले. २४ जुलै रोजी काढलेल्या जाहीरनाम्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करायचे जाहीर केले. येत्या गणेशचतुर्थीपासून (३० सप्टेंबर) करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळातील फी सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या नियामावालीसाठी त्यांनी तीन ब्राह्मण शिक्षण तज्ज्ञांची समिती नेमली. त्याचबरोबर सक्तीच्या शिक्षणावर १ लाख रुपये खर्च करण्याचे जाहीर केले गेले, त्यापैकी ८० हजार रुपये दरबार खजिन्यातून तर २० हजार रुपये देवस्थान फंडातून खर्च होणार होते. प्रस्तुत रकमेतून खर्च होऊन

शिल्लक उरणारी रक्कम ट्रेनिंग कॉलेज, शाळांच्या इमारती, शिक्षणपयोगी साहित्य यावर खर्च होणार होती. यानंतर २१ सप्टेंबर १९१७ रोजी शिक्षणतज्ज्ञाच्या समितीने तयार केलेल्या नियमावलीवर आधारित असा, 'सक्तीच्या शिक्षणाचा कायदा' खास जाहीरनामा काढून प्रसिद्ध करण्यात आला. करवीर इलाख्यातील सर्व प्रजेला लिहिता वाचता येऊन आपली स्थिती सुधारण्यास समर्थ व्हावे, असा त्यांनी सक्तीच्या शिक्षणाचा हेतू स्पष्ट केला. शाहू महाराज केवळ शिक्षणासंदर्भात कायदा करून थांबले नाहीत तर या कायद्यान्वये शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठवण्याची आई बापांवर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठवली नाहीत तर त्यांना प्रत्येकी एक रुपया दर महिना दंड करण्याची तरतूद करण्यात आली.

**प्राथमिक शिक्षण कायद्याची अंमलबजावणी –**

प्राथमिक शिक्षण कायद्याच्या अंमलबजावणी मध्ये ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आल्या. ज्या ज्या गावात शाळेकरिता इमारती उपलब्ध नसतील तेथे गावातील चावडी, देवळे, धर्मशाळा यामध्ये शाळा भरू लागल्या. तर काही ठिकाणी शाळेकरिता इमारती बांधण्यात आल्या. अशाप्रकारे वर्षभरात संस्थानातील खेडोपाड्यांत ९६ शाळा सुरू केल्या. प्राथमिक शिक्षणाच्या अंमलबजावणी मध्ये ४ मार्च १९१८ रोजी चिखली या गावी शाहू महाराजांच्या हस्ते शाळेचे उद्घाटन केले. प्राथमिक शिक्षण कायद्याच्या अंमलबजावणीमुळे खेड्यातील पाऊण लाख लोकांपर्यंत शिक्षण पोहचले. हे शाहू महाराजांच्या शिक्षण कायद्याचे फलित होते.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे करत असताना त्यावर पैसा खर्च करणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे होते. शाहू महाराज आपल्या संस्थानातून प्राथमिक शिक्षणावर वार्षिक एक लाख रुपये खर्च करत होते. महाराजांनी हा पैसा संस्थानातील प्रत्येक घरावर एक रुपया अशा नाममात्र शिक्षण कराच्या रूपाने उभा केला. या एका रुपयात घरातील सर्व लहान मुलांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. समाजात इनामदार, सरंजामदार ही लोकं होती, त्यांनाही सामाजकार्यामध्ये समाविष्ट केले होते. त्यांच्या उत्पनावर शे. १० ते २० टक्के 'शिक्षणपट्टी' बसवली गेली. कालांतराने संस्थानातील वकील, सावकार, डॉक्टर व दरबारचे वरिष्ठ प्रतीचे अधिकारी यांच्यावरही 'शिक्षण – विषयक कर' बसवण्यात आला. अशाप्रकारे महाराजांनी प्राथमिक शिक्षणास भक्कम आर्थिक पाठबळ दिले.

**सक्तीच्या मोफत शिक्षणासाठी स्वतंत्र खाते –**

शिक्षणासंदर्भात घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र खात्याची तरतूद केली. प्रस्तुत खात्यावर 'डायरेक्टर' आणि 'एज्युकेशनल इन्स्पेक्टर'

या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. केवळ अधिकारी नेमून हे काम होणार नाही याची कल्पना त्यांना होती म्हणून हे खाते सतत माझ्या नजरेखाली असेल असे त्यांनी सांगितले होते. संस्थानातील मामलेदार - महालकरी, गावचे पाटील या सर्वांना या प्राथमिक शिक्षण चळवळीत सहभागी करून घेण्यात आले होते. खेड्यापाड्यांतील लोकांना मुले शाळेत पाठवावी म्हणून उद्युक्त करण्यात आले होते आणि जे शाळेत पाठवणार नाहीत त्यांना दंड करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दरमहा शाळेची तपासणी करणे आणि त्याचा अहवाल पाठवणे इत्यादीची जबाबदारी मामलेदार - महालकरी यांच्यावर सोपवली होती. गावच्या पाटलाने शाळा तपासणी करून शाळेत हजर असणाऱ्या मुलांची संख्या 'व्हिजिट बुकात' नोंद करण्याची सक्तीही त्यांच्यावर करण्यात आली होती.

**लवचिक आणि वास्तववादी धोरण -**

प्राथमिक शिक्षणाचे शाहू महाराजांचे हे धोरण लवचिक आणि वास्तववादी होते. शाळेमध्ये येणारी मुले हे शेतकऱ्यांची आणि कष्टकाऱ्यांची येणार होती, याची कल्पना महाराजांना होती. शेतामध्ये मुलांचा मोठा हातभार लागत असे त्यामुळे आई - वडील आपल्या मुलांना शाळेत पाठवायला तयार होत नसत. अशावेळी यावर उपाय म्हणून खेड्यातील शेतकऱ्यांच्या मुलांनी सकाळी आणि संध्याकाळी दोन तास शाळेत यावे व बाकीचा वेळ शेतकामात घालवावा अशी सवलत देण्यात आली. यावरून हेच स्पष्ट होते की, शिक्षण हे तळागाळातील सर्वांपर्यंत पोहचले पाहिजे हेच त्यांचे धोरण होते.

**स्त्री शिक्षणास प्रोत्साहन -**

कोल्हापूर संस्थानात स्त्रीविषयक दृष्टिकोन हा पुरोगामी होता. संस्थानात मुला - मुलींकरिता शाळा होत्या, त्याशिवाय खास मुलींच्याकरिताहि शाळा स्थापन केल्या होत्या. मुलींनी शाळेत येण्यासाठी व शिक्षण घेण्यासाठी त्यांना उत्तेजन दिले जात असत. मुलींनी शिक्षणात अधिक सहभाग घ्यावा यासाठी शिक्षकांच्यावर जबाबदारी दिली होती. मुलांच्या शाळेत पास होणाऱ्या मुलींच्या संख्येवर त्या शिक्षकाना खास इनाम दिला जात होता. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणासंदर्भात ही त्यांनी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले होते. मागासलेल्या जातीतील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या महिलांची राहण्याची व जेवणाची सोय ही दरबाराकडून केली जाणार होती. मुलींच्या उच्च शिक्षणाबाबत हि त्यांची दूरदृष्टी होती. राजाराम महाविद्यालायात शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले होते.

शाहू महाराजांनी आपल्या विधवा सुनेला शिक्षण देण्याप्रसंगी शाहू महाराजांना मोठा विरोध झाला होता. तो विरोध स्वीकारून त्यांनी इंदुमती देवीने शिक्षण घेण्याचा धाडसी निर्णय घेतला होता. आपल्या सुनेने सुसंस्कृत आणि स्वावलंबी

व्हावे यासाठी त्यांनी शिक्षणाचा आधार घेतला.

**व्यावसायिक शिक्षण –**

शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणाचा आपल्या संस्थानात पाया घातला. स. न १९०३ मध्ये त्यांनी कोल्हापुरात 'ओब्रायन टेक्निकल स्कूल'ची स्थापना केली. तेथे वेगवेगळ्या उद्योगांसाठी त्यांनी शिक्षणाची व्यवस्था केली. व्यावसायिक शिक्षण सर्वांना मिळाले तर समाजाची आर्थिक प्रगती होईल असे शाहू महाराजांचे मत होते. पुढे व्यावसायिक शिक्षणासाठी 'छत्रपती राजाराम मंदिर' सुरू केले.

**वसतिगृहाची स्थापना –**

खेड्यांतून शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्याची सोय व्हावी याकरिता वसतिगृहाची व्यवस्था करण्यात आली. या योजनेनुसार प्रत्येक जाती धर्मासाठी स्वतंत्र वसतिगृह निर्माण करण्यात आली. प्रस्तुत योजना राबत असताना शाहू महाराजांनी न्यायमूर्ती रानडे आणि नामदार गोखले यांच्याशी विचारविनिमय केला होता. प्रत्येक जाती धर्मासाठी वसतिगृह निर्माण केल्यामुळे फायदा हा झाला की, एकाच विचाराची एकाच थरातील मुले एकजुटीने शिकू लागली. या वसतिगृहाचेच फलित म्हणजे या वसतिगृहातून कर्मवीर भाऊराव पाटील, बाळासाहेब देसाई, जे. पी. नाईक, पी. सी. पाटील, दत्ता देशमुख यांसारखे दिग्गज लोक बाहेर पडून समाजामध्ये नावारूपाला आली.

**समारोप –**

शिक्षणामुळेच समाज बदलू शकतो यावर शाहू महाराजांचा विश्वास असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रावर आपले लक्षकेंद्रित केले. शिक्षणामुळेही समाजातील जातिभेद नष्ट होतील ही दूरदृष्टी त्याच्याकडे होती. शिक्षणामुळे औद्योगिक व आर्थिक बदल होतील यामुळे शिक्षण हे सर्वांकरिता मोफत आणि सक्तीचे केले हे त्यांचे धोरण महत्त्वपूर्ण होते. संस्थानामध्ये सुधारणा या केवळ कागदोपत्री आणणे हे त्यांचे ध्येय नव्हते तर सुधारणा या तळागाळात झाल्या पाहिजेत आणि सर्व प्रजा त्यामध्ये समाविष्ट असली पाहिजे हा सर्वसमावेशक हेतू त्यामागचा होता.

**संदर्भ –**


१. पवार जयसिंग – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर
२. कीर धनंजय – राजर्षी छत्रपती शाहू , मुंबई, १९७९
३. भगत. रा. तु. – राजर्षी शाहू : शिक्षणविषयक विचार आणि कार्य, कोल्हापूर, १९८१
४. सूर्यवंशी गो. कृ. – इंदुमती राणीसाहेब, पुणे , १९७६
५. तोफखाने वा. द. – राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग, कोल्हापूर, १९६३
६. लट्ठे आ. बा. – श्री शाहू छत्रपती यांचे चरित्र, कोल्हापूर, १९२५

# ...तरीही आगरकर उरतात ते कोणते?

**– डॉ. शीतल चंद्रकांत पाटील**

**प्रस्तावना –**

१४ जुलै १८५६ ते १७ जून १८९५ असे जेमतेम ३९ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या आगरकरांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आज सव्वाशे वर्षांनंतरही आगरकर उरतात ते कोणते? त्याकरिता प्रथम हे लक्षात घ्यायला हवे की, त्यांचे नेमके योगदान काय होते. तत्कालीन कालखंडात आगरकरांच्या आधीही आणि नंतरही अनेक विचारवंत होऊन गेले, प्रत्येकाचे कार्यक्षेत्र वेगळे होते, प्रत्येकाची भूमिका वेगळी होती. या सर्वांमध्ये आगरकरांनी म्हणावे असे स्वतंत्र व मानाचे स्थान आहे.

आगरकरांनी आपल्या सुधारणावादी तत्त्वज्ञानाने समाजातील सर्वच दोषांची चिकित्सा केली. आपल्या उदारमतवादी विचारांनी महाराष्ट्राच्या विचारविश्वाला नवी दिशा दिली. आगरकरांचे जीवनचरित्र पहिले तर ते फार आकर्षक नाही. सातारा, अकोला, रत्नागिरी व पुणे या चार ठिकाणी त्यांनी शिक्षण घेतले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. शिष्यवृत्ती, बक्षिसे मिळवून छोटी – छोटी कामे करून त्यांनी आपले एम. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. 'आई उभा जन्म देशसेवेला वाहीन' आणि 'गुरुजी, तुमच्यासारखाच एम.ए. होईन तरच नावाचा आगरकर' असे तेजस्वी उद्गार त्यांनी विद्यार्थिदशेतच काढले होते ते पुढे आले आहेत. 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार' हा त्यांचा बाणा मात्र आयुष्यभर जोपासला.

**सुधारणा – सुधारक**

आगरकरांच्या एकूण कार्याचा गाभा हा 'सुधारणा' हा होता. तत्कालीन कालखंडात सामाजिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी सुधारणा हा शब्दप्रयोग रूढ झाला होता. आगरकरांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून सातत्याने समाजातील दोष दाखवून त्यावर प्रखर हल्ले चढवले. जानेवारी १८८१ ते ऑक्टोबर १८८७ या काळात 'केसरी' तर ऑक्टोबर १८८८ ते १८९५ ता काळात 'सुधारक' या साप्ताहिक वृत्तपत्राचे ते संपादक होते. या दोन्हीकडे त्यांना प्रत्येकी पावणेसात

वर्षे मिळाली. ही दोन्ही वृत्तपत्रे त्या काळातील (नेटीव) देशी वृत्तपत्रांमध्ये आघाडीची मानली जात होती. आगरकरांची १४ वर्षांची पत्रकारिता महाराष्ट्रावर ठसा उमटवून गेली. पत्रकारितेच्या मूल्यांचा गाभा कसा असावा हे जाणून घेण्यासाठी आजही 'सुधारक'मधून लिहिलेली त्यांची पत्रे महत्त्वाची वाटतात. त्यांचे केसरी व 'सुधारक'मधील लिहिलेले निबंध हे आजच्या काळातील तरुण पिढीने वाचलेच पाहिजेत, असे त्यांच्या लिखाणाचे महत्त्व आहे.

**धर्म –**

तत्कालीन कालखंडात धर्माचा पगडा हा जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर होता. कोणत्याही सामाजिक सुधारणेला मोडायचे ठरले तर आधी संघर्ष करावा लागायचा. तो धर्म संकल्पनेशी कधी की खावे – प्यावे याचे नियमन असो, वेशभूषा असो, देशी वा विदेशी प्रवासाचे निर्बंध असोत, जातीत परजातीत रोटी बेटी व्यवहार असोत, कोणत्याही कामासाठीचे शुभ –अशुभ मुहूर्त असोत याबाबतचे नियंत्रण असो, जन्मापासून मृत्यूपर्यंतचे व्रतवैकल्य असोत या सर्व ठिकाणी 'धर्म' ही संकल्पना असायची. याबरोबर धर्म या संकल्पनेतून 'स्त्रिया' सुटल्या नाहीत. स्त्रियावर अनेक निर्बंध होते. स्त्रियांचे व तळाच्या समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकसमूहाचे सर्वांत जास्त शोषण केले जात होते. त्या सर्वांचा कडवा विरोध करणाऱ्यामध्ये आगरकर प्रमुख होते.

धर्म या संकल्पनेने व्यक्तीचे जीवन व्यापले होते. एखादी सुधारणा धर्माच्या आड कशी येत आहे किंवा त्या सुधारणेला धर्म कसा अनुकूल आहे याची चर्चा करणारा एक उपप्रवाह होता. त्याबरोबर मूळचा धर्म असे सांगत नाही नंतर हे त्यामध्ये चुकीचे समाविष्ट केले आहे असे म्हणणारा एक उपप्रवाह होता. धर्मात त्यावेळी आणि आजही काही गोष्टी चुकीच्या आहेत असे म्हणणारा एक उपप्रवाह होता, उच्चवर्णीय लोकांनी धर्मावर कब्जा केला आहे, त्यांच्या कचाट्यातून धर्म सोडवला पाहिजे असे म्हणणारा एक उपप्रवाह होता आणि ग्लानी आलेला आपला धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारला पाहिजे असे म्हणणाराही एक वर्ग होता पण आपले जीवन योग्य – अयोग्य ठरवण्यासाठी धर्माची गरज नाही असे म्हणणारा उपप्रवाह नव्हता, तो उपप्रवाह भविष्यात आकाराला येणार होता. त्यालाच सर्वाधिक प्रतिष्ठा मिळणार होती, त्याचे आद्य प्रवर्तक होते गोपाळ गणेश आगरकर.

**स्त्री–स्वातंत्र्य –**

आगरकरांनी स्त्री–स्वातंत्र्यासंदर्भात दोन दृष्टिकोनांतून पहिले. त्यातला पहिला दृष्टिकोन म्हणजे स्त्रियांना स्वातंत्र्य मिळण्याबरोबर 'स्त्री –पुरुष' संबधातील एक

पायाभूत भागीदार आहे म्हणून विवाहसंस्थेच्या अंतर्गत आणि बाहेरही स्त्री हा सार्वत्रिक घटक आहे. परंतु तो शोषक वर्ग आहे. हा शोषक वर्ग पुरुषसत्ताक व्यवस्थेला बळी पडलेला आहे. या वंचित व दबलेल्या वर्गाचा विचार व्हायला हवा, यातून तिची मुक्तता हवी, ती होण्याची गरज आहे.

आगरकरांच्या स्त्री–स्वातंत्र्याच्या विचारामध्ये 'स्त्री'ला मनुष्य म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे हा मुख्य गाभा आहे. त्यातून पहिला प्रश्न उपस्थित होतो तो, 'स्त्री'चे मनुष्यत्व मान्य करण्याचा आजवर स्त्रियांच्या स्थितीचा विचार केला असता 'स्त्री'ला एक निर्जीव वस्तू आणि प्रजोत्पादनाच साधन म्हणूनच तीच्याकडे पाहिले आहे. अनेक धर्मपरंपरांनी स्त्रीला मनुष्यत्वाचा दर्जाच नाकारला आहे. आजवर स्त्रियांना दुय्यम दर्जाच दिलेला आहे. ज्या प्रथा स्त्रीला दुय्यम दर्जा देतात त्यावर आगरकर आपल्या लेखणीने कठोर टीका करतात. स्त्रीचे वस्तूकरण, विद्रूपीकरण या प्रथांसंदर्भात आगरकर आपल्या लेखणीने प्रखर हल्ला चढवतात.

आगरकरांच्या एकूण सुधारणेत स्त्री–सुधारणेला महत्त्वाचे स्थान आहे. स्त्री सुधारणेसंदर्भात आगरकरांची चर्चा ही समता आणि विवेकवादावर आधारित येते. पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये पुरुषी वर्चस्वातून स्त्री मुक्त झाली पाहिजे विवाहसंस्था व कुटुंबसंस्था यांमधून होणारे स्त्रीचे शोषण थांबले पाहिजे. स्त्रीला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा लाभली पाहिजे, त्याशिवाय एक व्यक्ती म्हणून तिला स्वातंत्र्यही प्रदान केले पाहिजे अशी आगरकरांची भूमिका होती.

**विवेकवाद –**

विवेकवाद हे आगरकरांच्या विचारांचे वैशिष्ट्य आहे. आगरकरांचा विवेकवाद हा पश्चात तत्त्वज्ञानावर आधारित होता. प्रस्तुत विवेकवादाचा हेतू हा व्यक्तिविकासाकरिता विवेकवादावर आधारित सुधारणा घडवून आणणे हा होता. प्रत्येक गोष्ट बुद्धीच्या जोरावर तपासून पहिली पाहिजे हे विवेकवादाचे विशेष होते. आगरकरांच्या मते, मनुष्य सत्य असत्याच्या शोध हा विवेकाच्या आधारे करतो. बुद्धिमत्ता आणि विवेक हे माणसाच्या मनाचे धर्म आहेत. आगरकरांच्या विवेकवादाची प्रामुख्याने दोन वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. पहिले असे की, अमानवी आचार आणि कर्मकांडावर कोरडे ओढणारा होता आणि दुसरा इंग्रजी शिक्षणातून सुधारणेची जी तत्त्वे हिंदुस्थानात आली त्यातील बहुतेक सर्व स्वीकारणीय आहेत आणि त्याचा स्वीकार केल्यानेच आपल्या समाजात सुख व सामर्थ्य यांची प्राप्ती होईल, असा आगरकरांचा ठाम विश्वास होता.

एकंदरीत आगरकरांचा विवेकवाद हा व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या विविध प्रथा, परंपरा इत्यादीची चिकित्सा करणारा आणि व्यक्तिस्वातंत्र्याला

अधिकाधिक वाव देणारा होता.

**शिक्षणविषयक विचार –**

समाजसुधारणेच्या चळवळीत शिक्षणाचे महत्त्व ओळखून प्रत्यक्ष कृती करणारे समाजसुधारक म्हणून आगरकरांचे नाव घ्यावे लागते. आगरकरांनी शिक्षणासंदर्भात विचार मांडताना लोकशिक्षण ही संकल्पना मांडली. लोकशिक्षणाचा ते व्यापक अर्थ ते स्पष्ट करतात. ज्यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये स्पष्ट होतात. प्रस्तुत मूल्ये ही आजही विचारात घेण्यासारखी आहेत. लोकशिक्षण हे उच्चप्रतीचे किंवा धंदेशिक्षण नव्हे जे लहानापासून मोठ्यापर्यंत, गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांना रोजच्या व्यवहारात उपयोगी पडेल. जे शिक्षण बुद्धीचा विकास करणारे असेल. प्राथमिक शिक्षण दिले नाही तर पालक दंडास पात्र ठरतील. प्रजेस ज्या वयात जे जे शिक्षण पाहिजे ते ते सरकारने दिले पाहिजे, त्यासाठी लागणारा खर्च सरकारने आनंदाने केला पाहिजे. यावरून आगरकरांची शिक्षणासंदर्भातील उदारमतवादी संकल्पना स्पष्ट होते.

**जातिसंस्थेचा धिक्कार –**

आगरकरांनी जातिसंस्था आणि अस्पृश्यता यांना विरोध केला. समाजातील प्रचलित वर्णव्यवस्थेला त्यांनी विरोध केला. आगरकरांना समता व सामाजिक न्याय या तत्त्वावर आधारित समाज अपेक्षित होता. जातिसंस्थेमुळे हिंदू समाज पोखरला गेला आहे म्हणून जातिसंस्था उद्ध्वस्त केली पाहिजे व नव समाजाची उभारणी केली पाहिजे असे त्यांचे मत होते. जातिभेदामुळे स्पृश्य अस्पृश्य असा भेद होतो यावर त्यांनी कडक शब्दांत टीका केली आहे. शूद्र वर्ग ज्यावेळी उदारमतवादी शिक्षण घेऊन सज्ज होईल तेव्हा तो या सर्व व्यवस्थेविरोधात बंड करून उठेल हे आगरकरांचे वक्तव्य म्हणजे विसाव्या शतकातील दलित चळवळीच्या उद्याचे भाकीत आहे असेच आज म्हणावे लागेल. जातिव्यवस्थेतील भेदभावावर सार्वत्रिक शिक्षण हा महत्त्वाचा उपाय आहे असे आगरकरांचे मत होते. पाश्चात्त्य शिक्षण हे कोणत्याही विशिष्ट जातीसाठी नव्हते तर ते सर्वांना खुले होते. म्हणून शिक्षणाच्या आधारे विवेक प्रस्थापित होऊन हा भेदाभेद नष्ट होईल.

**समारोप –**

कर्ते सुधारक म्हणून ओळख असलेल्या गोपाळ गणेश आगरकर यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. उदारमतवादी विचारांच्या आधारे महाराष्ट्राला नवसंजीवनी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आगरकर यांनी केले. वर्षानुवर्षे जातिसंस्था, धर्म यामध्ये अडकलेल्या समाजाला उदारमतवादी विचारांच्या आधारे बाहेर काढण्याचे कार्य आगरकर यांनी केले. स्त्रियांची उन्नती,

स्त्रियांना स्वातंत्र्य, सर्वसमावेशक शिक्षण, जातिसंस्थेचा धिक्कार, विवेकाचा आधार, स्वातंत्र्य, समता बंधुता या मूल्यावर आधारलेली समाजव्यवस्था इत्यादी उदारमतवादी तत्त्वज्ञानाच्या आधारे आगरकर उरतात ते कोणते हे लक्षात येते. त्यांनी मांडलेल्या उदारमतवादी तत्त्वज्ञानाची आजही तितकीच समाजाला गरज आहे हे यावरून आगरकर उरतात ते कोणते हे आजच्या पिढीला समोर येते.

**संदर्भ सूची –**


१. आधुनिक भारतीय राजकीय प्रवाह आणि अंत:प्रवाह – प्रा. डॉ. अशोक चौसाळकर
२. विवेक आणि न्याय – मे. पु. रेगे
३. टिळक आणि आगरकर यांचे राजकीय विचार – डॉ. अशोक चौसाळकर
४. गणेश आगरकर – स. मा. गर्गे
५. आगरकर विचार – भा. ल. भोले

# कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या निर्मितीत मा. यशवंतराव चव्हाण व लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे योगदान

**– प्रा. डॉ. विश्वनाथ पवार**

**प्रास्ताविक –**

कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या निर्मितीत मा. यशवंतराव चव्हाण व लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान आहे. मानवी संस्कृतीचा विकास नद्यांच्या काठी झाला आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत पाणी आणि समाज यांचे नाते अतूट राहिले आहे. भारतीय इतिहासात पर्जन्यास देवता समजले आहे. आणि कोयना तर महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी ठरली आहे. यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, कर्मवीर भाऊराव पाटील, आचार्य प्र. के. अत्रे, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, कॉम्रेड डांगे इत्यादी मराठी नेत्यांच्या अथक प्रयत्नातून आणि अभियंत्यांच्या कुशल योगदानातून कोयना प्रकल्प साकारला गेला. १०५.२५ टी.एम.सी. पाणीसाठा होऊ लागला. १९६० मेगावॅट वीज निर्माण होऊ लागली. ऊर्जेच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्राची स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू झाली. महाराष्ट्राचा औद्योगिक व कृषी विकास घडून आला. महाराष्ट्राची ऊर्जेच्या दृष्टिकोनातून स्वावलंबनाकडे वाटचाल झाली.

**हेतू–उद्देश –**

१. कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीबाबतची माहिती मिळविणे.

२. कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या निर्मितीत मा. यशवंतराव चव्हाण व लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे योगदान अभ्यासणे.

३. कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या टप्पेनिहाय वीजनिर्मितीचा आढावा घेणे.

४. महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीमध्ये कोयना जलविद्युत प्रकल्पाचे योगदान अभ्यासणे.

**कोयना प्रकल्पाची उभारणी –**

दि. १९ जानेवारी, १९५४ रोजी कोयना जलविद्युत टप्पा – १ व मुख्य धरणाच्या बांधकामाचे भूमिपूजन झाले. दि. १ नोव्हेंबर १९५६ रोजी यशवंतराव

चव्हाण द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. एप्रिल १९५७ मध्ये मुंबई विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका होऊन यशवंतराव चव्हाण पुन:श्च मुख्यमंत्री झाले. त्यांनी कोयना प्रकल्प तातडीने मार्गी लावण्यासाठी बांधकाम खाते बाळासाहेब देसाई यांच्याकडे दिले. यशवंतराव चव्हाण यांची मुत्सद्देगिरी व बाळासाहेब देसाई यांच्या कार्यतत्परतेमुळे कोयना प्रकल्प पूर्णत्वास जाऊन जून १९६९ मध्ये जलाशयात पाणी साठविण्यास सुरुवात झाली.[१]

कोयना प्रकल्पातील पहिल्या जनित्राचे उद्‌घाटन दि. १६ मे १९६२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते व ना. बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. याच दिवशी राज्यपाल डॉ. पी. सोबरायन यांचे हस्ते कोयना जलाशयाचे नामकरण 'शिवाजी सागर' असे करण्यात आले.[२]

**कोयना जलविद्युत टप्पेनिहाय वीजनिर्मिती –**

कोयना प्रकल्पाच्या चारही टप्प्यांत धरणातील पाणी अवजड बोगद्यातून दाबवाहिन्यांच्या माध्यमातून प्रचंड वेगाने विद्युत जनित्रावर सोडले जाते. यामुळे सर्वांत खालच्या पातळीवर असणारी टर्बाइन्सची चाके फिरतात. यामुळे त्यातला अक्ष (ॲक्सिस) फिरतो अक्षामुळे त्याच्यावरील रोटर फिरतो. रोटरच्याभोवती स्टॅटर असतो. त्याच्या सभोवती लोहचुंबक असते. सर्वांत वरच्या टप्प्यावर विद्युत जनित्र असते ते कार्यान्वित होऊन विद्युतनिर्मिती होते. कोयना विद्युतगृहामध्ये झडपगृह, सयंत्रगृह व रोहितगृह अशी विस्तीर्ण दालने आहेत. विद्युत गृहाच्या स्वीच यार्डमधून २२० के.व्ही.च्या तारेद्वारे ग्रीडला विद्युतपुरवठा केला जातो. कोयना प्रकल्पात टप्पेनिहाय होणारी वीजनिर्मिती पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| टप्पा १ व २ | पोपळी | – ६०० मे. वॅट |
| टप्पा ३ | अलोरे | – ३२० मे. वॅट |
| टप्पा ४ | तांबटवाडी | – १००० मे. वॅट |
| धरण पायथा विद्युतगृह | | – ४० मे. वॅट |
| कोयना प्रकल्प एकूण वीजनिर्मिती | | – १९६० मे. वॅट[३] |

महाराष्ट्राची एकूण जल विद्युतनिर्मिती ३२९५.८३ मे.वॅट एवढी आहे. यामध्ये कोयना प्रकल्पाची वीज १९६० मे.वॅट आहे. महाराष्ट्राच्या जलविद्युत निर्मितीत कोयनेचे प्रमाण ५९.४७ टक्के आहे.[४]

**कोयना जलविद्युत प्रकल्प व महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती –**

ग्रामीण भागाचे विद्युतीकरण : कोयनेचे वीज उत्पादन सुरू झाले आणि पश्चिम महाराष्ट्र व कोकण इथल्या वाड्या–वस्त्यांवर विजेचे जाळे निर्माण करण्यास सुरुवात झाली. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने ग्रामीण पायाभूत सुविधा वाढविणे व घरांचे विद्युतीकरण करणे यासाठी मार्च २००५ मध्ये राजीव गांधी ग्रामीण

विद्युतीकरण योजना कार्यान्वित केली. यामुळे महाराष्ट्रातील जी खेडी विजेपासून वंचित होती त्यांना वीज मिळाली. महाराष्ट्र राज्याच्या सन २०१०-२०११ च्या वार्षिक योजनेच्या माहितीनुसार ३६०१० गावांचे विद्युतीकरण झाले आहे. तर ३७६ गावांचे विद्युतीकरण व अपारंपरिक पद्धतीने करणे बाकी आहे.[५]

गोव्यालाही महाराष्ट्राप्रमाणेच कोयनेची वीज उपलब्ध करून दिली जाईल याबाबतचे धोरण कोयनेच्या पहिल्या विद्युत जनित्राचा शुभारंभ करताना तत्कालीन मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांनी जाहीर केले. त्यानुसार कार्यवाही होऊन गोमंतक कोयनेच्या विजेने प्रगतिपथावर गेला.

**औद्योगिक प्रगती -**

पंडित नेहरूंचा औद्योगिकीकरणावर भर होता. सन १९४७ ते १९६४ पर्यंत आपल्या पंतप्रधान पदाच्या कालखंडात मा. नेहरूंनी औद्योगिक विकासाला प्राधान्यक्रम दिला. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून मोठी धरणे, विद्युत प्रकल्प, अवजड उद्योगधंदे, दळणवळण यांचा विकास केला. सन १९५३ मध्ये कोयना प्रकल्पाचा पहिल्या पंचवार्षिक योजनेत समावेश झाला. कोयनेसारखा बहुउद्देशीय प्रकल्प साकारल्याने महाराष्ट्र अन्न, पाणी, वीज याबाबत स्वयंपूर्णतेच्या मार्गावर आला. हे सर्व योग्यवेळी स्वीकारलेल्या औद्योगीकरणाच्या धोरणांमुळे शक्य झाले.

देशाच्या अर्थव्यवस्थेला गतिमानता देणाऱ्या पायाभूत सुविधा या महत्त्वाच्या आहेत. यामध्ये ऊर्जा हा अत्यंत महत्त्वाचा घटक होय. जलविद्युत प्रकल्प, औष्णिक विद्युत प्रकल्प, अणुऊर्जा प्रकल्प, अक्षय ऊर्जा इत्यादींपासून ऊर्जा मिळते. महाराष्ट्रात जलविद्युत प्रकल्पातून एकूण ३२९५.८३ मे.वॅट वीज निर्माण होते. पैकी कोयना जलविद्युत प्रकल्पातून १९६०मे.वॅट वीज निर्माण होते. हे प्रमाण एकूण जलविद्युतच्या ५९.४७ टक्के एवढे प्रचंड आहे.

कोयनेच्या विजेमुळे मुंबई, कोकण व पश्चिम महाराष्ट्राचा औद्योगिक विकास झाला. मुंबईतील कारखाने गतिमान झाले. मुंबईची लोकल ट्रेन अव्याहतपणे धावू लागली. कोयनेच्या विजेमुळेच विद्यानगरी म्हणून ओळखले जाणारे पुणे विद्येबरोबर औद्योगिक नगरी म्हणून पुढे आले. महाराष्ट्रात अनेक कारखाने उभे राहिले. कापड उद्योग, खाण उद्योग, लोह उद्योग यांची प्रगती झाली. परिणमत: रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या. दवाखाने, विमानतळ, डॉकयार्ड इत्यादींना अखंडपणे वीजपुरवठा उपलब्ध होऊ लागला. महाराष्ट्राच्या विजेबाबत तुलनात्मक अभ्यास करता सन १९६०-६१ मध्ये एकूण वीजनिर्मिती ३२६८ द.ल.कि.वॅट (तास) होती. पैकी औद्योगिक वापरासाठी १८५३

द.ल.कि.वॅट घरगुती वापरासाठी २६० द.ल.कि.वॅट एवढा मर्यादित वापर होता. सन २००८ – ०९ मध्ये विजेची एकूण निर्मिती ८३००८ द.ल.कि.वॅट (तास) एवढी झाली. यामध्ये औद्योगिक वापरासाठी २८८५० द.ल.कि.वॅट तर घरगुती वापरासाठी ६८७८ द.ल.कि.वॅट विजेचा वापर केला जात आहे. राज्यातील उद्योग विश्वाच्या 'संवेदना' जपण्याचे काम कोयना प्रकल्पाने केले आहे.[६]

**महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार –**

कोयनेसारखा बहुउद्देशीय प्रकल्प साकारल्याने महाराष्ट्र अन्न, पाणी, वीज याबाबत स्वयंपूर्णतेच्या मार्गावर आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला गतिमानता देणाऱ्या पायाभूत सुविधा या महत्त्वाच्या आहेत. यामध्ये ऊर्जा हा अत्यंत महत्त्वाचा घटक होय. कोयनेच्या विजेमुळे मुंबई, कोकण व पश्चिम महाराष्ट्राचा औद्योगिक विकास झाला. मुंबईची लोकल ट्रेन अव्याहतपणे धावू लागली. कोयनेच्या विजेमुळेच विद्यानगरी म्हणून ओळखले जाणारे पुणे विद्येबरोबरच औद्योगिक नगरी म्हणून पुढे आले. पश्चिम महाराष्ट्र साखर पट्टा म्हणून ओळखला जावू लागला. महाराष्ट्रात कापड उद्योग, खाण उद्योग, लोह उद्योग यांची प्रगती झाली. परिणामत: लक्षावधी लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

कोयना धरणाची उपलब्धता ही आधुनिक महाराष्ट्राची ओळख बनली आहे.

**निष्कर्ष –**

१. बहुउद्देशीय कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणात वीज मिळाली.
२. कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे महाराष्ट्रात उद्योगधंदे वाढीस लागले.
३. कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था गतिमान झाली.
४. कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र व गोमंतक यांचा औद्योगिक विकास झाला.
५. कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे कापड, खाण, लोह या उद्योगात प्रगती झाली.
६. कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे लक्षावधी लोकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या.

**सारांश –**

कोयना प्रकल्पाच्या उभारणीत मा. यशवंतराव चव्हाण, मा. बाळासाहेब देसाई, कर्मवीर भाऊराव पाटील, आचार्य अत्रे, ना. ग. गोरे, कॉम्रेड डांगे व कुशल अभियंत्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. कोयना प्रकल्पामुळे १९६० मेगा वॅट

वीज निर्माण होऊ लागली.

कोयना धरणाची उपलब्धता ही आधुनिक महाराष्ट्राची ओळख बनली. महाराष्ट्राची औद्योगिक व कृषी क्षेत्रात अभुतपूर्व प्रगती झाली. उद्योग विश्वाच्या 'संवेदना' जपण्याचे काम कोयना जलविद्युत प्रकल्पाने केले आहे.

**संदर्भसूची –**


१. पवार विश्वनाथ (संपा.) 'संशोधन' अंक दुसरा – ऑक्टोबर २०१२ बीजभाषण– संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सातारा जिल्ह्याचे योगदान – डॉ. भोसले अरुण, पृ. १६

२. कोयना प्रकल्प, माहितीपट, यशोगाथा माहिती केंद्र, कोयनानगर.

३. माहिती पुस्तिका, कोयना जलविद्युत प्रकल्प, पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र शासन.

४. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ. १३७, १३८.

५. कित्ता.

६. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, उपरोक्त, पृ. ४.

# सातारचे प्रतिसरकार : स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील एक सुवर्णपान

**प्रा. डॉ. अशोक श्रीरंग खाडे**

**गोषवारा –**

भारतीय स्वातंत्र्य समरांमध्ये ब्रिटिश शासन व्यवस्थेविरुद्ध भारताच्या विविध भागांत ज्या भूमिगत चळवळी उभ्या राहिल्या त्यामध्ये बंगाल प्रांतात मिदनापूर, उत्तर प्रदेशातील बलिया, बिहारमधील भागलपूर आणि महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकार यांचा उल्लेख करता येईल. सातारचे प्रतिसरकार आणि त्यांची भूमिगत चळवळ यांचे कार्य प्रशंसनीय असेच होते. ८ ऑगस्ट १९४२ मध्ये मुंबई येथे त्यावेळेचे गवालियाँ टँक म्हणजे ऑगस्ट क्रांती मैदान येथे तत्कालीन राष्ट्रीय काँग्रेस समितिचे अधिवेशन भरले. त्या अधिवेशनात म. गांधींनी क्रांतिकारी 'छोडो भारत' अशी पुढील आंदोलनाची घोषणा केली. म. गांधींनी लढ्याचे रणसिंग फुंकल्याचे समजताच नाना पाटलांनी भूमिगत राहून गनिमी पद्धतीने युद्धनीतीने ब्रिटिश सरकारशी क्रांतिकारी लढा देण्याचे ठरविले. प्रस्तुत लेखात क्रांतिसिंह नाना पाटील म्हणजेच सातारचे प्रतिसरकार आणि भूमिगत चळवळीच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**माहिती संकलन व संशोधनपद्धती –**

प्रस्तुत लेखासाठी प्राथमिक आणि दुय्यम माहिती उगमस्रोताचा उपयोग केलेला आहे. द्वितीय माहिती उगमस्रोत म्हणून विविध संदर्भ ग्रंथ तसेच ऑनलाइन पद्धतीने वेबसाइटद्वारे उपलब्ध असणारी माहिती संदर्भ म्हणून घेण्यात आलेली आहे. प्रस्तुत संकलित माहिती व त्या संदर्भातील लिखाण या लेखामध्ये विविध मुद्द्यांद्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे –** प्रस्तुत संशोधन लेखासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. भूमिगत चळवळ पूर्व परिस्थितिची माहिती घेणे.
२. भारतातील स्वातंत्र्य चळवळीमध्ये उभ्या राहिलेल्या भूमिगत चळवळीचा परामर्श घेणे.

३. सातारचे प्रतिसरकार व भूमिगत चळवळची कार्यपद्धती व सामाजिक कार्य समजून घेणे.

४. प्रतिसरकार की पत्री सरकार याचा परामर्श घेणे.

५. भूमिगत चळवळीचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान जाणून घेणे.

**स्वातंत्र्यपूर्व परिस्थिती –**

२३ जून १७५७ च्या प्लासीच्या लढाईने इंग्रजी राज्याचा या देशात पाया घातला गेला. भारतामध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन आपली सत्ता इ. स. १७५७ मध्ये स्थापन केली. भारतीय संस्थानिकांनी इ. स. १८५७ मध्ये भारतातील या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध पहिला उठाव केला. त्यानंतर भारतात राष्ट्रवादाचा उदय होऊन इ. स. १८८५ मध्ये 'भारतीय राष्ट्रीय' काँग्रेसची स्थापना झाली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटिशांच्या विरोधात स्वातंत्र्यासाठी चळवळ सुरू केली. हीच ती भारतातील स्वातंत्र्याची चळवळ म्हणून ओळखली जाते. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनची घोषणा करण्यात आली. म. गांधींनी जनतेला एक मंत्र दिला तो म्हणजे 'करा किंवा मरा' एक तर स्वातंत्र्य मिळवून राहू किंवा या प्रयत्नात प्राण देऊ.

**भारतातील भूमिगत चळवळी व त्यांचे कार्य –**

ऑगस्ट १९४२ मधील चले जाव चळवळीचा एक मोठा महत्त्वाचा विशेष असा म्हणजे या क्रांतीचा उठाव सार्वत्रिक होता. खेड्यापाड्यांतून लोक 'इन्कलाब जिंदाबाद'च्या व गांधींच्या घोषणा देत होते. कार्यक्रम स्वयंस्फूर्तीने पार पडत होते. भारतातील महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम, ओरिसा आणि दक्षिण हिंदुस्तान अशा सर्व प्रांतांत क्रांतीने उग्र रूप धारण केले होते. मुंबई येथील गवालिया टँक मैदानावर व शिवाजी पार्क येथे ९ ऑगस्ट १९४२ ला चळवळ सुरू झाली होती. भारतामध्ये अशा चळवळीमध्ये विविध क्षेत्रांतील व समाजातील अनेक घटक सहभागी झाले होते. विद्यार्थी या चळवळीत सामील झाल्यावर आंदोलनाची तीव्रता वाढली. सरकारी इमारती आणि कचेऱ्यावर हल्ले होऊ लागले. साताऱ्याकडील क्रांतिकाऱ्यांने प्रतिसरकार स्थापन करून साऱ्या देशात नाव कमावले.

**सातारचे प्रतिसरकार व भूमिगत चळवळ कार्यपद्धती –**

साताऱ्याच्या क्रांतिकारकांनी प्रतिसरकार स्थापन करून साऱ्या देशात नाव कमावले. याचे सर्व श्रेय सातारचा सिंह अर्थात क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांच्या विश्वासू सहकाऱ्यांना जाते. ज्यांनी या चळवळीमध्ये आपले संपूर्ण आयुष्य झोकून दिले, जीवन समर्पण केले आणि या स्वातंत्र्ययुद्धामध्ये आपल्या

प्राणांची आहुती दिली असे हे स्वातंत्र्य युद्ध होते. ज्यांचे खंबीर नेतृत्व लाभले ज्याचे हृदय जाज्वल्य देश प्रेमाने भारीत झालेले होते ते म्हणजे सातारचे प्रतिसरकार व त्यांची भूमिगत चळवळ. ही देशातील त्याकाळी अखंड चाललेली भूमिगत चळवळ होती. १९४२ च्या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे ब्रिटिशांविरुद्ध सामुदायिकरित्या कडवा विरोध झाला होता. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नेतृत्व त्यासाठी कारणीभूत ठरले होते. समाजातील शेतकरी, कष्टकरी कामगार, नोकरदार, महिला आणि दलित असे सर्वच स्तरांतील लोक त्यामध्ये सहभागी झाले होते. ब्रिटिशांना येथून हाकलून देणे हा त्यांच्या आंदोलनाचा पहिला टप्पा होता. मात्र ब्रिटिश येथून गेल्यानंतर रयतेचे राज्य निर्माण करणे हा त्यांचा दुसरा टप्पा होता. साताऱ्याची ही भूमिगत चळवळ संपूर्णपणे सकारात्मक होती. त्यामध्ये ग्रामस्वराज्य अपेक्षित होते. प्रतिसरकारच्यावतीने विविध मार्गाने लढा देण्याचे काम चालू होते. यामध्ये सरकार विरोधात गनिमी पद्धतीने लढा सुरू होता. सरकारी तिजोऱ्या लूट करणे, रेल्वेची लूट, सरकारी कचेऱ्यावरती मोर्चा, हरताळ करणे असे विविध मार्ग अवलंबिले जात होते या सर्वांमागे सरकारला जेरीस आणणे हा उद्देश होता.

**प्रतिसरकारऐवजी पत्री सरकार –**

१९४२ च्या आंदोलनाची वैशिष्ट्य म्हणजे ब्रिटिशांविरुद्ध सामुदायिक उठाव सुरू झाला. त्यासाठी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नेतृत्व कारणीभूत ठरले. गावागावातील सावकारी, टगीगिरी, जमीनदारी आणि मिरासदारी मोडून काढणे, त्यासाठी व्यापक मोहीम भूमिगत राहून गनिमी पद्धतीने चालू होती. यासाठी प्रतिसरकार कार्य करीत होते. त्यांना निर्व्यसनी, निर्भय व चारित्र्यसंपन्न समाज उभा करायचा होता. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्ह्यात जे उग्र आंदोलन झाले तसे देशाच्या अन्यत्र कुठल्याही भागात झाले नसेल. ऑगस्ट १९४२ ते १९४५ अशा तीन वर्षांमध्ये ब्रिटिशांची सत्ता या भागात शिल्लकच राहिली नव्हती. पोलीस व महसूल खात्याची जुलमी राजवट संपली होती. क्रांतिसिंहांच्या प्रतिसरकारचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे पर्यायी व्यवस्था उभे करणे हे होते. प्रतिसरकारने व्यसनाधीनता, दारू गाळणे, दारूबंदी व दरोडेखोरांना धडा शिकवला. क्रांतिसिंहांच्या भूमिगत चळवळीने व त्यांच्या तुफान सेनेने नाही इंग्रजांचे, नाही सावकारांचे, नाही जमीनदारांचे, नाही पोलिसांचे, आता इथे राज्य आहे ते जनतेचे असा स्पष्ट संदेश जनतेला ग्रामस्वराज्याद्वारे दिला होता. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्थापन केलेल्या प्रतिसरकारच्या बद्दल ब्रिटिश सरकारने अपप्रचार करून बैल किंवा घोड्याला नाल मारतात त्याप्रमाणे माणसाला पत्री मारतात असा गैरसमज त्यावेळी समाजात पसरविण्यास सुरुवात केली. परंतु

प्रति म्हणजे पर्यायी सरकारचे पत्रीसरकार असे नामकरण जाणूनबुजून केले गेले होते.

**स्वातंत्र्ययुद्धामध्ये भूमिगत चळवळीचे योगदान –**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये ८ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेसच्या खास अधिवेशनात ताबडतोब स्वराज्य मिळविण्यासाठी महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली लढा सुरू करण्याचा ठराव संमत झाला. पोलीस ठाणे सरकारी कचेऱ्या पोस्ट व तारा ऑफिस रेल्वे व रेल्वे स्थानके यांच्यावर संघटितपणे हल्ले झाले. बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि अनेक छोट्या छोट्या प्रदेशांतील शासनव्यवस्था कोलमडून पडली. उत्तर प्रदेशातील (बलिया) महाराष्ट्रातील (सातारा) बंगालमध्ये (मिदनापूर) व बिहार प्रांतात (भागलपूर) येथे भूमिगत सरकारी चळवळ स्थापन झाली. त्यानंतर ४२ च्या लढ्याचा बहर काही महिन्यांतच ओसरला त्यातून पुढे वर्ष दीड वर्षापर्यंत भूमिगत नेते आणि कार्यकर्ते हे विविध योजना अमलात आणण्याचा प्रयत्न करीत राहिले. परंतु याचा विशेष परिणाम शासन व्यवस्थेवर झाला नाही. छोडो भारत आंदोलनानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र होईपर्यंतचा कालखंड हा स्वातंत्र्य आंदोलनातील अखेरचा व मुख्यता सत्तांतराच्या दृष्टीने वाटाघाटीचा मुख्य कालखंड होता. यापुढे काही राजकीय घडामोडी होऊन ब्रिटिश पार्लमेंटमध्ये हिंदुस्थान स्वातंत्र्याचे विधेयक संमत करण्यात आले.

**संदर्भ –**


१. राघव शिवणीकर : सातारचा सिंह क्रांतिसिंह नाना पाटील–समग्र चरित्र, क्रांतिवैभव प्रिंटिंग प्रेस विटा पृ. १, ५५, ६९.
२. प्रा. डी. ए. माने : व्यर्थ न हो बलिदान, नयन प्रकाशन, विसापूर, पृ. ७१, ७६–७७ ७९.
३. डॉ. आबासाहेब शिंदे : सातारचे प्रति–सरकार: प्रसंग आणि व्यक्ती, उषा प्रकाशन १७८५, ए वॉर्ड, साकोली कॉर्नर, कोल्हापूर– ४१६०१२. पृ. ३१, ३७, ४४–४५.
४. वि. स. वाळिंबे : जयहिंद आझाद हिंद, मेहता पब्लिशिंग हाउस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे– ४११०३ पृ. ३१.
५. रा. तु. पाटील : क्रांतिसिंह नाना पाटील एक स्वयंभू ग्रामीण क्रांतिकारक, सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर. पृ. १३५ –१४३.
६. शिवाजी सावंत व राघव शिवणीकर : क्रांतिसिंहांची गावारान बोली, अनुबंध प्रकाशन, बालाजीनगर, दत्तमंदिर, पुणे– ४११०४३ पृ. ४७.
७. रा. तू. पाटील : क्रांतिसिंह नाना पाटील– जीवित आणि तत्त्वज्ञान, सन्मित्र प्रकाशन, १७९, फुलेवाडी, कोल्हापूर–४१६०१० पृ. ४७.
८. अप्पासाहेब लाड : क्रांतिसिंह नाना पाटील, निर्मिती विचारमंच नेर्ली–तामगाव

रोड उजळाईवाडी (ता. करवीर) कोल्हापूर, मुखपृष्ठमागील फोटोग्राफ, पृ. ७०, ७१, ११२,११७-१२३.

९. ॲड. सुभाष पाटील : क्रांतिसिंह नाना पाटील- सामाजिक आणि राजकीय वाटचाल, क्रांतिवैभव प्रकाशन, हणमंतवडीये पृ. ३०-३९.

१०. प्रा. डॉ. विकास कदम, प्रा. डॉ. सुखदेव शिंदे, प्रा. डॉ. राजेंद्र रासकरः आधुनिक भारताचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर, पृ. १३४.

# कॅप्टन रामभाऊ लाड : तुफानी स्वातंत्र्यसेनानी

**– प्रा. डॉ. गौरी राहुलकुमार पाटील**

**परिचय –**

कॅप्टन रामभाऊ लाड यांचा जन्म १९२२ साली सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात कुंडलसारख्या खेड्यात झाला. दुर्दैवाने घरच्या परिस्थितीमुळे फारसे शिक्षण घेता आले नाही, ही कसर भाऊंनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सहवासाने भरून काढली. वडिलोपार्जित शेती व्यवसाय करत असताना किर्लोस्करवाडीच्या किर्लोस्कर कारखान्यांमध्ये कामगार होण्याची संधी त्यांना मिळाली. १९४२ साली ऐतिहासिक स्वातंत्र्यसंग्राम चले जावच्या घोषणेने सुरू झाला, इतिहास प्रसिद्ध ३ सप्टेंबर १९४२ च्या तासगाव मोर्चामध्ये भाऊ सहभागी झाले व किर्लोस्कर कंपनीच्या नोकरीचा त्याग करून त्यांनी सेवा दलामधील गांधीगिरी स्वीकारली. तेव्हापासून भाऊंनी मागे वळून पाहिलेच नाही १९४२ साली पेटलेल्या स्वातंत्र्यसंग्रामाचा यज्ञकुंड देशभर शांत होत आहे असे वाटत असताना साताऱ्यातील क्रांतिकारकांनी हा यज्ञकुंड अखंड धगधगत ठेवला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाऊंनी साताऱ्यामध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध दंड थोपटून बंड केले व स्वतःचे स्वतंत्र पत्रीसरकार (प्रतिसरकार) स्थापन केले.

भाऊंना लहानपणापासून खेळाची आवड होती, त्यातही लाल मातीतील कुस्ती म्हणजे जीव की प्राण. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी असताना १९५७ साली आज अस्तित्वात असलेले आजचे कुंडलचे महाराष्ट्र मैदान उभे करण्यासाठी भाऊंनी अतोनात कष्ट घेतले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र मैदान असे नाव त्यांनीच दिले होते. आजचे महाराष्ट्र मैदानाचे स्वरूप सर्व महाराष्ट्रभर नव्हे तर देशभर कीर्तिमान झाले आहे यामध्ये भाऊंचा सिंहाचा वाटा होता. भाऊ हे एक उत्तम दर्जाचे कुस्ती समालोचक होते. भाऊंनी फील्ड मार्शल जी. डी. बापू लाड व नागनाथ नायकवडी यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य तरुणांना संघटित करून स्वतःचे तुफान सैनिक दल निर्माण केले त्या तुफानांना प्रशिक्षण देणारे भाऊ कॅप्टन होते. स्वातंत्र्योत्तर काळात भाऊंनी शेतकरी कामगार पक्षाचा झेंडा हातात घेऊन संघर्षाचा मार्ग चौखळताना श्रमिकांची साथ सोडली नाही. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात ही

सक्रिय भागीदारी केली. स्वातंत्र्य चळवळीतील प्राणाची कुर्बानी करणारा प्रसंग असो किंवा रझाकार विरोधी संघर्ष असो, गोवामुक्ती संघर्ष, सीमा लढा अथवा संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असो किंवा शेका पक्षाच्या व्यासपीठावरील कष्टकरी जनतेचे लढे असो; छातीवर गोळी, लाठी, काठी घेण्याची तयारी ठेवून आपल्या पहाडी आवाजाने रंगदार मराठमोळ्या भाषेत चळवळ संघटित करण्यात भाऊ आघाडीवर राहिले. प्रचंड संघटन कौशल्य धारदार आणि ताकदवान प्रतिभासंपन्न वाणीच्या जोरावर हजारो मित्र संघटित करून स्वातंत्र्यपूर्व काळात तुफान सैनिक जमा करण्यासाठी बेळगावपासून अमरावती नागपूरपर्यंत महाराष्ट्राच्या सर्व भागांत अहोरात्र पायपीट केली. स्वातंत्र्योत्तर काळात विधायक कामाचा दृष्टिकोन डोळ्यांपुढे ठेवून कुंडल नागरी सहकारी पतसंस्था, कुंडल दूध उत्पादक सहकारी संस्थेची स्थापना करून विकासाची नवीन दालन उघडली. कुंडल परिसरातील पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी यथाशक्ती भागीदारी केली. अशा तऱ्हेने प्रचंड त्याग, तपश्चर्या, प्रतिभा आणि तत्त्वनिष्ठेच्या जोरावर कळसाला पोहोचण्याची उंची असताना नि:स्पृह त्यागी वृत्तीने त्यांनी श्रद्धेपोटी आयुष्यभर पायाचा दगड होण्यातच भाऊंनी समाधान मानले.

कुंडल या गावचे नाव उच्चारले तरी एका जाज्वल्य इतिहासाचा स्मरण होतं. स्वातंत्र्यलढ्यातील एका देदीप्यमान पर्वाची आठवण होते. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील १९४२ नंतर अखेरच्या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये या गावाने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात निर्माण झालेल्या प्रतिसरकारचा इतिहास अभिमानास्पद आहे. संपूर्ण भारतभरात अशाप्रकारे अनेक प्रति सरकारे त्या त्या स्वातंत्र्य सेनानींनी निर्माण केली, परंतु ऐतिहासिक दखलपात्र कामगिरी करणारी मोजकीच प्रतिसरकारे होती. स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी निर्माण केलेले प्रतिसरकार या प्रतिसरकारास जर्मनी, जपान यांसारख्या देशांनीही मान्यता दिली होती, परंतु सुभाषबाबूंचे हे प्रतिसरकार मुख्य भारतभूमीच्या बाहेर निर्माण झाले होते. आझाद हिंद सेनेचा 'कोहिमा' विभागात पराभव झाला आणि खुद्द सुभाषबाबूंच्या दुर्दैवी अपघातानंतर तसेच जपानच्या पराभवानंतर या प्रतिसरकारचे अस्तित्व संपुष्टात आले. बंगालमधील क्रांतिकारांनी 'मिदनापूर' या ठिकाणी ब्रिटिश सत्तेविरुद्ध प्रतिसरकार निर्माण केले. या प्रतिसरकारनेही सत्तेला जबरदस्त हादरा दिला परंतु दुर्दैवाने बंगालमध्ये भीषण दुष्काळ पडला. सर्वसामान्य माणसांचे जगणेच यातनामय झाले, त्यामुळे या क्रांतिकारकांना जनसामान्य आश्रय देण्यात असह्य झाले. त्याचबरोबर ब्रिटिश सत्तेची दमननीती यामुळे अवघ्या वर्षभराच्या कालावधीत प्रतिसरकारची ही चळवळ मोडून काढण्यात ब्रिटिशांना यश आले. त्याचवेळी उत्तर प्रदेशातील 'बलिया' या ठिकाणच्या क्रांतिकारकांनीही

ब्रिटिश सत्तेविरुद्ध आपले प्रतिसरकार निर्माण केले होते. ब्रिटिशांनी फोडा आणि जोडा नीती वापरून व आपले सर्व कष्ट वापरून या प्रतिसरकारची चळवळही आठ महिन्यांत मोडून काढली.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एकमेव प्रतिसरकार मोडून काढण्यात ब्रिटिश सत्तेला अपयश आले ते प्रतिसरकार होते 'सातारचे प्रतिसरकार' हे प्रतिसरकार निर्माण झाल्यापासून तब्बल ४६ महिने आपले अस्तित्व दिमागदारपणे टिकवून होते. या प्रतिसरकारने बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याला सातारी पाणी पाजले. अफगाणी पठाण यांचे बंड दडपून टाकण्यात यशस्वी झालेल्या गिल्बर्टसारख्या महत्त्वाकांशी अधिकाऱ्याला या कामगिरीसाठी खास नियुक्त करण्यात आले होते, परंतु त्यालाही सातारची प्रतिसरकार चळवळ दडपून टाकता आली नाही. या सातारा प्रतिसरकारची राजधानी होती कुंडल. कुंडलगाव म्हणजे स्वातंत्र्याच्या विचाराने पेटलेल्या ध्येयनिष्ठ आणि त्यागी कार्यकर्त्यांचे मोहोळ. कुंडल गावामध्ये शे-दीडशे युवक आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात आपले सर्वस्व झोकून सहभागी झाले होते. या युवकांमध्ये आघाडीचे युवक म्हणून कॅप्टन रामचंद्र श्रीपती लाड (भाऊ) होत. प्रतिसरकारचे प्रणेते प्रेरणास्थान संस्थापक म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील, त्यांचा मुक्काम या संपूर्ण कालखंडात कुंडलमध्ये असायचा. त्यांना प्रेरणास्थानी आणि गुरुस्थानी मानून सर्वस्वाच्या लढ्यास सज्ज असणारी जिवावर उदार झालेली जी पिढी होती त्यांचे म्होरके होते क्रांती अग्रणी जी.डी. लाड बापू, क्रांतिवीर नाथाजी लाड त्यांच्या साथीला असणारे बिनीचे शिलेदार म्हणजेच राम, श्याम, व आकाराम आणि असंख्य कुंडलवासी व परिसरातील युवक. सातारा प्रतिसरकारची सरकार म्हणून आवश्यक असणारी सर्व यंत्रणा सिद्ध होती. त्यांची स्वतंत्र मुलकी व्यवस्था होती, स्वतंत्र न्यायव्यवस्था होती. त्यांच्या अंमलबजावणीसाठी स्वतःची स्वतंत्र सैनिकी व्यवस्था होती. विशेष म्हणजे स्वतःची अशी स्वतंत्र घटना होती. सैनिक व्यवस्थेच्या निर्मितीसाठी तुफान सेना होती. या सेनेच्या प्रमुखपदाची जबाबदारी रामचंद्र श्रीपती लाड ऊर्फ भाऊ यांची होती, त्यांच्या जोडीला होते श्याम लाड, आकाराम लाड, बाबा मिरगे असे अन्य साथीदार. सातारा प्रतिसरकारच्या यशस्वितेचे रहस्य हे या क्रांतिकारकांना जनतेच्या असलेल्या प्रचंड सहानुभूतीमध्येच होती. ही सहानभूती मिळवण्यासाठी क्रांतिसिंह नाना पाटील यांनी त्यापूर्वी या विभागात २२ वर्षे स्वतःला झोकून देऊन काम केले, लोक माणसे तयार केली. इथल्या नवयुकांना त्यांनी जो संदेश दिला, जो जगण्याचा मंत्र दिला त्यातून कॅप्टन भाऊंच्या सारखे तरुणांचे मोहोळ त्यांच्या भोवती जमा झाले.

कुंडल गावच्या पूर्वेला 'गौतम-गंगा' नावाचा ओढा वाहतो. या ओढ्याच्या

काठावर एका विस्तीर्ण वटवृक्षाखाली या प्रतिसरकारचा कारभार चालवण्यासाठी व्यायामशाळा बांधली होती. ही व्यायामशाळा म्हणजे प्रतिसरकारचे सचिवालय. सैनिक शिक्षकाचे शिक्षणाचे केंद्र होते, या व्यायाम शाळेत तरुणांना सर्व प्रकारचे शारीरिक शिक्षण दिले जात असे. त्याचबरोबर मानसिक, बौद्धिक, सामाजिक बांधिलकीचे ही शिक्षण येथे दिले जात असे. या तरुणांना शारीरिक शिक्षण देण्याचे जबाबदारी कॅप्टन रामचंद्र लाड (भाऊ) यांच्यावर सोपवली होती. परिसरातील १५ ते २० वयोगटातील तरुण या ठिकाणी जमवले जात. त्यांना लाटी-काटी चालवणे, शस्त्र चालवणे, कवायत, व्यायाम आणि शिस्त या सर्व प्रकारचे शिक्षण कॅप्टन भाऊ देत असत. हा तरुण केवळ शारीरिकदृष्ट्या तयार होऊन उपयोग नाही, तर मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या तयार झाला पाहिजे यासाठी शिबिरे घेतली जात. यामुळेच सातारा प्रतिसरकारमधील ही तरुणांची फौज नैतिक मूल्यांचा विचारही स्वातंत्र्याच्याच विचारा इतकाच महत्त्वाचा मानत होती. कॅप्टन भाऊंच्या मार्गदर्शनाखाली युवकांची सैनिकी फौज या प्रतिसरकारमध्ये लढण्यास सज्ज होती.

कॅप्टन भाऊ म्हणजे कुंडलमधील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा. शिक्षण ही बेताचेच, घरातील शेतीच्या कामाबरोबरच सुरुवातीला किलोस्करवाडी मध्ये किलोस्करांच्या कारखान्यातील एक कामगार त्यांना क्रांतिसिंह नाना पाटील, अप्पासाहेब लाड गुरुजी यांचा सहवास लाभला. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने व्हावे तसे नाना पाटलांच्या सहवासाने शेतकऱ्याच्या पोरगा एक कामगार, अव्वल दर्जाचा स्वातंत्र्यसेनानी झाला. या घटनेला अनन्य साधारण महत्त्व आहे. यासाठी मोजावी लागणारी किंमत, करावा लागणारा त्याग, घ्यावी लागणारी मेहनत हे कॅप्टन भाऊंनीच केले होते.

प्रतिसरकार ही ऐतिहासिक घटना आहे. त्यामध्ये सहभागी झालेला स्वातंत्र्यसेनानी हा इतिहास पराक्रमाने घडवला आहे. इतिहासाच्या मुशीमध्ये त्याची जडणघडण होत असताना हे सर्वजण तावून-सुलाखून निघाले आहेत. त्या ऐतिहासिक जडणघडणीचे कॅप्टन भाऊ हे वारसदार आहेत, त्यामुळे वैयक्तिक स्वार्थाचे कोणतेही हिशेब त्यांना जमले नाहीत. केवळ सामाजिक बांधिलकी जपणे हेच त्यांनी आपले कर्तव्य मांडले.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला तरी हैदराबाद संस्थानही स्वतंत्र होते, ते काही भारताचा भाग बनले नव्हते. त्यामुळे हैदराबादच्या निजामाचे रजाकार मराठवाड्यातील सामान्य माणसावर अत्याचार करीत होते. त्यांचा अनन्वित छळ करीत होते. अशावेळी आपल्या स्वातंत्र्याच्या आनंदाचा उपभोग घ्यायचा सोडून कॅप्टन भाऊ पुन्हा आपले निवडक सहकारी घेऊन, हातात शस्त्र

घेऊन मराठवाड्यातील जनतेच्या मुक्ततेसाठी त्यांच्या मदतीला धावून गेले. रजाकारांच्या बरोबर समोरासमोर अनेक प्रसंगी सशस्त्र लढाया केल्या. अनेक प्रसंग जिवावर बेतले गेले, काही सहकारी कायमचे जायबंदी झाले. शेवटी संपूर्ण मराठवाडा हैदराबाद संस्थानासह भारतात विलीन झाला. त्यानंतरच भाऊ आपल्या सहकाऱ्यांसह विजनवास संपवून स्वगृही आले. सातारा प्रतिसरकारच्या देदीप्यमान इतिहासाविषयी असे म्हटले जाते की ज्यांनी स्वपराक्रमाने इतिहास घडवला त्यांनी तो लिहिला नाही, ज्यांनी लिहिला तो बरोबर लिहिलाच नाही. भाऊंनी मात्र त्यांना शक्य झाले तसा हा इतिहास मूर्त स्वरूपात जिवंत ठेवण्याचे काम केले होते.

स्वातंत्र्यानंतर १९४७ साली शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. भाऊ पक्षाच्या संस्थापकांपैकी एक आहेत. उभी हयात त्यांनी शेतकरी कामगार पक्षात घालवली, शेकाप म्हणजे कार्यकर्ते तयार करणारी मुज आहे असे म्हटले जाते. भाऊंनी उभ्या आयुष्यात शेकडो कार्यकर्ते तयार केले. सार्वजनिक काम करीत असताना त्यांना अनेक वेळा संघर्ष करावा लागला; पण भाऊ कधी डगमगले नाहीत. त्यांचा हा सर्वांत मोठा गुण होता. सहकार्य करणे, भावाप्रमाणे प्रेम करणे हा त्यांचा स्वभाव होता. आपल्या नेत्यावर अतूट प्रेम करणे व त्यांच्यासाठी सर्वस्वच अर्पण करणे ही त्यांची शिकवण होती. १९४२ च्या रणसंग्रामावरती त्यांनी अनेक पुस्तके लिहिली फुले, शाहू, आंबेडकर हे त्यांचे आवडते विषय होते आणि त्याप्रमाणे ते आचरण करण्याचा प्रयत्नही करत होते.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली महाबळेश्वर येथे झालेल्या चळवळीच्या शिबिरानंतर महाराष्ट्रातील तरुण इंग्रजी सत्तेला विरोध करण्यास पेटून उठला. त्याला अपवाद सातारा जिल्हा तरी कसा असेल? सातारा जिल्ह्यातील अनेक तरुण स्वातंत्र्य चळवळीत झोकून देत होते, स्वातंत्र्यासाठी बलिदान देण्यास तयार होते, त्यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण सातारा जिल्ह्यातील क्रांती अग्रणी जी. डी. बापू लाड, कॅप्टन रामभाऊ लाड, नाथाजी लाड यांच्यासारखे तरुण एकत्रित आले. क्रांतिसिंह नाना पाटील, संत गाडगे महाराज हे युगपुरुष म्हणजे पुरोगामी विचारांचे धगधगते यज्ञकुंड होय. याच पुरोगामी विचारधारेत कॅप्टन भाऊंची जडणघडण झाली. रुढी, परंपरा, अंधश्रद्धा याविरोधी ते आपली मते परखडपणे मांडत. भारताला स्वातंत्र्य मिळाले, पण सामान्य कष्टकरी माणसाच्या वाट्याला स्वातंत्र्याची फळे चाखावयास मिळाली नाहीत. त्यांचे दारिद्र्य दूर झाले नाही याबद्दलची चीड ते पदोपदी व्यक्त करत. भाऊंनी जेव्हा शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला त्यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील, शंकरराव मोरे यांच्यामुळे शेतकरी कामगार पक्षाने हळूहळू अवघा महाराष्ट्र व्यापून टाकला होता. त्यावेळी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी अवघा महाराष्ट्र

ढवळून काढला त्यातच संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरू झाला.

नाना पाटील, आचार्य अत्रे, कॉम्रेड डांगे, एस. एम. जोशी, सेनापती बापट या मुलुख मैदानी तोफा सर्वत्र धडधडू लागल्या त्यावेळी मुंबई, बेळगाव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे या घोषणेने अवघा महाराष्ट्र पेटून उठला होता, त्यावेळी सरकारने अनेक नेतेमंडळींना तुरुंगात टाकले. या अटक सत्रात कॅप्टन राम लाड यांनाही अटक झाली, कारण तेसुद्धा या लढ्यात अग्रभागी होते. भाऊंच्या कार्याचा सरकारने धसका घेतला होता. भाऊ न डगमगता आपला विचार मांडत राहिले. लढ्याच्या अग्रभागी राहिले परिणामी नव महाराष्ट्राची निर्मिती झाली. १ मे १९६० रोजी सुवर्णदिन उगवला. महाराष्ट्र राज्य निर्माण झाले भाऊंच्या आयुष्यातील हा दुसरा सुवर्णक्षण होय. पहिला सुवर्णक्षण १५ ऑगस्ट होय, अशा प्रकारे १५ ऑगस्ट आणि १ मे या दोन्ही सुवर्णदिनाच्या निमित्ताने एका बीनीचे शिलेदार ते बनले होते.

भाऊंना जन्मजात अमृतवाणीची देणगी लाभली होती. आई वडिलांचे आदर्श संस्कार लाभले होते, पण भाऊंना शिक्षण मात्र घेता आले नाही. त्याचे कारण त्यांनी सांगून टाकले होते स्वभाव खोडकर असल्यामुळे शाळेच्या चार भिंतींत ते कधीच रमले नाहीत. वडीलभाऊ आकाराम लाड यांनी रामने शिकावे म्हणून खूप प्रयत्न केले, पण व्यर्थ गेले. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या प्रतिसरकारचा भाऊंच्या अमृतवाणींचा ज्वलंत आणि सत्य इतिहास म्हणजे 'असे आम्ही लढलो' व 'प्रतिसरकारचा रणसंग्राम' ही दोन्ही पुस्तके भाऊंनी लिहिली.

कुंडलच्या फोंड्या माळावर लक्ष्मणराव किर्लोस्करांनी लोखंडी नांगराचा कारखाना उभा केला. १९१० ते १९१२ चा तो कालखंड होता. याच माळावर किर्लोस्करांनी औद्योगिक क्रांती घडवून आणली. कुंडल, पलूस, दुधोंडी, रामानंदनगर या परिसराचा चेहरामोहरा बदलून गेला. हजारो कामगारांचे किर्लोस्करवाडी हे केंद्र बनले. कॅप्टन भाऊ हे या कारखान्याचे कामगार बनले, पण तेही नारायण सुर्वे यांच्या भाषेत सांगायचे तर कामगार आहे मी तळपती तलवार आहे, याचप्रमाणे ते वागले. त्यांनी कामगारांचे संघटन केले. कामगारांचा मोठा संप घडवून आणला. १९३९ ला घडलेल्या या संपात कॅप्टन भाऊंना निलंबित केले होते. अखेर कामगारांचा जय झाला भाऊंचे निलंबन ही रद्द झाले. या प्रसंगातून कॅप्टन भाऊ कामगारांचे प्रणेते बनले. कामगारांच्या गळ्यातील ताईत बनले. भाऊ नेहमी कामगारांच्या हितासाठी सदैव तत्पर राहिले, कामगार असूनही भाऊंनी आपला करारी बाणा जपला. देश स्वतंत्र झाला होता. त्यावेळी मराठवाड्यात रजाकाराच्या अत्याचार वाढले हे रजाकाराचे बंडच होते. हे बंड मोडून काढण्यासाठी कुंडल ग्रुप आघाडीवर होता. बीड, उस्मानाबाद, नांदेड

परिसरात बायका मुलांच्यावर रजाकाराचे अनन्वित अत्याचार होत होते, हे अत्याचार रोखण्यासाठी रजाकारांच्या सैन्याला सळो की पळो करण्यात भाऊंचे योगदान मोलाचे होते. अखेर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी कारवाई करून हैदराबाद संस्थान बरखास्त करून निजामाची काळी राजवट उलटून टाकली. या प्रसंगाची आठवण एवढ्यासाठी येते की त्यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतीअग्रणी जी. डी. लाड बापू, कॅप्टन रामभाऊ लाड यांच्या कुंडल ग्रुपच्या तुफान सेनेने मौलिक अशी कामगिरी केली. मराठवाड्याच्या जनतेने म्हणूनच क्रांतिसिंह नाना पाटील यांना जीव की प्राण मानले. या कार्याची पोचपावती म्हणून बीडच्या जनतेने १९६७ साली क्रांतिसिंह नाना पाटील यांना लोकसभेवर प्रचंड मताने विजयी केले.

३ सप्टेंबर १९४२ चा मोर्चा ऐतिहासिक ठरला. या दिवशी स्वतः मामलेदार व न्यायाधीश पुढे आले. त्यांनी गांधी टोपी घालून तिरंग्याला वंदन केले. संपूर्ण भारत वर्षात तासगावकरांनी तिरंग्याला प्रथम सलामी दिली. स्वातंत्र्यदेवतेला नमन केले, संपूर्ण भारत वर्षात तासगावचे नाव दमदमून गेले. मात्र या घटनेने ब्रिटिश पार्लमेंट हा हादरून गेले. त्यांनी इथून पुढच्या सर्व मोर्चावर गोळीबार केला. ८ सप्टेंबर १९४२ इस्लामपूरच्या मोर्चात विष्णू बारपटे, पंड्या इंजिनियर यांचे बलिदान झाले. तर ९ सप्टेंबर १९४२ ला वडूजमध्ये हुतात्मा परशुराम घारगे व इतर मिळून नऊ जणांचे बलिदान घडले, पैकी तासगाव व इस्लामपूरच्या मोर्चात अग्रभागी कॅप्टन भाऊ आघाडीचे शिलेदार होते. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत भाऊ सक्रिय आंदोलक होते. शे.का पक्षाचे नेते प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या अनेक आंदोलनात भाऊ सहभागी होते. भाऊंनी आयुष्यभर लोकांची सेवा केली. गांधी एज्युकेशन सोसायटी, सत्येश्वर पाणीपुरवठा, कुंडल दूध उत्पादन संस्था या संस्था उभा करण्यामध्ये भाऊंचे मोलाचे योगदान होते. महाराष्ट्र शासनाने क्रांतिसिंह नाना पाटील जन्मशताब्दी निमित्त त्यांचे स्मारक कुंडल येथे उभारले. त्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या शासकीय समितीत माजी मंत्री स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम, माजी मंत्री जयंत पाटील यांच्या बरोबरीने कॅप्टन रामभाऊ लाड यांचेही महत्त्वाचे स्थान होते. भाऊंनी या स्मारकासाठी पुरेसा पाठपुरावा केला. ज्या ठिकाणी प्रतिसरकारची स्थापना झाली त्याच जागेवर हे स्मारक उभे आहे. ही भाऊंच्या कामाची पोचपावती.

अशा पद्धतीने भाऊंनी त्यांची उभी हयात समाजासाठी अर्पण केली. शंभर वर्ष निरोगी व एक सुदृढ आयुष्य जगून भाऊंनी ५ फेब्रुवारी २०२२ रोजी अखेरचा श्वास घेतला. एक निर्भीड, देशप्रेमी झंजावाती वादळ शांत झाले.

# स्वातंत्र्यसैनिक रामचंद्र विठ्ठल पुदाले (सूर्यवंशी) यांच्या जीवनकार्याचा आढावा

**– प्रा. सौ. प्रतिभा दत्तात्रय पुदाले**

**गोषवारा –** भारत देशाला मिळालेले स्वातंत्र्य हे सहजासहजी मिळालेले नसून ते मोठ्या कष्टाने मिळविलेले आहे. अनेक लोकांनी या महान कार्यान बलिदान दिले, अनेकांनी आपला खारीचा पण खूप महत्त्वाचा वाटा उचलल्याचे आढळते. या कार्यात 'भारत छोडो' सह अनेक महत्त्वाच्या आंदोलनांची पायाभरणी ही महाराष्ट्रातून झाल्याचे आढळते. भारतीय स्वातंत्र्याच्या पाठीमागे अनेक क्रांतिकारकांच्या बलिदानाचा इतिहास साक्ष देतो. स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन ब्रिटिश सरकारला धारेवर धरले तेव्हा सत्ताधारी ब्रिटिश सरकारने या स्वातंत्र्यसैनिकांचा अतोनात छळ केला. प्रसंगी तात्या टोपेंसारख्या क्रांतिकारकाला फाशी देऊन सूड उगवला आणि त्यातही पश्चिम महाराष्ट्रामध्ये प्रतिसरकारसारखी मोठी चळवळ उभी करून इंग्रजांना सळो की पळो करून सोडले होते. अशा धाडसी व आत्माभिमानी भूमीत अनेक स्वातंत्र्यसैनिक होऊन गेले ज्यांच्यामुळे आज आपण स्वातंत्र्याचे महत्त्व जाणतो. या माळेमधीलच एक पण प्रकर्षाने दखल घेतली गेली नाही असा स्वातंत्र्यसैनिक रामचंद्र विठ्ठल पुदाले यांच्या कार्याविषयी या संशोधनपर लेखामध्ये माहिती घेऊया.

माणूस जन्माला येतो, लहानाचा मोठा होतो. पुढे सुख–दुःखाची अनेक वादळे झेलत आयुष्य जगतो. पण आयुष्य का जगतो, कशासाठी जगतो आणि कुणासाठी जगतो. यांची मात्र काहीच कल्पना नसते. पोटाची खळगी भरण्यासाठी आयुष्यभर काबाडकष्ट करतो. पैसा मिळविण्यासाठी कुठेतरी नोकरी अथवा लहानसहान कार्य करतो, तसेच अंगमेहनतीची कार्येसुद्धा करतो. आपलं कुटुंब एवढंच जग असतं. आपले रामचंद्र पुदाले यांनी मात्र आपल्या स्वत:च्या संसारापेक्षा समाजाच्या संसाराकडे व जगाच्या संसाराकडे लक्ष घातल्याने आपल्या संसाराकडे दुर्लक्ष करून स्वातंत्र्यकार्यात योगदान दिले. पण तयांच्या कार्याकडे समाजाने डोळेझाक केले. खरे पाहता त्यांचे कार्य जगापुढे आले पाहिजे यादृष्टीने हा लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सातारच्या प्रतिसरकारचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

या प्रतिसरकारच्या तुफानसेनेचे फील्डमार्शल क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड होते. त्यांच्या खंबीर नेतृत्वाखाली गुंडशाही, सावकारकी आणि जमीनदारी समूळ नष्ट झाली. तंटामुक्ती, दारूबंदी आणि अस्पृश्यता निवारण यांसारख्या उपक्रमातून ही चळवळ समाजाभिमुख झाली. प्रतिसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटील हे होते. त्यांचे सहकारी म्हणून भूमिगत चळवळीशी संबंधित असलेले मा. स्वर्गीय रामचंद्र पुदाले हे होते. स्वातंत्र्यसेनानी म्हणून ब्रिटिश सरकारने स्वर्गी पुदाले यांना येरवडा कारागृहात बंदिस्त करण्यात आले होते. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण व स्वर्गीय पुदाले हे दोघेही विसापूर कारागृहात एकत्रित होते. त्यावेळी स्वर्गीय पुदाले यांचे वय वर्ष १७ च्या आसपास होते. एवढ्या कोवळया वयात ब्रिटिश सरकारने त्याना क्रूर वागणूक दिली यांची दखल घेणे क्रमप्राप्त होते. समाजाधिष्ठित व नैतिक मूल्यांच्या पाचावर समाज उभा राहावा व राष्ट्रीय मूल्यांची वृद्धी व्हावी यासाठी या स्वातंत्र्यसैनिकांनी संपूर्ण आयुष्य वेचले. शिक्षण, सहकार, कृषी राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये त्यांनी मूलगामी स्वरूपाच्या विचारांचे प्रबोधन करून रचनात्मक कार्यही केले. सांगली जिल्ह्यातील कुंडल हे गाव क्रांतिकारकांचे गाव म्हणून ओळखले जाते. पण कुंडल पंचक्रोशीतील अनेक गावांतील कार्यकर्ते त्यात सहभागी होते, हे विसरून चालणार नाही. त्यापैकीच एक दुर्लक्षित असलेले पण त्यांचे कार्य मोलाचे असल्याने त्याचा मागोवा घेणे गरजेचे आहे. पलूस हे दुर्गम भागातील स्व. रामचंद्र विठ्ठल पुदाले यांनी गोरगरिबांच्या कल्याणासाठी कार्य केले आहे. असा त्यांचा अट्टहास होता. त्याकरिता आर्थिक बाब महत्त्वाची होती म्हणून त्यांनी सहकारी तत्त्वावरील पतसंस्था निर्माण करावी असा त्यांचा मानस होता. त्यांच्याच प्रेरणेतून कार्य सफल झाले. कृषिक्षेत्रातही त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. सांगली जिल्ह्यातील अनेक सामाजिक कार्यकर्ते हे त्यांच्या सहवासात होते त्यामुळे पलूस गावाचा कायापालट होण्यामागे त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

रामचंद्र विठ्ठल पुदाले यांचा जन्म तत्कालीन तासगाव तालुक्यातील पलूस या गावी १९ मार्च १९२३ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पलूसमधील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये इयत्ता ७ वी पर्यंत पूर्ण केले. यादरम्यान शेतीकामाची आवड असल्यामुळे त्यांनी शिक्षणाबरोबरच शेतीकार्याचेही धडे गिरविले. १९४० साली म्हणजेच वय वर्ष १७ झालेला एक तरुण अभ्यासातही चांगली प्रगती, माय मातीशी नाळ जोडलेला रांगडा तरुण, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आदमसो मुल्ला, कृष्णराव कुराडे, कॅप्टन रामचंद्र भाऊ लाड अशा मातृभूमीसाठी जीवन समर्पित करणाऱ्या महान व्यक्तींच्या संपर्कात आला व आपणही आपला खारीचा वाटा आपल्या मातृभूमीसाठी देऊया या विचारापर्यंत स्वयंस्फूर्तीने पोहोचला; कारण

घरामध्ये सर्वसामान्य परिस्थिती असल्यामुळे वेगळा असा स्वतंत्र्यकार्याचा विचार परंपरेने आलेला नव्हता, परंतु तरुणपण तसेच स्वत: सारासार विचार करण्याची कुवत त्यांना शांत बसू देत नव्हती, दरम्यान एक घटना घडली. पलूसमधीलच एक स्वातंत्र्यसैनिक पिराजी सुतार आणि त्यांचे अनुयायी यांच्याकडे पलूस या ठिकाणी ग्रामपंचायत चावडीवर युनियन जॅकच्याऐवजी आपला झेंडा फडकविण्याचे कार्य दिले गेले होते. या कार्याचा इंग्रजांना सुगावा लागला व त्यांनी झेंडा फडकविण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या लोकांना पकडण्यासाठी इंग्रजांची एक स्वतंत्र टीम पलूसमध्ये पाठवली आणि त्यांनी धरपकड करण्याचा प्रयत्न केला. पिराजी सुतार व त्यांचे या कार्यात सहभाग घेणारे सर्वजण पळू लागले. इंग्रजांच्या टीमने गोळीबार केला. परंतु सर्वजण विविध ठिकाणी पसार झाले. इंग्रजांनी त्यांच्यावर पाळत ठेवली, तसेच काही लोक त्यांच्या मागावर ठेवले, जेणेकरून पिराजी सुतार व अनुयायांना पकडले जावे.

अशा कठीण प्रसंगी रामचंद्र पुदाले हे गुप्तहेराप्रमाणे कार्य करत होते. पिराजी सुतार लपून बसलेल्या ठिकाणची माहिती मिळवून त्यांच्यापर्यंत आवश्यक असणारी शिदोरी पोहोचविणे, त्यांची देखभाल करणे, विविध बातम्या व इंग्रजांच्या हालचाली बद्दल माहिती पोहोच करणे अशी कार्ये ते करत होते. या तरुण मुलाच्या हेरगिरी कार्याची आणि पिराजींना मदत पुरवीत असल्याची इंग्रजांना माहिती लागली. त्यांनी रामचंद्र पुदाले यांच्या घरी धाड टाकून १७ वर्षांच्या या मुलाला अटक केली. या अटकेदरम्यान त्यांना प्रथम विजापूर जेलमध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर विसापूर जेल व शेवटी येरवडा जेल या ठिकाणी हलविण्यात आले. एकूण दीड वर्षाचा तुरुंगवास भोगल्यानंतर वय कमी असल्याचे कारण सांगून तसेच इंग्रजांच्या विरुद्धच्या कोणत्याही कार्यात सहभागी दिसू नये अशी सक्त ताकीद देऊन त्यांना सोडून दिले गेले. परंतु स्वयंस्फुर्तीने कार्य करणारा हा तरुण अशा धमक्यांना किंवा अटकेला घाबरणाराच नव्हता. तुरुंगवास भोगून सुद्धा त्यांनी मदतकार्य थांबविले नाही उलट इंग्रजांच्या विरोधातील प्रत्येक चळवळीत सहभाग घेवू लागले.

त्यांच्या कार्याची दखल घेऊन विविध सहकारी संस्था, संघटना, सामाजिक मंडळे, विद्यापीठ, महाराष्ट्र शासन यांनी विविध पुरस्कार व सन्मानपत्र देऊन प्रशंसा केल्याच्या नोंदी आढळतात. महाराष्ट्र शासनाने त्यांनी दिलेल्या योगदानाच्या गौरवार्थ इसवी सन १९७६ साली विशेष असे सन्मानपत्र देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सत्कार केलेला आहे. तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या विद्यापीठाने ०९ ऑगस्ट २०१२ साली क्रांतिदिनाचे औचित्य साधून मा. कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्या हस्ते कार्याचा गुणगौरव पुरस्कार प्रदान केला. त्यांच्या पश्चात

४ मुले व २ मुली अशी सुसंस्कृत आणि उच्चविद्याभूषित अपत्ये आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या महान कार्यानंतरसुद्धा त्यांच्यातील सामाजिक कार्यकर्ता अंतिम श्वासापर्यंत जागृत राहिला. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण किंवा मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्याशी चांगल्या प्रकारचा मैत्रीपूर्ण संवाद साधून सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी कार्य करत राहिले. यशवंत पाणीपुरवठा योजना स्थापना व कार्यान्वित करण्यामध्ये, दुर्लक्षित घटकांना आर्थिक पाठबळ पुरविण्यासाठी धोंडीराज कार्यकारी सोसायटीची स्थापना अशा कार्यात हिरीरिने सहभाग घेतला. अशा धाडसी व स्वयंस्फूर्त महान व्यक्तीचे दिनांक १९ जुलै २०१५ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वार्धक्याने निधन झाले.

# क्रांतिकारकांचे कृतिशील वारसदार : स्व.कॉम्रेड शिवाजी दौंडे (अण्णा)

– प्रा. आशा बुधराम मडावी

महाराष्ट्रात अनेक कर्तृत्ववान पुरुष होऊन गेलेले. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांपैकी एक जिल्हा म्हणजे सांगली जिल्हा. या सांगली जिल्ह्यात पलूस तालुक्यातील कुंडलगाव हे पुरोगामी विचारांची भूमी आहे. स्वातंत्र्य सैनिकांची भूमी ज्यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून दिले. कुंडल ही स्वातंत्र्य सैनिकांची भूमि, क्रांतिवीरांची भूमी म्हणून ओळखली जाते. या भागात क्रांतिशील किंवा क्रांतीचा वारसा जपलेले व अनेक असे कर्तृत्ववान व्यक्ती होऊन गेले आहेत. त्यातील एक व्यक्तिमत्त्व म्हणजे क्रांतिकारकांचे कृतिशील वारसदार स्व.कॉम्रेड शिवाजी दौंडे अण्णा. या भूमीमध्ये शिवाजी दौंडे अण्णा यांचा जन्म ३० एप्रिल १९३८ साली झाला. क्रांतिकारकांचा वारसा असल्यामुळे त्यांनी वर्तमानपत्रांतून क्रांतिकारी विचार मांडले.

स्व.कॉम्रेड शिवाजी दौंडे अण्णा यांच्याविषयी माहिती लिहीत असताना मला अत्यंत आनंद होत आहे; कारण माझे वडील स्व. बुधराम मडावी हेही कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते आणि त्यांनी नेहमी रेल्वे कामगारांसाठी नागपूर येथे कार्य केले. अण्णा यांच्याविषयी माहिती लिहिणे मी माझी पुण्याई समजते. या लेखाद्वारे अण्णाविषयी माहिती सर्वांपर्यंत पोहोचवणे हेच माझा उद्देश आणि छोटासा प्रयत्न आहे. अनेकांनी त्यांच्याविषयी वेगवेगळे मत मांडलेले आहे. अण्णांचा जीवनात असणाऱ्या अनेक पैलूंविषयी मी इथे माहिती मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. स्व.कॉम्रेड शिवाजी दौंडे अण्णा यांच्या जीवनकार्याचा आढावा घेताना अगदी स्पष्टपणे दिसते की, सामाजिक, धार्मिक, राजकीय व शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रांतील आमूलाग्र परिवर्तनासाठी त्यांनी आयुष्यभर नि:स्वार्थपणे लढा दिलेला आहे. अण्णांचा स्वभाव अन्यायाविरुद्ध लढण्याचा होता. अण्णांचा जीवनात अनेक पैलू आहेत. त्या पैलूंविषयी सांगताना अण्णा निरागस व्यक्तिमत्त्व, विवेकी, एक प्रेमळ कुटुंबप्रमुख, सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध जोपासणारे, पुरोगामी चळवळीतले एक कार्यकर्ते, डाव्या विचारांचे पाईक

होत. राजकारण आणि समाजकारण यांची उत्कृष्ट जाण असणारे नागरिक होते.

**पुरोगामी चळवळीतले एक कार्यकर्ते –**

महाराष्ट्र पुरोगामी राज्य आहे. महाराष्ट्राला कॉम्रेड शिवाजीराव दौंडे अण्णासारखे पुरोगामी विचार, कृतिशील माणसांची परंपरा आहे आणि म्हणूनच महाराष्ट्राचे पुरोगामीपण टिकवून आहे. पुरोगामित्वाची तत्त्वे अण्णांनी जोपासली होती. महाराष्ट्रभर जनसंपर्क असणारे, वैचारिक अधिष्ठान लाभलेले, शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व म्हणजे दौंडे अण्णा होय. महाराष्ट्र राज्याच्या कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य होते. राजकीय जीवनात समाजवादाचे दीपस्तंभ चळवळ टिकली पाहिजे आणि विचार जपला पाहिजे या धोरणावर चालणारे पुरोगामी, परिवर्तनवादी विचारांचा दीपस्तंभ, समाजवादी विचारवंत म्हणजेच कॉम्रेड शिवाजी अण्णा होय. कृषी नेते आणि समाजवादी विचारवंत म्हणून अण्णा नेहमी पुढे होते. अण्णांसारखे तत्त्वशील, प्रामाणिक, अभ्यासू, विवेकवादी, संघर्षशील व्यक्तिमत्त्व समाजात आपल्या सोबत असणे म्हणजे समाजाच्या चांगुलपणांचे आणि भाग्याचे प्रतीक होय. अण्णांचे व्यक्तिमत्त्व हे समाजवादाने ठासून भरलेले होते. अण्णा हे सतत सामाजिक विचार आणि तत्त्वांचे कार्य करत होते. चळवळ टिकली पाहिजे त्यासाठी कोण पुढाकार घेत नाही या विचाराने ते अस्वस्थ होत होते. देश आणि राज्यपातळीवर डावा विचार जपणारे लोक क्वचित शिल्लक आहेत; कारण हे विचार समाजात रुजवणे अशक्य झाले आहे. त्यातून डाव्या विचारांची देशात पीछेहाट झाली आहे, पण स्थानिक पातळीवर शिवाजी दौंडे अण्णांसारखी एखादीच व्यक्ती असा विचार अंगीकारते आणि जपतेही. कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्व हे तिन्ही घटक अण्णांना शोभायचे. अण्णा पुरोगामी विचारांनी भारलेले होते.

**लोकांच्या विकासासाठी कार्य करणारे अण्णा –**

त्यांनी आयुष्यात फक्त माणसे जोडण्याचे काम केले. अण्णांच्या अनेक थोरा–मोठ्यांशी ओळख होती, त्याचा फायदा त्यांनी लोकांच्या विकासासाठी करून घेतला. त्याचा स्वभाव अन्यायाविरुद्ध लढण्याचा होता. आपल्या ताकदीनुसार मोर्चे, आंदोलन, करत होते. सर्व लोकांना सहजपणे समजेल अशा पद्धतीने ते आपले विचार त्यांच्यापर्यंत पोहोचत होते. अण्णा लोकांना सामाजिक, राजकीय मार्गदर्शन करत असे. समाजातील गोरगरीब, अन्यायग्रस्त, जातधर्मपीडित व उपेक्षितांच्या वेदना कमी व्हाव्यात, गरिबीची दु:खे जाणणारे, त्यांना चांगले शिक्षण मिळावे हा त्यांचा ध्यास होता. त्यासाठी ते सातत्याने योगदान देत असे. त्यांनी उपेक्षित घटकांच्या वेदनांना वाचा फोडण्यासाठी नेहमीच कार्य केले. त्यांनी कष्टकरी कामगार, शेतकऱ्यांचे तळागाळातील जनतेचे राहणीमान कसे सुधारावे यासाठी अण्णांनी लिहिले. वंचिताच्या प्रश्नासाठी भारतीय कम्युनिस्ट

पार्टी सक्रिय काम केले. ते कधीही कोणत्याही दबावाच्या बळी पडले नाहीत. समाजकारण असो किंवा राजकारण येथे राहून स्वच्छ प्रतिमा जपणे, मिळालेली संधी डावलून सर्वसामान्य लोकांच्या हिताचे प्रश्न घेऊन सातत्याने पाठपुरवठा करणे एवढे सोपे नसते, तरीही अण्णा सर्वांसाठी ते करायचे. यातूनच लोकांच्या विकासासाठी अण्णांचे प्रयत्न दिसून येतात.

**युवा पिढीचे मार्गदर्शक –**

त्यांनी अनेक मुलांना बोलून बळजबरीने नोकरभरतीचे फॉर्म भरायला लावले. अशी अनेक जण आज विविध शासकीय, निमशासकीय सेवेत कार्यरत आहेत. अण्णा गरजू युवकांना नोकरभरतीचे फॉर्म अगदी स्वखर्चाने देत असत. तसेच युवकांना नोकरभरती संदर्भात मार्गदर्शन करत असत. त्यांनी कुंडलगाव आणि परिसरातील नागरिकांना दिलेल्या वैचारिक पुंजीतून अनेक युवक ही घडले. अनेकांना अण्णा समाजकारणाचे, राजकारणाचे धडे देत असत. त्यांनी स्वतः विविध पुस्तके, वर्तमान काळातील संपादकीय वाचनीय लेख यांचे विपुल वाचन केले व त्याच बरोबर त्यांनी पत्रकारितेत पदार्पण केलेल्या नवख्या पत्रकारांना कोणते वाचन करावे व लेखांमध्ये कोणत्या विषयांना प्राधान्य द्यावे याचे मार्गदर्शन नेहमी केले.

**शेतकऱ्यांसाठी अण्णांनी केलेले कार्य –**

कर्जमाफीची पहिली पायरी म्हणजे राज्य सरकार, केंद्र सरकार यांनी जे शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास सकारात्मक धोरण तयार केले आहे त्यासाठी अण्णांनी ३०–३५ वर्षांपूर्वी अल्पभूधारक शेतकरी, सर्वसामान्य नागरिक यांचे कर्ज माफ झाली पाहिजेत म्हणून सांगली जिल्हा कर्जदार संघर्ष समितीची स्थापना केली होती. त्यांच्यासाठी अनेक वेळा शासनाकडे निवेदन पाठवले होते. लोकप्रतिनिधी जिल्हा अधिकारी यांना निवेदन केलेले होते. त्यांनी कर्जमाफीबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण केलेली होती. शेतकरी व कामगार वर्ग यांच्यासाठी अनेक आंदोलनात अण्णा सहभाग घ्याचे. शेतकऱ्यांना लाइट बिल, मीटरऐवजी हॉटस्पॉवर वरती लाइट बिल आकारणी झाली पाहिजे, कामगारांचा पगारात वाढ, शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले पाहिजे, शेतकरी संघटित करण्यासाठी व कामगार संघटित करण्यासाठी अण्णा जनतेला आव्हान करायचे.

**महिलांना सन्मानाची भूमिकासाठी प्रयत्न –**

महिलांचा विकासासाठीसुद्धा त्यांनी काम केले. अण्णांनी आपल्या घरातील महिलेपासून प्रोत्साहनाची सुरुवात केली. म्हणजेच अण्णांची पत्नी कुसुमताई शिवाजी दौंडे यांना सर्वप्रथम प्रतिनिधी हायस्कूल मध्ये शिक्षणासाठी प्रवेश देऊन स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते असल्याचे कृतीतून दाखवून दिले. त्यांचे शिक्षण पूर्ण

केले. कुंडल ग्रामपंचायत येथे ग्रामपंचायत सदस्य म्हणून समाजसेवा करण्याची संधी जेव्हा आली तेव्हा अण्णांनी लगेच होकार दिला व कुसुमताई शिवाजी दौंडे यांना सामाजिक कार्यासाठी प्रोत्साहन दिले. १९८५ साली वांगी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत कुंडल ग्रामपंचायत सदस्य म्हणून अण्णांच्या पत्नी प्रचारासाठी सक्रिय कार्य केले. यातूनच महिलांना सन्मानासाठी व स्त्री - पुरुष समानतेसाठी अण्णांचे प्रयत्न दिसून येतात.

**परिवारांचे ते आधारस्तंभ -**

अण्णांनी आपल्या कुटुंबाला अनेक प्रकारचे कष्ट करून सांभाळले. घरातील जबाबदाऱ्या व समाजकार्य दोन्ही केले. मुलांचे संगोपन असो शिक्षण किंवा त्यांचा रोजगारांचा प्रश्न यामध्ये ते आपल्या मुलांना सतत मार्गदर्शन करत राहिले. त्यामुळे कुटुंब नेहमीच व्यवस्थित राहिले. ध्येयवादी असूनही अण्णांनी आपल्या व बंधूंच्या कुटुंबावर नेहमीच प्रेम केले. त्यांनी आपल्या कुटुंबाला नेहमी एकत्र ठेवले. सामाजिक जीवनात काम करीत असताना कौटुंबिक जबाबदारीसुद्धा अतिशय सक्षमरीत्या सांभाळली. अण्णांची सर्वच मुले वेगवेगळ्या क्षेत्रांत आदर्शवत कामगिरी करीत आहेत. अण्णा वटवृक्षाप्रमाणे परिवारांचे आधारस्तंभ होते.

अण्णा साहित्यिक होते. आपल्या लेखनाने सरकारच्या चुकीच्या धोरणावर वर्तमानपत्रातून आवाज उठवत होते. सरकार कोणाचेही असो ज्या ज्या वेळी चुकीचे धोरणे जनतेवर लादली जात होती. त्यावेळी त्यांची लेखणी स्तब्ध बसत नव्हती. क्रांतिकार विचार वर्तमानपत्रांतून मांडले जात होते. कधीही त्यांनी आपल्या तत्त्वांशी तोडजोड केली नाहीत. त्यांनी स्वतःही काही दैनिकातून पत्रकारिता केली. आयुष्यभर त्यांनी वर्तमानपत्र विक्री केले अण्णांच्या असंख्य बातम्या वेगवेगळ्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. जनतेच्या मागण्यावर शासनाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार करून आवाज उठवले आहे. त्यावर लेखन केलेले प्रसिद्ध झालेले आहेत आणि कुंडल गावापासून दिल्लीच्या संसद होण्यापर्यंत अनेक वेळा जनतेच्या लढण्यात भारतीय कम्युनिस्ट पक्ष, अखिल भारतीय किसान सभा, ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस या माध्यमातून सहभागी झाले.

आज २१ शतकात अण्णांच्याकडून काय घ्यायचे असेल तर असे अण्णा प्रत्येकांचा घरात असावे. जे स्वतः निस्वार्थपणे समाजसेवा करत राहिले आणि पुढच्या पिढीलासुद्धा समृद्ध वैचारिक वारसा देऊन गेलेत. समाजाला जागे करण्याचे कार्य मृत्यूपर्यंत त्यांनी पाळले होते. त्यांचा मृत्यू दिनांक २१ सेप्टेंबर २०२० रोजी झाला. अण्णांसारखा लढाऊ कार्यकर्ता, अभ्यासू कार्यकर्ता सर्वांनाच आवडायचा. अशा रीतीने परिवर्तनाच्या लढ्यात नेहमी खराखुरा आयडॉल असणारे म्हणजे शिवाजीराव दौंडे अण्णा होते. ते ध्येयवादी, साम्यवादी विचारांचे पुरुषकर्ते होते.

**संदर्भ ग्रंथ सूची –**


१. आठवण : प्रा. संदेश शिवाजी दौंडे
२. कम्युनिस्ट पक्षाचा आयडॉल : श्री. जे. के. जाधव
३. क्रांतिकारकांचे कृतिशील वारसदार : श्री. ॲड. दीपक लाड
४. कुटुंबाचे आधारस्तंभ : श्री. धनंजय दौंडे
५. डाव्या विचारांचे पाईक : श्री. चंद्रकांत रोकडे
६. धगधगता कॉम्रेड : श्री. व्ही. वाय. आबा
७. समाजवादाचे दीपस्तंभ : श्री. जयवंत आवटे

# महात्मा जोतीराव फुले यांचे कृषीविषयक विचार आणि भारतीय शेतकऱ्यांच्या वर्तमानकालीन समस्या

**– प्रा. अनिता बलभीम ममलय्या**

**गोषवारा –**

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि शेती पिकविणारा शेतकरी हा देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती व्यवसायाचे मजबुतीकरण केल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही असा अर्थतज्ज्ञांचा दावा आहे. तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा गंभीर प्रश्न सद्य:स्थितीत आपल्या समोर उभा आहे. अर्थव्यवस्थेचा कणाच कोलमडून पडतोय अशा परिस्थितीत या बाबींची गंभीर चिकित्सा करून प्रश्नाच्या मुळाशी नेमकी काय कारणे आहेत याचा आजच्या घडीलादेखील समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून निरपेक्षपणे विचार केला तर हा विचार भारतीय परंपरेत सर्वप्रथम महात्मा जोतीराव फुलेंनीच अग्रक्रमाने आणि पोटतिडीकीने मांडलेला होता, असे दिसून येते.

**प्रास्ताविक –**

**भारतीय शेतकऱ्यांच्या समोरील वर्तमानातील समस्या –**

वर्तमानस्थितीत शेतकरी आत्महत्या करतो याचे कारण तो शेतीमधून नफा मिळवू शकत नाही. तो कर्जबाजारी होतो आणि हा आर्थिक तणाव सहन न झाल्याने आत्महत्या करतो. ज्या देशाचा मुख्य व्यवसाय शेती आहे, त्या देशाचा शेतकरी दुबळा, कंगाल, दरिद्री, अज्ञानी का राहिला? या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन शोध घ्यावा लागेल. जो शोध म. फुलेंनी आपल्या सत्यशोधकीय नजरेतून घेतलेला होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी पोटतिडीकीने मांडणी करणारा आणि त्यावर उपाययोजना सुचविणारा 'शेतकऱ्यांचा आसूड' हा म. फुलेंचा ग्रंथ मराठी साहित्यातील कृषी संस्कृतीच्या साहित्य परंपरेतला एक दिशादर्शक आणि दीपस्तंभ असणारा आद्यग्रंथ आहे.

**महात्मा फुले आणि शेतीविषयक प्रश्न –**

महात्मा फुले यांचे शेतीविषयक ज्ञान पुस्तकी नव्हते तर त्यांना शेती व शेतकऱ्यांच्या परिस्थितीची चांगली जाणीव होती म्हणूनच त्यांनी १८८३ साली 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ लिहला याशिवाय त्यांनी सत्यशोधक समाजाच्या

माध्यमातून निबंध स्पर्धा, व्याख्याने असे शेतीच्या प्रश्नाबाबत अनेक उपक्रम विविध ठिकाणी राबविले. १८७७च्या दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी महात्मा फुलेंनी 'व्हिक्टोरिया बालाश्रम' स्थापन करून त्यांच्या राहण्याची व खाण्याची सोय केली. खडकवासला कालवा तयार झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात शेतकरी पाण्याचा व्यवस्थित वापर करत नव्हते तेव्हा शेती कशी करावी हे त्या शेतकऱ्यांना समजावून सांगण्यासाठी महात्मा फुलेंनी त्या भागात जमीन घेतली व स्वतः नव्या पद्धतीने शेती करून दाखविली. सार्वजनिक सभा खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे हित साधू शकत नाही म्हणून त्यांनी 'दीनबंधू' सार्वजनिक सभा स्थापन केली. शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी म्हणून महात्मा फुले खेडोपाडी जाऊन सभा घेत. १८८२ साली त्यांनी मुंबईत हिंदी शेतकऱ्यांची स्थिती या विषयावर व्याख्यान दिले. १८८४ मध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी बडोद्याला जावून 'शेती सुधारणा' या विषयावर व्याख्याने दिली. महात्मा फुलेंच्या शेतकरी चळवळीमुळे १८८५ साली जुन्नर भागातील शेतकऱ्यांनी सावकार व जमीनदारांच्या जमिनी कसण्यास नकार दिला. त्यावेळी महात्मा फुलेंनी पुढाकार घेऊन चार ते पाच हजार शेतकऱ्यांच्या सह्यांचा अर्ज सरकारकडे पाठविला. त्यामुळे सरकार, सावकार व जमीनदारांना नमते घेऊन व्याजाचा व जमिनीच्या लागवडीचा दर कमी करावा लागला. हरी रावजी चिपळूणकर यांनी १८८८ मध्ये 'ड्युक ऑफ कैनाट'ला मेजवानीसाठी आंमत्रित केले होते. सदर मेजवानीस महात्मा फुले यांनाही आमंत्रण होते. या समारंभात महात्मा फुले शेतकऱ्यांच्या वेशात गेले आणि त्यांनी ड्युकला भारतीय शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेची माहिती दिली.

**समस्येचा मुळांचा शोध : व्यवस्था –**

म. जोतीराव फुले आद्य समाजक्रांतिकारक आहेत, त्यांनी वर्णव्यवस्थेवर आधारित असलेल्या आणि सुमारे सहा हजारांहून अधिक जातीत, उपजातींत विभागलेल्या भारतीय समाजव्यवस्थेची चिकित्सा केली. तथागत भ. बुद्धांनी म. फुलेंच्या पूर्वी या 'अल्पजन हिताय, अल्पजन सुखाय' व्यवस्थेच्या विरोधात 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' अशी घोषणा दिली होती. आधुनिक भारतात म.फुलेंनी सर्व सामान्यांच्या भाषेत या विषमतावादी समाजव्यवस्थेला मूठभर शेठजी आणि भटजी यांच्या हितसंबंधांना जपणारी आणि बहुसंख्य शूद्र, अतिशूद्रांना गुलामीत ठेवणारी ही व्यवस्था आहे अशी मांडणी केली. त्यांनी ही असमान व्यवस्था बदलण्यासाठी नेमके आणि सुटसुटीत सूत्रच तयार केले ते म्हणजे 'शेठजी आणि भटजी' यांच्या विरुद्ध 'शूद्र आणि अतिशूद्र' हे होय. भ.बुद्धांच्या नंतर, म.फुलेंच्या काळात व्यवस्था परिवर्तनाची ही लढाई जोमाने कार्यान्वित

झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भ. बुद्धांच्या 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' आणि फुलेंच्या 'शेटजी-भटजी विरुद्ध शूद्र-अतिशूद्र, या सूत्रांचाच विकास पुढे केला. आणि व्यवस्था परिवर्तनाच्या लढ्याला निर्णायक पातळीवर आणून ठेवले. बाबासाहेबांनी भ. बुद्ध, म. फुले आणि संत कबीरांना आपल्या गुरुस्थानीच मानले होते.

**शेतकऱ्यांचे समाजव्यवस्थेतील स्थान –**

शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे विवेचन करताना समाजव्यवस्थेतल्या भेदाची जी सीमारेषा म.फुलेंनी सांगितली होती. त्या सीमारेषेच्या खालचा वर्ग म्हणजे शूद्र-अतिशूद्र वर्ग. या वर्गातच समस्त बहुजन समाजातील गरीब शेतकरी, शेतमजूर यांचा समावेश होतो. या शूद्र, अतिशूद्रांना कलमकसाई ब्राह्मण वर्गाने ब्राह्मणाचे कसब दाखवून गुलामगिरीत ठेवले होते. त्यांचे कारण म्हणजे या सर्व गरीब शेतकरी, शेतमजूर वर्गास त्यांनी ज्ञानापासून रुढी परंपरा आणि दांभिक धर्मशास्त्रांचा आधार घेऊन शतकानुशतके वंचित ठेवले होते आणि म्हणूनच म. फुलेंनी शूद्रातिशूद्रांच्या दुःखांचे मर्मच या त्यांच्या व्यवस्था परिवर्तनासाठी दिलेल्या महान क्रांतिसुक्तांतून व्यक्त केले आहे. समस्त बहुजन समाजाच्या आणि गरीब शेतकऱ्यांच्या समस्याची इतकी तर्कनिष्ठ कारणमिमांसा आधुनिक भारतात म. फुलेंनीच सर्वप्रथम केलेली आहे.

**महात्मा फुले यांच्या काळातील भारतीय शेती आणि शेतकरी –**

महात्मा फुले यांनी भारतीय शेतकऱ्यांच्या व शेतीच्या दुरावस्थेची जी कारणे सांगितले आहेत त्यातील काही महत्त्वाच्या कारणांचा त्याचबरोबर भारतीय शेती, शेतकरी यांची परिस्थिती सुधारण्यासाठी सुचविलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

**जमिनीचे विभाजन व तुकडीकरण –**

कुटुंब वाट्यामुळे जमिनीचे लहान लहान तुकडे पाडले जातात. भारतातील तत्कालीन वारसा हक्कांच्या कायद्यामुळे जमिनीचे लहान तुकडे पाडले जातात, परिणामी जमिनीच्या या लहान तुकड्यांवर आपला व कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालविणे अशक्य होई.

**दारिद्र्याविषयी विचार –**

भारतीय शेतकरी विभन्न कारणांमुळे दरिद्री झाला होता व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी असे त्या काळातील सरकारला वाटत नव्हते. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी संस्थानिकांजवळ मोठे सैन्य होते. अनेक शेतकरी सैन्यात नोकरी करत होते, परंतु पेशव्यांचा अस्त झाल्यामुळे बरेच सैन्य घरी बसले. त्यामुळे शेतीवरील भार वाढून शेतीचे उत्पन्न कमी झाले, परिणामी शेतीचे

आंतरविभाजन व अपखंडन झाले. शेतीची उत्पादकता कमी झाली तसेच ब्रिटनमधील यंत्रावरील वस्तू भारतात आयात होऊ लागल्या. त्यामुळे भारतीय व्यावसायिकांना बेरोजगार व्हावे लागले. अशाप्रकारे अनेक मार्गांनी पिळवणूक झाल्यामुळे भारतीय शेतकरी दारिद्र्यात जीवन जगत होते.

फुलेंच्या कालखंडातील शेतकऱ्यांचे शत्रू आणि वर्तमान कालखंडातील शेतकऱ्यांचे शत्रू म.फुलेंच्या कालखंडात अल्पभूधारक शेतकरी दुष्काळाच्या आपत्तीमध्ये कर्जबाजारी व्हायचा. त्यांच्या कर्जबाजारीपणाच्या गैरफायदा उच्चवर्णीय सावकार त्याची जमीन गहाण ठेवून घेत असे. परिणामी जमिनीचे उच्च वर्णीयांकडे सुलभ हस्तांतर व्हायचे आणि बिचारा शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त व्हायचा. १८७९ मध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी जाण्याचा (हस्तांतरणाचा हा प्रकार बंद व्हावा यासाठी तत्कालीन इंग्रज सरकारने 'डेक्कन ॲग्रिकल्चर रिलीफ ॲक्ट पास केला होता. शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेबद्दल परकीय इंग्रजांनादेखील कायदा करावासा वाटला. इतकी या देशातल्या उच्चवर्णीय सावकारांनी शेतकऱ्यांची लूट चालविली होती.

वर्तमान कालखंडातदेखील खेड्यापाड्यात अशी छुपी सावकारी चालते. ज्याचा परिणाम म्हणून अल्पभूधारक आणि गरीब शेतकऱ्यांचा जगण्याचा एकमेव आधार म्हणजे त्यांची जमीन या शेटजी (भांडवलदार, सावकार) वर्गाकडून कर्ज फेडीच्या नावाखाली हस्तांतरित होते. अर्थात हिसकावून घेतली जाते. परिणामी शेतकरी आत्महत्या करतात.

इंग्रजी राजवटीत उच्चवर्णीयांचाच शिक्षित वर्ग इंग्रजाच्या प्रशासन व्यवस्थेत अधिकार पदावर नेमलेला होता. परिणामी राज्यकारभार करताना सर्वसामान्य शेतकऱ्यांचे शोषण झाले. एकीकडे उच्चवर्णीय सावकार आणि दुसरीकडे उच्चवर्णीय नोकरशाह व दलाल या सगळ्या उच्चवर्णीयांनी गरीब शेतकरी वर्गाचे सर्व अर्थाने शोषणच केले.

वर्तमान कालखंडात म. फुलेंच्या सत्यशोधकीय नजरेने व तटस्थेने निरीक्षण केल्यास लोकशाही राष्ट्रातदेखील भांडवलशाहीच्या हितसंबंधाची धोरणे राबविली जातात. शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे, औजारे पुरविणारे भांडवलदार कंपन्याचे मालक, दलाल हे सत्ताधारी राजकीय व्यवस्थेबरोबर समझोता करतात. प्रशासनातील नोकरशाही भ्रष्ट मार्गाने या भांडवलदाराचेच (शेटजीचेच) हित जोपासते, असे दिसून येते. पावसाच्या अनियमितेवर, कष्टाने (कर्ज काढून) शेतीवर लावलेला जुगार जेव्हा हरला जातो. तेव्हा कर्जबाजारी शेतकऱ्याची अवस्था भ्रमिष्ट होते आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात, ही वस्तुस्थिती आहे.

**धार्मिक दडपशाहीतून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण –**

ग्रामीण समाजव्यवस्थेमध्ये उच्चवर्णीय ब्राह्मण समाज, धार्मिक परंपरांची भीती दाखवून गरीब शेतकरी वर्गाची आर्थिक पिळवणूक करतो. शेतकऱ्यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत हा भटजी वर्ग गरीब शेतकऱ्यांला विविध धार्मिक विधी करावयाला लावतो. यासबंधी शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात म.फुलेंनी शेतकऱ्याला मूल झाले की, भट ब्राह्मणाची धनरेषा उपटते असे उपहासाने म्हटले आहे. स्वतःला धनलाभ मिळविण्यासाठी पुरोहित ब्राह्मण वर्ग लग्नसमारंभ, वास्तुशांती, अंत्यविधी आणि अनेक सण, उत्सव यांचे अवडंबर माजवून गरीब शेतकऱ्यांना विनाकारण खर्च करायला लावतो. अज्ञानामुळे आणि भीतीमुळे शेतकरी प्रसंगी कर्ज काढूनही असे भंपक विधी करतो. पाचा खरपूस समाचार म. फुलेंनी शेतकऱ्यांचा आसूड अंगात घेतलेला आहे. कर्जबाजारी शेतकरी मुलीच्या अंगावरचे दागिने विकून टाकतो. त्यामुळे तिच्या नांदण्याचे चांदणे होते. (शेतकऱ्यांचा आसूड पृ.क्र. २३५) असे उपहासाने त्यांनी मांडले आहे.

गरीब शेतकऱ्यांमध्ये आपापसात भांडणे लावून त्यांना पोलीस स्टेशन, कोर्ट कचेऱ्या करायला लावून दोन्हीकडून लाच खाणारी षडयंत्रकारी उच्चवर्णीयांची व्यवस्था जशी फुलेंच्या कालखंडात होती. तशीच आजही आहे.

**शेतकऱ्यांचे शोषण –**

शेतकऱ्यांच्या दुरवस्थेला कारणीभूत असणारा घटक म्हणजे त्यांचे विविध मार्गाने होणारे शोषण होय. काही वेळा हे शोषण हक्काने व काही वेळा अडचणीचा गैरफायदा घेऊन, तर काही वेळा शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन केले जात असे. सन १८८६ मध्ये ब्रिटिश सरकारने शेतसारा मोठ्या प्रमाणात वाढविला. १८७७–७८ मध्ये दुष्काळ आणि जागतिक मंदीमुळे शेतमालाचे दर कमी झाले. शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले. पोटाची आग बुझविण्यासाठी त्यांना आपली गुरे ढोरे विकावी लागली, शेती गहाण ठेवावी लागली, शेतीचे गहाण खत करताना अज्ञानी शेतकऱ्यांची सरकारी अधिकारी, सावकार यांनी फसवणूक केली. शेतकऱ्यांच्या जमिनी हडपल्या या शोषणाच्या जोडीलाच धार्मिक विधीच्या आणि कर्मकांडांच्या नावाखाली शेतकऱ्यांची लुबाडणूक वेगळीच होती. त्यातून अडाणी शेतकरी लुबाडला जात असत.

**शेतकऱ्यांचे शोषण थांबविण्यासाठी म. फुलेंनी सुचविलेल्या उपाय योजना –**

१. पुरोहित आणि शेतकरी यांच्यात कधीच ऐक्य होणार नाही. असा समाजशास्त्रीय नैसर्गिक सिद्धांत म. फुलेंनी ठामपणे मांडला होता. त्यामुळे तत्कालीन ब्रिटिश राजवटीला त्यांनी लोकसंख्येच्या प्रमाणात उच्चवर्णीयांना नोकऱ्या द्याव्यात असे सुचविले होते. मूठभर उच्चवर्णीय नोकरशहाकडून

होणारे बहुसंख्य गरीब, अज्ञानी शेतकऱ्यांचे शोषण थांबवावे हा त्या पाठीमागचा हेतू होता.

२. सरकारी जागेवर बहुजन समाजातून जास्तीत जास्त माणसे निवडली जावीत. त्यासाठी बहुजन समाजाला शिक्षण द्यावे आणि त्यांना शिक्षण देण्यासाठी बहुजन समाजातून शिक्षक निर्माण केले जावेत, असे आग्रही प्रतिपादन फुलेंनी मांडले होते. कारण उच्चवर्णीय शिक्षकांकडून धर्मभोळेपणाचे (भयनिमितीचे), अंधश्रद्धांचे शिक्षण दिले जाईल. अशी शंका फुलेना वाटत होती.

३. वाहणाऱ्या पाण्याला अडवून त्यांच्यावरती बंधारे बांधले पाहिजेत हा विचार फुलेंनी शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात मांडलेला होता. वर्तमान कालखंडात शासन यंत्रणेकडून जलसंधारणाच्या, जलयुक्त शिवार अभियानाच्या पाणी फांडेशनच्या कामांचा प्रचार आणि प्रसार केला जातो, त्या कामाचे महत्त्व फुलेंनी फार पूर्वीच १९ व्या शतकातच मांडलेले आहे.

४. शेतीची सुधारणा करण्यासाठी शेतकऱ्याला शेतीसंबंधी अत्याधुनिक ज्ञान दिले गेले पाहिजे. त्याला दर्जेदार बैल दिले जावेत. जनावरे चरण्यासाठी जंगलाचे, कुरणाचे संवर्धन केले जावे. या म. फुलेंनी त्यांच्या कालखंडातल्या समस्या निवारण्यासाठी सुचविलेल्या उपाययोजना आजही पथदर्शी मार्गदर्शक आहेत.

**महात्मा फुले यांनी सांगितलेले शेतीच्या सुधारणेविषयी उपाय –**

शेतीची उत्पादकता वाढावी म्हणून महात्मा फुले यांनी काही उपाययोजना सुचविल्या. त्यामध्ये शेतीसाठी पाणीपुरवठा करावा. पाणी अडवा पाणी जिरवा मोहीम राबवावी, बंधारे बांधणे, शेतीत पाणी मुरविणे, तलाव बांधणे, धरणे बांधणे : वापर करावा, शेती बागायती करावी. शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरिता शेतकऱ्यांना कृषीविषयक शिक्षण प्रशिक्षण द्यावे. शेतकऱ्यांना साक्षर करावे. तलाव, विहिरी यांतील गाळ शेतकऱ्यांना मोफत द्यावा. शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीविषयक शिक्षण द्यावे, जास्त पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षीस द्यावे. कृषीविषयक पुस्तके शेतकऱ्यांना द्यावीत. पीक संरक्षणाकरिता सरकारने मदत करावी, अशाप्रकारच्या सुधारणा केल्यास शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल.

**निष्कर्ष –**

१. म. फुलेंनी १९ व्या शतकात ब्रिटिश राजवटीत शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेबद्दल सर्वप्रथम आवाज उठविला होता.

२. सर्वसामान्य गरीब शेतकऱ्यांच्या समस्याचे मूळ कारण असमानतेवर

आधारलेली ब्राह्मणी व्यवस्थाच आहे.

३. म.फुलेंच्या कालखंडात त्यांनी ज्या उपाययोजना शेतकऱ्यांचे शोषण थांबविण्यासाठी सुचविलेल्या होत्या, त्या सर्व उपाययोजना आजही वर्तमानकालीन शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त आहेत.
४. पाणी अडवा, पाणी जिरवा किंवा तिचे अद्ययावत ज्ञान शेतकऱ्यांना द्यावे हा तत्कालीन कालखंडात मांडलेला विचार आजही मार्गदर्शक आहे.
५. म. फुलेंच्या कालखंडात धार्मिक अवडंबराखाली पुरोहितांनी शेतकऱ्यांचे केलेले शोषण आजही वर्तमानात ग्रामीण समान व्यवस्थेत कमी अधिक प्रमाणात आहेच. ते समूळ नष्ट करण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे.
६. म.फुलेंनी शेटजी - भटजी विरुद्ध शूद्र-अतिशूद्र हे नेमके दिलेले व्यवस्था परिवर्तनाच्या लढाईचे सूत्र गांभीर्यपूर्वक अमलात आणणे काळाची गरज आहे.
७. म.फुलेंनी सुचविल्याप्रमाणे बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करणे आणि विज्ञाननिष्ठ, तर्कनिष्ठ विवेकी विचारांची पेरणी करणे गरजेचे आहे.
८. म. फुलेंनी सुचविलेप्रमाणे शासन-प्रशासन व्यवस्थेत बहुजन समाजाचे बहुसंख्य लोक अधिकार पदावर पोहचले पाहिजेत.

**समारोप -**

शेतकऱ्यांची बाजू सडेतोडपणे समाजासमोर मांडणारे महात्मा जोतीराव फुले हे महाराष्ट्रातील पहिले समाजचिंतक होत. त्यांनी आपले विचार शास्त्रीय पारिभाषेत मांडलेले नाहीत. पण येथील जातीय आणि वर्गीय संबंधातून शेतकऱ्यांचे शोषण चालू होते, त्यांचे आकलन त्यांना सर्वप्रथम झाले होते.

महात्मा जोतीरावांना छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख कुळवाडी भूषण असा केला आहे. कुळवाडी भूषण म्हणजे शेतकऱ्यांचा राजा होय. आज छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा जोतीराव फुले आणि राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न चिंताजनक बनून राहिला आहे. जर हा प्रश्न मुळापासून मिटवायचा असेल आणि शेतकऱ्यांचे दारिद्र्य कायमस्वरूपी घालवायचे असेल तर प्रस्थापित सरकारने आणि शेतकरी संघटनांनी महात्मा जोतीराव फुल्यांच्या वरील आर्थिक विचारांचा स्वीकार करून त्याची अंमलबजावणी करावी असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१. 'शेतकऱ्यांचा आसूड' म. जोतीराव फुले
२. फडके य. दि., महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि

संस्कृती मंडळ, मुंबई १९६९
३. म. फुले समग्र वाङ्मय संपा. धनजंय कीर, स.गं. मालशे,
४. चौसाळकर अशोक (डॉ.), महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, सुगावा प्रकाशन, पुणे २००७
५. सरदार गं. बा., महात्मा फुले व्यक्ती आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन, पुणे १९८१

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य

**– प्रा. धनेश गवारी**

**प्रस्तावना –**

महाराष्ट्रातील अस्पृश्यता निवारण कार्यातील थोर समाजसुधारक, ब्राह्मधर्म प्रचारक, संशोधक व लेखक होते.जमखंडी येथील इंग्रजी शाळेतून १८९१ साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले व १८९३ मध्ये पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात पुढील शिक्षणासाठी दाखल झाले. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्याकडून मिळणारी कर्जाऊ शिष्यवृत्ती व खासगी शिकवण्यांची अल्पस्वल्प मिळकत यांवर काटकसरीने राहून १८९८ मध्ये ते बी.ए. झाले. १८९५ साली अमेरिकन युनेटिरियन मिशनरी रेव्ह. जे. टी. संडरलंड यांच्या व्याख्यानामुळे एकेश्वरमताचा परिचय होऊन तसेच मॅक्स म्युलर यांचे ग्रंथ वाचून त्यांची आंतरिक धर्मप्रेरणा प्रबळ झाली. एकेश्वरवादी प्रार्थना समाजातील न्या. रानडे, रा. गो. भांडारकर, का. बा. मराठे यांच्या विचारांचा व सहवासाचा त्यांच्यावर प्रभाव पडून १८९८ मध्ये त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली. त्याचवर्षी ते कायद्याच्या पदवी परीक्षेचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी मुंबईस गेले. मुंबई येथील प्रार्थना समाज व कोलकत्याचा ब्राह्मो समाज यांनी शिंदे यांची शिफारस केल्यावर ब्रिटिश ॲन्ड फॉरेन असोसिएशनने त्यांची ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजात धर्मशिक्षणासाठी निवड केली. १९०१ ते १९०३ ही दोन वर्षे त्यांनी मँचेस्टर कॉलेजात तौलनिक धर्मशास्त्र, पाली भाषा व बौद्ध धर्म, ख्रिस्ती धर्मसंघाचा इतिहास, समाजशास्त्र या विषयांचा अभ्यास केला. भारतात येण्यापूर्वी १९०३ च्या सप्टेंबरमध्ये ॲमस्टरडॅम येथे भरलेल्या त्रैवार्षिक आंतरराष्ट्रीय उदारधर्म परिषदेस ब्राह्मो समाजाचे भारतातील प्रतिनीधी म्हणून उपस्थित राहून ‘हिदुस्थानातील उदारधर्म’ या विषयावरील निबंध त्यांनी सादर केला. १९०३ च्या अखेरीस मुंबई प्रार्थना समाजाचे धर्मप्रचारक म्हणून त्यांनी कार्यास आरंभ केला.

तेव्हा प्रस्तुत शोधनिबंधातून त्यांच्या अनेक सामाजिक कार्यांपैकी अस्पृश्यता निवारण कार्याचा सांगोपांग वेध घेण्याचा मनोदय आहे.

**अस्पृश्यता निवारणाचे कार्य –**

महर्षी शिंदे हे प्रार्थना समाज व ब्राह्मो समाजाचे कार्य करीत असताना संपूर्ण भारत पायी फिरल्यामुळे खेडेगावातील अस्पृश्य समाजाची दयनियता त्यांना अनुभवण्यास मिळाली होती. भारतीय समाज आणि समाजव्यवस्था समजून घेतली होती. याचवेळी त्यांनी अस्पृश्यतेचे मूळ शोधण्याचे ठरविले. केवळ वर्णव्यवस्थेच्या काल्पनिक धोरणावरून समकालीन अस्पृश्यतेची उत्पत्ती लावत न बसता तिचे ग्रामव्यवस्थेशी असलेले नाते, धार्मिक ताणतणावाचे त्या अमानुष प्रथेला मिळालेले योगदान, समाजाने हीन मानलेल्या या जातींच्या पूर्वसंचिताची चिकित्सा, अस्पृश्यतेच्या प्रथेचा विकासक्रम, ग्रंथांमधून करण्यात आलेले वर्णन इत्यादी सर्व गोष्टींमधून अस्पृश्यतेचा जन्म शोधण्याचा प्रयत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला. सर्वप्रथम पुणे येथे महात्मा फुले यांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास प्रारंभ केला होता. हे कार्य विस्तारीत करण्याचे महान कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. जातिभेद, दास्य, वर्णश्रेष्ठत्व यांमुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता दूर करण्यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रयत्न केला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी हिंदुस्थानातील विविध प्रांतांचा दौरा केला. मात्र या पहिल्या दौऱ्यात प्रथमच त्यांना भारतीय जीवनाचे, तेथील लोकस्थितीचे जे स्वरूप पाहावयास मिळाले ते त्यांना निश्चितपणे बोधकारक वाटले. अहमदनगर जिल्ह्यातील भिंगार या गावामध्ये ते एकदा अस्पृश्यांच्या सभेला हजर राहिले होते, तेव्हा त्यांनी त्यांच्या हालअपेष्टा ऐकून आपले जीवन अस्पृश्योद्धाराला वाहून घेण्याचे ठरविले. सर्वसामान्य माणसे धर्माच्या बाबतीत, मूर्तिपूजेच्या बाबतीत कसा विचार करतात, हे दिसून आले. हिंदुस्थानातील लोकजीवनात झालेले विविध संस्कृतीचे मिश्रण व त्यावर पडलेले पाश्चात्त्य संस्कृतीचे आवरण ध्यानात आले.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यतेविषयीचे विचार व कार्य –**

अस्पृश्यता ही आर्यपूर्व संस्कृतीतून भारतात आली असावी. भारतीय अस्पृश्यतेचे मूळ शोधीत असताना ही अस्पृश्यता आर्यपूर्व असावी, असे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना वाटत होते. याला पुरावे म्हणून त्यांनी दोन गोष्टींचा उल्लेख केला आहे. पहिला पुरावा असा की, आपण उत्तरेकडून दक्षिणेकडे जसेजसे जातो. तसतशी अस्पृश्यतेला अधिक धार प्राप्त होते. यावरून अस्पृश्यता ही मुळांत दक्षिणेकडे व आर्यपूर्व असावी, असे त्यांना वाटते. शिवाय वाङ्मयीन पुरावे शोधले तरी आर्यांच्या आदी प्रारंभीच्या वाङ्मयाकडून अलीकडे बुद्धकाळाकडे येऊ लागतो तसतसे यासंबंधीचे उल्लेख जास्त प्रमाणावर आढळून येतात. यावरूनही अस्पृश्यता आर्यपूर्व असावी, असे त्यांनी सूचित केले.

महर्षींनी अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी अस्पृश्य मानले गेलेल्या लोकांच्या घरी स्वतः राहून त्यांच्या जगण्याची, घरगुती चालीरीतींची व्यक्तिगत आवडीनिवडींची खाण्यापिण्यांची, कपड्यालत्यांची, चांगल्यावाईट सवयींची परंपरांची अनुभूती घेऊन आपल्या संशोधनात्मक सर्वेक्षणाला प्रत्यक्षार्थवादी सूक्ष्म अध्ययनाची जोड दिली. अस्पृश्यता निवारण हे धर्मकार्य आहे असे समजून मी ते स्वीकारले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मराठा समाजातील होते. त्यांच्या या कार्यामुळे, वागण्यामुळे मराठा समाजाला अपमानित झाल्यासारखे, भ्रष्ट झाल्यासारखे वाटू लागले. मराठा समाजाने शिंदे यांना बहिष्काराची भीती घातली तरीसुद्धा न डगमगता कार्य चालूच ठेवले अस्पृश्यांची स्थिती त्यांची मालकी नवीन शेतमालकाकडे जात असे. ही कुळे जनावराप्रमाणे इतरांना भाड्याने दिली जात असत. एवढेच नव्हे तर अशा गुलामांची रीतसर खरेदी-विक्री होत असे.

**डिप्रेस्ड क्लास मिशन –**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना मिळाली होती. त्याचप्रमाणे त्यांनी अस्पृश्योद्धारासाठी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' (निराश्रित साहाय्यकारी मंडळ)ची स्थापना १८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे एल्फिन्स्टन रोडवर शेठ दामोदरदास सुरवडवाला यांच्या उदार देणगीतून केली. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या वतीने प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळा सुरू करणे, गरीब विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनाची तयारी करण्यासाठी उद्योगशाळा चालविणे, विद्यार्थी वसतिगृहे, मोफत दवाखाने, धर्म व नीती शिक्षणाच्या साप्ताहिक शाळा, जातिभेद व मूर्तिपूजा यांना वगळून चालविण्यात येणारी उपासनालये असे अनेक उपक्रम मिशनच्या वतीने चालविण्याचे निश्चित झाले. त्याचाच पहिला भाग शेठ दयाराम यांच्यासारख्या उदार लोकांच्या देणगीतून मुंबईत सुरू झालेले 'निराश्रित सेवासदन' होय मिशनची पहिली शाळा १९०६ मध्ये एल्फिन्स्टन रोडवर सुरू झाली. मिशनने सुरुवातीपासूनच कटाक्षाने एक दंडक पाळला होता आणि तो म्हणजे मिशनमध्ये काम करणाऱ्यांनी अस्पृश्य लोक राहतात तेथेच आपल्या कुटुंबासह त्या सर्व लोकांशी मिळूनमिसळून राहावे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी या संदर्भात त्याकाळात दाखविलेले धाडस, त्यांच्या कार्यात सहभागी झालेली त्यांच्या कुटुंबातील माणसे, त्या सर्वांनी अत्यंत थोर अंतःकरणांनी अस्पृश्याची केलेली सेवा सुश्रूषा तर सर्वश्रुत व आदरणीय अशी आहे. विशेष म्हणजे या कामात सहभागी झालेले त्यांचे साथीदार सय्यद अ. कादर, त्यांची बहीण व तिचे पती यांच्यासह ते ग्लोब मिलच्या परिसरात अस्पृश्यांच्या वस्तीत राहू लागले.

या संस्थेमार्फत वरील संस्थेचे काम करण्यासाठी वरिष्ठ वर्गातील जे कोणी पुरुष किंवा स्त्रिया कामासाठी तयार असतील त्यांच्यामध्ये या अस्पृश्य वर्गातील

गरीब स्त्रियांबरोबर काम करण्याची पात्रता यावी म्हणून त्यांच्या प्रशिक्षण वर्गाची सोय करणे, या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात व्याख्याने, कीर्तने, उपासना, लहान मुलांसाठी सहलीचे आयोजन त्यांना मिठाई वाटप. वडीलधाऱ्यांच्या सहलीची योजना, गावातील लोकांकडून नवे जुने कपडे गोळा करून त्यांचे गरजूंना वाटप करणे, गरीब स्त्रियांसाठी विशेषतः विधवांसाठी शिवणकामाचे वर्ग, लोकांना स्वच्छतेचे शिक्षण देणे, मुलांना अंघोळ घालणे इत्यादी उपक्रमाचा समावेश करण्यात आला होता. असे योजनाबद्ध व सेवाभावीवृत्तीने प्रेरित होऊन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह कामाला प्रारंभ केला.

संस्थेच्या कामासाठी आर्थिक मदत म्हणून सर्वसामान्य माणसाकडून निधी जमा करण्यासाठी रूपी फंड, कापड फंड, तांदूळ फंड, पेटी फंड इत्यादी अभिनव व लोकांच्या संवेदना प्रत्यक्ष कृतीत रूपांतरित करणारे उपक्रम सुरू केले. या उपक्रमाबरोबरच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिशनच्या मदतीसाठी अनेक प्रतिष्ठित लोकांच्याकडून देणग्या मिळविल्या. अशाप्रकारे डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना केल्यानंतर तिने ख्रिस्ती मिशनऱ्याप्रमाणे अस्पृश्यांच्या जीवनामध्ये क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणून त्यांचा विकास साधला होता. अस्पृश्यता नष्ट करून अस्पृश्य आणि दलित समाजाची गरिबी दूर व्हावी म्हणून शिक्षण प्रसार, नोकरी मिळवून देणे, सामाजिक समस्या सोडविणे, सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत धर्म व नागरिकता इत्यादी गुणांचा प्रसार करून डिप्रेस्ड क्लास मिशनच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारण व दलितोद्धार कार्य सुरू केले.

**अस्पृश्यता निवारक संघामार्फत केलेले कार्य –**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाचे जे कार्य सुरू केले होते या कामासाठी पुणे येथे सन १९१७ मध्ये अस्पृश्यता निवारक संघाची स्थापना करण्यात आली. हा संघ स्थापन करण्यापाठीमागचा हेतू म्हणजे मुंबई–पुणे येथे अस्पृश्यतेच्या संदर्भात काम करणाऱ्या सर्वच कार्यकर्त्यांचे संमेलन व्हावे आणि या कार्यात बहुजन समाज आणि अस्पृश्य बांधवांनी सहकार्याने प्रयत्न करावेत, हा होता. त्यामुळे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी संघाच्या स्थापनेनंतर अस्पृश्य वर्गाच्या पुढाऱ्यांची एक अखिल भारतीय परिषद २३ मार्च १९१८ रोजी मुंबईला घडवून आणली. या परिषदेत पुढील ठराव पास करण्यात आले होते. पहिला ठराव हा निकृष्ट वर्गावर लादलेली अस्पृश्यता यापुढे ताबडतोब काढून टाकण्यात यावी आणि या कार्यासाठी प्रत्येक प्रांतातील वजनदार व विचारी कार्यकर्त्या पुढाऱ्यांनी एक अस्पृश्यता निवारक जाहिरनामा काढून निकृष्ट वर्गास शाळा, दवाखाने, न्याय कचेऱ्या सर्व सार्वजनिक संस्थांत तसेच विहिरी, तळी, पाणवठे, देवालये, करमणुकीची ठिकाणे येथे कोणत्याही प्रकाराचा प्रतिबंध

न राहता पूर्ण मोकळीक करून द्यावी, असे या परिषदेचे मत होते. दुसरा ठराव पास झाला तो म्हणजे निकृष्ट वर्गावर लादलेले धार्मिक निर्बंध ज्यावेळी नाहीसे होतील त्याचवेळी त्याच्या उन्नतीचे कार्य अत्यंत झपाट्याने व यशस्वीपणे पार पडेल. याकरिता ही सभा हिंदू धर्मसंस्थाधिपतीकडून पुढील कामे करून घेत आहे. अस्पृश्यता नाहीशी करण्याकरिता धार्मिक आज्ञापत्रे काढणे, हिंदू धर्मावर अस्पृश्यांची श्रद्धा दृढ करण्याकरिता धर्मशिक्षक नेमून त्यांच्यात हिंदू धर्मतत्त्वांचा प्रसार करणे, हिंदू लोकांकडून सर्वसाधारण धार्मिक सभांत भाग घेण्याची अस्पृश्यांना परवानगी देणे.

**अस्पृश्यांच्या उन्नतीकरिता सरकारकडे निवेदन –**

सन १९१६ साली सरकारकडे अस्पृश्य मंडळीच्या सुधारणेकरिता महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी वाङ्मयीन शिक्षणाबरोबरच औद्योगिक शिक्षणाची जोड दिली पाहिजे, स्वाभिमान, आत्मसन्मान व आत्मविश्वास तयार होईल असे नैतिक शिक्षण दिले पाहिजे, अस्पृश्याकरिता स्वतंत्र शाळा चालविण्यातील अनेक गैरफायदे नाहीसे करण्यासाठी सामान्य घटकातून त्यांना हक्काने प्रवेश दिला गेला पाहिजे. खेड्यांत व शहरांत वाढत्या प्रमाणावर प्राथमिक शाळा, किमान एक औद्योगिक शाळा, मुख्य केंद्रात वसतिगृहे, उच्च शिक्षणाकरिता खास शिष्यवृत्त्या या संस्था सरकार, नगरपालिका, लोकल बोर्ड अगर खासगी संस्था यांच्यामार्फत चालवण्यास खासगी अनुदाने द्यावीत, सर्व प्रयत्नात परस्पर सहकार्य तयार करणे अशा सूचना केल्या. तसेच अस्पृश्यांच्या शाळांची चौकशीसाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अस्पृश्य वर्गात 'सहकारी सोसायटी'ची वाढ करावी, त्यांना सरकारने सवलती द्याव्यात, महत्त्वाच्या ठिकाणी संस्थेच्या प्रतिनिधीची एकत्र कमिटी नेमावी, या कमिटीत म्युनिसिपालिटी, लोकल बोर्ड, सहकारी शिक्षण खाते, वैद्यकीय खाते, यांनी एकत्रित बसून अस्पृश्य वर्गाच्या प्रगतीसाठी उपाययोजना सुचवाव्यात, त्यांची अंमलबजावणी करावी. यातून महर्षी शिंदेनी अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी, उन्नतीसाठी अस्पृश्यांची प्रगती होणे महत्त्वपूर्ण मानले, त्याच प्रगतीतून अस्पृश्यता नष्ट होऊ शकते असा त्यांचा विश्वास होता. त्याच विश्वासाची व अस्पृश्य मुक्तीची कास मनात धरून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सरकारला निवेदने देऊन सरकारचे लक्ष अस्पृश्यतेकडे खेचून अस्पृश्यमुक्तीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

वरील प्रश्नाशिवाय महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सन १९१३ मध्ये एक शिष्टमंडळ गव्हर्नरसाहेबांच्या भेटीसाठी घेऊन गेले होते. या शिष्टमंडळात मांग जातीचे श्रीपतराव चांदणे यांचा समावेश होता. त्या काळात कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली सरकार कष्टकरी वर्गाच्या चळवळी चिरडून टाकत होते. त्यावेळच्या

इंग्रज पोलीस अधिकाऱ्यांनी मांग व इतर काही जमातींना गुन्हेगार ठरवून त्यांच्या पाठीमागे हजेरीचा ससेमिरा लावला होता. या हजेरीच्या जाचातून मांग जातीची सुटका व्हावी यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे श्री. चांदणे त्यांच्यासह पुणे मुक्कामी गव्हर्नरची भेट घेऊन त्यांच्यापुढे या जमालीच्या वतीने खालील तक्रार मांडली व त्यांना या जाचातून सोडविण्याची रास्त मागणी केली. ते म्हणतात, मांग गरीब आहेत. त्यांना कसलाही धंदा नाही, उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हेगारीचा शिक्का मारला गेला आहे. यातून जर या जमातीची सुटका करावयाची असेल तर या लोकांना जगण्यासाठी शेतीचा तुकडा द्यावा. कारण तो धंदा जमण्यासारखा आहे. सातारा जिल्ह्यात बरीच पडीक जमीन आहे, तेथे जर या मांगांची वसाहत केली. त्यांना उपजीविकेचे साधन म्हणून जर जमिनीचा तुकडा दिला तर निश्चितच त्यांच्यावरील गुन्हेगारीचा शिक्का जाईल. गव्हर्नरने या कामाची दखल घेऊन त्यासाठी एक डी.सी. कमिशन नेमले. या कमिशनने १९१४ साली एक ठराव केला. त्यानुसार निदान शंभर कुटुंबाची सोय होईल अशी एक वसाहत प्रयोगादाखल सातारा जिल्ह्यात उघडावी, त्यासाठी सलग ४०० एकर जमीन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दाखवावी व शासनाने ती जमीन मांगांच्या वसाहतीसाठी द्यावी. अशाप्रकारे गव्हर्नरच्या समितीने सोपवलेली जबाबदारी त्यांनी मोठ्या तत्परतेने पार पाडली. या कामी त्यांनी आपल्या सेवाभावी कार्यतत्पर व चिकाटीच्या स्वभावाला अनुसरून जिल्ह्याच्या अधिकाऱ्यापासून ते गव्हर्नरापर्यंत अनेकांची सहानुभूती मिळविली. आपल्या या कामात त्यांनी श्री. चांदणे यांना तेवढ्याच सन्मानाने घेतले होते; परंतु सरकारने या कामात पुढे लक्ष न घातल्याने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केलेले प्रयत्न वाया गेले.

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्या परंपरेतील काम केल्याचे दिसून येते. राजर्षी शाहू महाराजांनी वेठबिगारीची पद्धत बंद केली होती. त्याचप्रमाणेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मांग वसाहत करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले होते.

**राखीव मतदारसंघांचा पुरस्कार –**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण कार्य करताना सर्वांचे सहकार्य घ्यावे व समन्वय साधून एकतेतून या प्रश्नाची उकल करावी, याचदृष्टीने १९१९ साली साक्ष दिली. त्यानुसार सर्वसाधारण मतदारसंघासाठी मतदान पात्रतेबाबत पुरुषाचे वार्षिक उत्पन्न ३०० रुपये व व्हर्नाक्युलर फायनल पर्यंतचे पुरुषाचे शिक्षण असावे, या अटी होत्या. परंतु अस्पृश्य वर्गाची बिकट अवस्था लक्षात घेऊन त्यांच्यासाठी ह्या अटी शिथिल कराव्यात असे त्यांनी प्रतिपादन केले. अस्पृश्यांसाठी वार्षिक उत्पन्न रु. १४४ अथवा इयत्ता मराठी चौथीपर्यंतचे

शिक्षण एवढ्याच अटी मतदान पात्रतेच्या असाव्यात, अशी मागणी करून पुढे ते म्हणतात की, या वर्गातील प्रतिनिधिची प्रांतिक कायदे कौन्सिल व स्थानिक स्वराज्य संस्था यावर त्यांच्या स्वतंत्र राखीव मतदारसंघातून त्याच जातीच्या प्रतिनिधीची निवड केली तर त्यांच्या दृष्टीने फारच हितावह ठरेल.

मुंबई इलाख्यात कायदे कौन्सिलात १५० जागा असतील असे गृहीत धरले तर पाच जागा या वर्गासाठी राखीव असाव्यात. कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, सिंध आणि मुंबई शहर या पाच विभागातून पाच प्रतिनिधींची निवड व्हावी ही निवड अस्पृश्य मानल्या गेलेल्या वर्गातील प्रतिनिधीच्या मुद्दाम तयार केलेल्या त्या वर्गातील मतदारांच्या मतदारसंघातून करण्यात यावी. अशा प्रकारचे स्वतंत्र राखीव मतदारसंघ निर्माण करणे हे अशक्य नाही. उलट त्या वर्गाच्या दृष्टीने ते हितावह होते. त्याचप्रमाणे त्यांना राजकीय शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने तसेच सामाजिक उन्नती होण्यासाठी ते एक पुढचे पाऊल ठरेल.' व्हायकोम सत्याग्रह उत्तर व मध्य भारताच्या तुलनेत दक्षिण भारताचा भाग आचारविचारांच्या बाबतीत अत्यंत सोवळा होता. त्यातल्या त्यात पूर्वीच्या मलबार प्रांतात तर अस्पृश्य गणल्या गेलेल्या लोकांवरच फारच जाचक अटी लादलेल्या होत्या. त्रावणकोर संस्थानच्या व्हायकोम गावातील देवळात व जाण्यायेण्याच्या रस्त्यावर अस्पृश्य लोकांना जाण्यास कायदेशीर मनाई होती. मात्र देवळाच्या रस्त्यावरील असणाऱ्या ख्रिस्ती व मुसलमान वगैरे परधर्मीयांना कोणतीही मनाई नव्हती. एवढेच नव्हे तर देवळाच्या बाहेरच्या व आतील मंडपात अशा परकीयांना मोठ्या प्रतिष्ठितपणे नेण्यात येत असे. हा मंदिरप्रवेश फक्त हिंदूमधील अस्पृश्यांचा प्रश्न होता. हा अन्यायकारक प्रश्न सोडवावा म्हणून व्हायकोमला ३० मार्च १९२४ रोजी मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रहाला प्रारंभ झाला होता. लाहोरचे स्वामी श्रद्धानंद हे आर्य समाजाच्या वतीने सत्याग्रह करण्यासाठी आले होते. कालिकतचे मंजिरी रामय्या हे थिऑसॉफीच्यावतीने सत्याग्रहात भाग घेण्यासाठी आले होते हा सत्याग्रह होण्यापूर्वी ब्राह्मो समाजाच्यावतीने हे धुरीणत्व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याकडे आले.

**अस्पृश्यांची शेतकी परिषद पुणे (१९२६) –**

३० ऑक्टोबर १९२६ रोजी पुणे येथे भरलेल्या शेतकी परिषदेचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे अध्यक्ष होते. सरकारने भरविलेल्या शेतकी प्रदर्शनाच्या जोडीनेच ही अस्पृश्यांची शेतकी परिषद भरविण्यात आली होती. या अस्पृश्यांच्या शेतकी परिषदेच्या हेतूबद्दल त्यांनी साशंकता प्रकट केली. कारण जमिनीचे मालक अथवा शेती कसणारे यापैकी कोणत्याही नात्याने अस्पृश्यांची गणना शेतीसंबंधीच्या वर्गामध्ये करता येत नाही. एवढेच नव्हे तर त्यांची गणना

शेतमजुरामध्ये होत नाही असे त्यांनी निक्षून सांगितले. इतर इलाख्यात अस्पृश्य समाजाची स्थिती शेतीवरच्या बिनमुदतीच्या गुलामासारखीच आहे असे नमूद करून अस्पृश्याला शेतकरी म्हणणे म्हणजे त्याच्या दुःखावर डागण्या देण्यासारखे आहे, असे त्यांनी विधान केले. अस्पृश्यांचा मूलतः प्रश्न सामाजिक–धार्मिक व विशेषतः राजकीय स्वरूपाचा आहे, असे त्यांनी सांगितले, मात्र प्रांतातल्यापेक्षा महाराष्ट्रात अस्पृश्यांची जमीन मालकीसंबंधी स्थिती किंचित बरी आहे असे त्यांनी भाषणात नमूद केले. वस्तुतः अस्पृश्य हे दंडकारण्याचे मूळ मालक होते, ही जाणीव त्यांना देऊन तुम्ही सर्वांनी एकी करून जमिनीवरील गेलेली सत्ता मिळविली पाहिजे. असे त्यांना आवाहन केले.

अशा प्रकारे या शेतकी प्रदर्शनात जी शेतकी परिषद आयोजित करण्यात आलेली होती. या परिषदेमध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विद्यमान समाजस्थितीची चर्चा केली. त्याचबरोबर दलित उद्धाराच्या चळवळीची भावी दिशाही त्यांनी आपल्या भाषणात सूचित केली. या परिषदेत त्यांनी अस्पृश्यता ही प्रधान आणि शेतकी ही गौण गोष्ट आहे अशी मांडणी केली. महाराष्ट्रात जमिनीवर मालकी हक्क मिळविण्यास अस्पृश्यांना बंदी नसली तरी अडसर आहे. दारिद्र्याचा व धंदेवाईक सवलतीच्या अभावाचा. या संदर्भात जे त्याला साक्षीदार आहेत. असे एक बोलके उदाहरण ते देतात, ती घटना म्हणजे १९१४ साली मांग लोकांची वसाहत स्थापन करण्यासाठी म. शिंदे यांनी जिवापाड कष्ट घेतले, परंतु या मांग लोकांना पाय टेकविण्यासाठी आपल्या हक्काची जमीन मिळाली नाही, तसेच या परिषदेचेही होणारे सरकार नुसते नोकरशाही व जमीनदारांचा खेळ निमूटपणाने पाहात बसणार.

**समारोप –**

उपरोक्त सर्व कामाची पाहणी केली तर लक्षात येते की, अज्ञानात व गरिबीत अडकलेल्या अस्पृश्यांना शिक्षण, आश्रय, रोजगार, औषधोपचार, त्यांची व्यसनातून सुटका करण्यासाठी भजनीमंडळे मनोरंजनाचे इतर प्रकार अशी सर्वांगाने तयारी केली होती. कारण मिशनचा प्रमुख हेतू हा होता की, अस्पृश्य लोकांत त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नाने सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणाव्यात. बहीण जानाक्का हिने पनवेल येथील मुख्याध्यापिका पदाचा राजीनामा देऊन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सुरू केलेल्या कार्यात सहभागी झाल्या तर आई–वडील जमखंडीवरून आपल्या मुलाने सुरू केलेल्या कार्यात सहभागी होण्यासाठी मुंबईला आले. यावरून महर्षी रामजी शिंदे यांना समाजकार्याविषयी असणारी आत्मियता लक्षात येते.

**संदर्भ –**

१. कदम शंकरराव, मुलाटे उषा – महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, औरंगाबाद, २०००.

२. चव्हाण रा. ना., महर्षी शिंदे यांच्या आठवणी, वाई, १९७५.
३. दिघे पी. डी., दोन कर्मवीर, कोल्हापूर, १९९२.
४. पवार गो. मा., विठ्ठल रामजी शिंदे, नवी दिल्ली, १९९०,
५. बाबर कृ. भा., कर्मवीर विद्यार्थी, भिलवडी १९३०. लेखक – गो. मा. पवार

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे देशाच्या जडणघडणीतील योगदान

**– प्रा. युवराज रावजी साबळे**

**गोषवारा –**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात संत व समाजसुधारक पदाला पात्र अशी व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. संत तुकडोजींनी आपल्या साहित्यातून राष्ट्रप्रेमाची जागृती केली. त्यांचे साहित्य हे त्यांच्या स्वानुभवातून निर्माण झाले होते. अध्यात्म आणि देशप्रेम यांची सांगड त्यांनी आपल्या साहित्यातून घातली. देशाला देवाचे व्यापक रूप देऊन देशसेवेसाठी झटले. तुकडोजी हे मानवतेचे पुजारी, विवेकनिष्ठ, एकेश्वरवादी, परिवर्तनवादी, स्वच्छतावादी होते. केवळ भारत देशातच नव्हे; तर जपानमध्येसुद्धा विश्वबंधुत्वाची कल्पना पटवून दिली. तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड व जातिभेद दूर करून मानवताधर्माचा पुरस्कार केला. स्त्रियांचाही आदर केला. त्यांच्या विचारांची आज अत्यंत गरज आहे.

**प्रस्तावना –**

महाराष्ट्राची भूमी ही पुण्यवंताची भूमी, साधू–संत आणि सत्पुरुषाची, विचारवंतांची भूमी. त्या त्या शतकात त्यांनी आपल्या ओवी, अभंग, भजन–कीर्तनातून समाजजागृती करून लोकमानसावर आपला एक स्वतंत्र ठसा उमटवला. तन–मन अर्पून देशसेवा केली. त्यापैकी एक महान समाजसुधारक, स्वातंत्र्यसेनानी, प्रतिभावान कवी व गायक म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आज अण्णा हजारे व सिंधूताई सपकाळ ही दोन माणसे सोडली तर तन, मन अर्पून समाजसेवा करणारी व्यक्ती शोधूनही सापडत नाही; पण आपल्या महाराष्ट्रात विसाव्या शतकात एक महान राष्ट्राभिमानी व समाजसुधारक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी जो लौकिक मिळविला तो अतुलनीय आहे. प्रस्तुत शोधनिबंधात तुकडोजींनी आपल्या कार्यकर्तृत्वाने भारत देशाच्या जडणघडणीस कसा हातभार लावला याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक कार्याद्वारे राष्ट्रबांधणी –**

आपले विचार व भजनातून आदर्श ग्राम व आदर्श नागरिक घडविण्यासाठी

आयुष्यभर परिश्रम करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जन्मगाव पावली शहीद आदर्श आहे. या गावाला निर्मल ग्राम व आय.एस.ओ. ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाला आहे. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ मध्ये यावली शहीद येथे झाला. ते नऊ वर्षांचे असताना त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात चंद्रपूर जिल्ह्यातील गोळा या गावापासून केली. महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन गावातील सात जणांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी शहीदत्व पत्करले. विश्वाच्या गोष्टी करण्यापेक्षा आपल्या देशाच्या अन् विशेषतः आपल्या गावाच्या गोष्टी करण्याचा ध्यास राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी घेतला. ग्रामोद्धार, ग्रामविकास, स्वावलंबी ग्रामनिर्मिती हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. अनेकात एकत्व शोधताना खेड्यांमध्ये या संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न केला.

देश गुलामगिरीत असताना राष्ट्रसंतांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले. गावागावातून कीर्तन करून राष्ट्रभक्ती जागृत केली. ग्रामोन्नतीचा मार्ग दाखविला. राष्ट्रसंताचे विचार ऐकायला गावोगावी तोबा गर्दी होत असे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजानी सामुदायिक प्रार्थनेचा पायंडा पाडला. समाज एकत्र यावा कोणात भेदभाव नसावा. सर्व जातिधर्माने समाजात एकत्र नांदावे ही त्यामागची भावना होती. यावर आधारित ग्रामोन्नतीचा संदेश देणारी अड्याळ टेकडीही विलोभनीय दिमाखदार प्रेरणादायी निर्मिती केंद्र बनले. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरीतील अड्याळ टेकडीवरील नटलेली या परिसंत तुकडोजी महाराजांनी २१ जुलै १९६७ गुरुपौर्णिमच्या मुहूर्तावर अध्यात्म केंद्राची स्थापना केली. या केंद्रात गुरुपद्गुफा सत्संगभवन, ध्यानयोग, तट, ग्रामोद्योग, कागद, ग्रामसंरक्षण दल आत्मसुसंधानयोग, निसर्गोपचार व ग्रामगीता विद्यापीठ, जीवनशिक्षण विभागांतर्गत ग्रामस्वावलंबन, स्वावलंबी दृष्टिकोनातून तेल पाणी, वस्त्रोद्योग, गुरुकुलमातीया भाडी, गोअकांवर आधारित पंचगव्य चिकित्सा या वस्तु आहेत. येथील उद्योग विक्रीसाठी नाही तर स्वावलंबनासाठी आहेत. येथील गुरुकुलात विद्यार्थी पंचवार्षिक जीवन शिक्षण घेताना ग्रामगीतेचा उद्देश राष्ट्रसंतांना अभिप्रेत होता.

१९३५ साली तुकडोजी महाराजांनी सालता येथे महारुद्र यज्ञ केला आणि त्यात सुमारे दहा लाख लोकांना अन्नदान केले. तुकडोजी महाराज अन्नाची नासाडी करीत आहे. अशी तक्रार त्यावेळी महात्मा गांधीजींकडे मोचे अँड. अकर्ते यांनी केली. महात्मा गांधी हे बुवाबाजीच्याही विरोधात होते आणि दरिद्रनारायणचे सेवक होते, त्यामुळे ही अन्नाची नासाडी त्यांना सहन न झाल्यामुळे त्यांनी तुकडोजी महाराजांची भेट घडवून आणण्यास सांगितले. ३० मार्च १९३६ रोजी नागपूर भंतोली येथे तुकडोजी महाराज आणि महात्मा गांधीजींची पहिली भेट झाली. या भेटीतच महात्मा गांधींना लक्षात आले की, तुकडोजी बुवाबाजी

करूच शकत नाही. त्यांच्यात दिव्यतेज आहे हे त्यांना दिसले; आणि त्यांनी त्यांना भजन ऐकण्याची विनंती केली. ५ मे १९३६ रोजी पवनार आश्रमात आचार्य विनोबांनी महाराजांना खादीयात्रा संमेलनात सहभागी होण्यासाठी बोलावले. त्या संमेलनाच्या व्यासपीठावर महात्माजीने तुकडोजी महाराजांना आपल्यासोबत बसविले. एका महात्म्याने दुसऱ्या महात्म्याचा सन्मान केलेला उपस्थित १० हजार प्रेक्षकांनी पाहिला. महात्म्यांचे आणि महाराजांचे संबंध अतूट होते. महाराजांच्या सेवाग्राम आश्रमात १४ जुलै ते १३ ऑगस्ट पर्यंत सत्संग होता. १३ ऑगस्टला महाराजांनी महात्मा गांधींचा निरोप घेतला आणि गांधीजींनी आपली आठवण म्हणून महाराजांना स्वतःच्या सूत कातण्याचा चरखा दिला.

लोकांचे प्रबोधन करायचे तर ते एका जागी आणण्यासाठी भजन सप्ताह यज्ञयाग, महोत्सव यांसारख्या गोष्टींचे आयोजन केले पाहिजे, ते राजांनी त्यांना दिले महात्माजींची जीवनप्रणालीसुद्धा महाराजांनी अनुभवली. खादी प्रत महाराजांनी १९३३ आत्मसात केली होती. सामाजिक प्रवाहात महाराजांनी कार्यरत राहण्यासाठी सहभोजनचे, महाप्रसादाचे, गोपालकाल्याचे कार्यक्रम सुरू केले. आणि याचसोबत राष्ट्रीय कार्य प्रवाहातही सहभागी होण्याचा निश्चय केला. त्यांनी आपल्या खंजिरीद्वारे राष्ट्रीय बोल जनतेपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. या ज्ञानसप्ताहात युवक युवतींना शिस्तीत बसणे, उठणे, प्रार्थना करणे, शोभायात्रा काढणे याचे प्रयत्न पाठ देण्यात आले. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन आपसांतील भेदभाव मिटवावेत याचे प्राथमिक धडे या ज्ञानसप्ताहात जनतेला मिळाले. महाराजांनी आपले विचार दुसऱ्यावर कधीही लादले नाहीत, तर ह्रदयपरिवर्तन व्हावे यासाठीच प्रयत्न केले. संत तुकडोजी महाराजांनी स्वतः कधीच भेदाभेद केला नाही. उच्च-नीच हा विचारच त्यांना मान्य नव्हता. ते अद्वैतवादी होते. महाराज हे मानवतेचे उपासक होते. 'मानवताही पथ मेरा' हे त्यांच्या रोमारोमात रुजले होते. दुसऱ्यावर आपले विचार लावून परिवर्तन करायचा त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही. सर्वधर्माच्या सर्व पंथसंप्रदायाच्या सर्व जातिजमातीच्या लोकांत राहूनच आपल्या खंजिरी भजनाच्या माध्यमातून आपल्या ध्येयाकडे जायचे असा मनाशी निर्धारच केला. राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रयत्न करणे हेच आपले कर्तव्य आहे. भारतीय संत महात्म्यांनी हेच कर्तव्य केले. आपल्याला हेच करायचे आहे असे त्यांना वाटे. महाराजांनी १९४० सालीच नवयुग बनवण्याचे स्वप्न पाहिले होते. त्यासाठी सर्व भारतीयांना संघटित करण्याचे आवाहन केले होते. यावरून त्यांच्या विचारांची दिशा स्पष्ट होते. तुकडोजी महाराज परात्पर कोटीचे संत होते, परंतु त्यांनी आपली अद्वैतस्थिती बाजूला ठेवून देशसेवेच्या कार्यात आपले तनमन लावले. देशाची गुलामगिरीची अवस्था पाहून 'म्हणोनिया मागे फिरलो द्वारी झोपडीत

शिरलो.' असे त्यांनी म्हटले आहे. झोपडी झोपडीत जाऊन महाराजांनी लोक जागरण केल्याचा इतिहास आहे.

तुकडोजी महाराजांना त्यांच्या कार्यामुळे, विचारांमुळे डॉ. राजेंद्रप्रसादांनी राष्ट्रसंत करणे संबोधताच सर्व लोक महाराजांना राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज असेच म्हणू लागले.

**भजनांतून जगजागृती –**

महाराजांनी भजनांतून राष्ट्रधर्माचे पाठ दिले. काळाप्रमाणे भजनाचा अर्थ बदलणे अत्यावश्यक आहे हे त्यांनी ओळखले होते. भजन हा एक जीवनमार्ग आहे. जेव्हा कर्तव्य करून मनुष्य देवाजवळ जाईल तेव्हाच त्याची भजनसाधना परिपूर्ण होईल. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले, त्यावेळी राष्ट्रसंतांनी भारतीय जनतेला भजनाचा अर्थ जाहीरपणे समजावून सांगितला. महाराष्ट्रात युद्धकाळातच 'राज्य नागरिक संरक्षण समिती' गठित करण्यात आली. संरक्षण कार्य प्रभावशाली व्हावे यासाठी १२ उपसमित्या स्थापन करण्यात आल्या. त्यापैकी राष्ट्रीय समिती होती त्यात प्रमुख राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होते. महाराजांनी राष्ट्रीय कार्य केले. महाराजांनी ग्राम जीवनावर आधारित ग्रामगीता लिहिला म्हणून महाराजांना केवळ उन्नती करायची आहे असा समज काही विचारवंत करू लागले, पण महाराजांनी आपल्या खंजरीतून देशाला जागृत करण्याचा प्रयत्न चीनच्या आक्रमणाच्या वेळी केला.

महाराजांना लोकशाही मान्य असल्यामुळे श्रीगुरुदेव सेवामंडळ हे तत्त्व सर्वमान्य करून घ्यावयाचे होते. त्यांना राष्ट्रधर्म जनजागृतीचा व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश घरोघरी नेण्यासाठी प्रयत्न करावयाचा होता. १९६४ साली महाराष्ट्र शासनाने दारूबंदीबाबत धोरणे शिथिल करण्याचे घोषित करता महाराजांनी महाराष्ट्र सरकारच्या धोरणाला विरोध केला. महाराज स्पष्टपणे म्हणाले की दारूबंदी उठवणे म्हणजे महात्मा गांधींचा विश्वासघात करणे होय. जनतेच्या जीवनात स्वतःच विष कालवणे होय. महाराजांनी या विषयावर अनेक भजन, पोवाडे लिहिले. महाराजांनी १९६३-६४ मध्ये अनेक जिल्ह्यांत, प्रत्येक गावी राष्ट्रीय भजनाचे कार्यक्रम केले. भजनाद्वारे त्यांनी देशाचे संरक्षण, अधिक धान्य उत्पादन, निरव्यसनी यावर भर दिला. स्वरचित भजनाद्वारे जनजागरण करून महाराज सर्वांत सेवाभाव वाढविण्यासाठी प्रयत्न करीत होते.

महाराज हे महाराष्ट्रातील विविध धर्मांच्या आणि संप्रदायाच्या कीर्तन प्रवचनकारात मोठ्या उत्साहाने मिसळले; कारण त्यांना या सर्वांना राष्ट्रीय कार्याचे भान होते, आपण सारे प्रथम भारतीय आहोत. आपला धर्म राष्ट्रधर्म आहे केवळ प्रचलित धर्म संप्रदायातील अनुयायात गुंतून न राहता सर्वधर्म समभावाची शिकवण

कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून जनतेला द्यावी यासाठी महाराज धडपड करीत होते.

**निष्कर्ष –**

१. राष्ट्रसंतांचे जीवनकार्य अलौकिक असून महान आहे.
२. राष्ट्रसंतांनी भजन साहित्यात वा माणसाने माणसाशी व आपली उन्नती कशी करून घ्यावी यांचे व्यावहारिक ज्ञान दिले. भजनाद्वारे राष्ट्रजागृती केली.
३. महाराजांची भजने संदेशपर आहेत. समाजाला बदलण्याची मोठी शक्ती त्यात आहे. कर्मकांडापासून माणसाला परावृत्त करणारी आहेत.

**संदर्भ ग्रंथ –**


१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चरित्र आणि कार्य : संपादक मनोहर बनसोडे, नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर २०१२
२. तरुणांचे तुकडोजी : प्रा. डॉ. राम पोडे, राजीव प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९८५
३. भारत भाग्यविधाता राष्ट्रीय माला -प्रा. भालचंद्र त्रिवेदी, राजहंस प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००७
४. महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, ही एन. स्वामी, विद्याभारती प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती २०११.

# पुरोगामी विचारांचे सामाजिक सेवक – मा. व्ही. वाय. (आबा) पाटील

**– प्रा. सतीश अशोक मस्के**

**जीवन परिचय –**

स्वातंत्र्यपूर्व काळात कृष्णा नदीच्या काठी वसलेल्या व संपूर्ण भारतील पहिले रुस्तम ए – हिंद किताब मिळवणारे पैलवान विष्णुपंत चव्हाण यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पैलवान विष्णुपंत नागराळे या छोट्यासा गावामध्ये १३ ऑगस्ट १९४१ रोजी भागिर्थी यशवंत पाटील यांच्या पोटी शेतकरी कुंटुंबात जन्म झाला. आबांचे वडील यशवंत बळवंत पाटील हे नागराळे गावातील एक शेतकरी होते.

आबांचे प्राथमिक शिक्षण प्राथमिक मराठी मुलांची शाळा या ठिकाणी झाले. त्यानंतर माध्यमिक शिक्षणासाठी ते जवळच असणाऱ्या प्रतिनिधी हायस्कूल, कुंडल या ठिकाणी आले. नाना पाटील विद्यार्थी वसतिगृह या ठिकाणी राहून आबांनी सन १९६२ साली आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. याच काळात त्यांना क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्याकडून सामाजिक बांधिलकी, समाजसेवेचे संस्कार व फुले, शाहू, आंबेडकर, कर्मवीर आण्णा, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचे व कार्याचे बाळकडू मिळाले.

माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्यासाठी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा या ठिकाणी प्री. डिग्री (आर्ट) बी. ए ला प्रवेश घेतला. एफ.वाय.बी.ए. ला असताना प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील, प्रा. एन. डी. पाटील (दाजी), डॉ. बी. एस. पाटील, प्राचार्य आर. डी. गायकवाड यांचेकडून आबांना सामाजिक बांधिलकी व सत्यशोधक चळवळीचे संस्कार त्यांच्यावर झाले. याचा फायदा त्यांच्या पुढील जीवनात झाला. आबांनी १९६४ – १९६६ साली राजाराम कॉलेज, कोल्हापूर या ठिकाणी बी. ए. पदवीचे शिक्षण पूर्ण केले व राज्यशास्त्र या विषयाचा पदवीधर म्हणून बाहेर पडले. पण याचा काळात कोल्हापूर पंढरी ही शाहूंच्या विचारांनी पावन झालेली भूमी होती. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात केलेली विविध कामे या सगळ्याचा परिणाम आबांच्या वैचारिक जडणघडणीवर झाला.

आबांच्यावर थोर व्यक्तींच्या प्रभावाचे पडसाद त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर झाले. गावातील गरीब लोकांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे, त्यांची मुले शिकली पाहिजेत, तरच त्या कुंटुंबाचा आणि पर्यायाने गावाचा विकास होईल, यासाठी आबा सातत्याने प्रयत्न करत. जी मुले अभ्यासात खरोखर हुशार आहेत परंतु आर्थिक पार्श्वभूमी बेताची अशा मुलांना शिक्षणाची दारे खुली करणे, गावातील शेतकऱ्यांच्या समस्या व त्या सोडण्यासाठी विविध शेतीविषयक चर्चासत्रांचे आयोजन, दलित लोकांच्या समस्या सोडवणे अशा गावांतील प्रत्येक गरजू लोकांसाठी आबा अहोरात्र धडपडत असतात.

**आबांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य –**

बी. ए. (राज्यशास्त्र) पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांची १७ जून १९६६ रोजी हायस्कूल, कुंडल येथे माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक झाली. या काळात क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या प्रेरणेने गांधी एज्युकेशन सोसायटी व नाना पाटील विद्यार्थी वसतिगृहाच्या संचालक मंडळावर निवड, गांधी एज्युकेशन सोसायटीचा खजिनदार म्हणून सेवेची संधी पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक, मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती झाली. या संस्थेत काम करत असताना जी. डी. बापू लाड यांच्या प्रेरणेने कालोचित अधिक दोन स्तरांवरील किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांना गती, विद्यालयात संख्यात्मक व गुणात्मक वाढीसाठी गुणवत्ता सुधार प्रकल्प उपक्रमाची कार्यवाही, बापूंच्या प्रेरणेने शिक्षण बचाओ अभियानाअंतर्गत, प्राथमिक शिक्षणासंबंधी शासनाला सूचनांचा अहवाल सादर शिक्षणाच्या खासगीकरणाला विरोध व उत्पादक कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाच्या मागणीसाठी जागृती मोहिमेत पुढाकार घेऊन त्यात यश प्राप्त केले. आमदार प्रकाश मोहाडिकर, आमदार तात्या सुळे. टी. डी. लाड, धो. ल. थोरात, गळदगे सर यांच्या बरोबर शिक्षक लोकशाही आघाडी (टी. डी. एफ.) व विभागीय शिक्षक संघटनेच्या कार्यात पुढाकाराने सहभाग, शिक्षक व शिक्षण समस्यावर प्रबोधन व आंदोलनात विशेषत्वाने भागीदारीने सहभाग घेतला. गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक श्वेतपत्रिकेच्या विरुद्ध प्रा. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण बचाओ समितीतर्फे झालेल्या जनजागृती कार्यक्रमात व आंदोलनात हिरिरीने सहभाग घेतला. प्राथमिक व उच्च शिक्षणातील विविध शिक्षक संघटनातील, समाजवादी विचाराच्या शिक्षक व संघटनांच्या फेडरेशनचे संस्थापक व प्रमुख कार्यकर्ते म्हणून अहोरात्र काम केले. व त्यांच्या समस्यांना वाचा फोडली.

**आबांचे सामाजिक कार्य –**

लहानपणापासून आबांच्यावर शाहू, फुले, आंबेडकर, कर्मवीर भाऊराव

पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांचा विचारांचा प्रभाव होता. आपण समाज्याचे काहीतरी देणे लागतो. या विचारांनी आबांनी अनेक पुरोगामी विचाराने कार्य केली. नागराळे गावच्या सर्वांगीण विकासासाठी गावात सामाजिक व सांस्कृतिक एकात्मता वाढावी. युवकांच्या कला गुणांना संधी मिळावी. लोकरंजनातून लोकप्रबोधनाच्या उद्देशांनी गावातील युवकांनी स्थापन केलेल्या उठाठेव नाट्यमंडळात पुढाकाराने सहभाग फिर्याद व देवता या नाट्यप्रयोगात कलाकार म्हणून सहभाग घेत होते. नागराळे. गावातील युवकांनी गोर-गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन व शैक्षणिक साहित्य मदत, तसेच गावात वाचनालय सुरू करणेच्या हेतूने कर्मवीर भाऊराव पाटील विद्यार्थी संघटनेची स्थापन केली व संघटनेचे पहिले अध्यक्ष म्हणून काम केले.

आबांच्या रक्तामध्येच पुरोगामी विचार असल्यामुळे त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे नेते क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या प्रेरणेने नागराळे, तासगाव येथील सावता माळी मठात बापूंच्या मार्गदर्शनाखाली पुरोगामी विद्यार्थी संघटनेची स्थापना सन १९६४ साली केली. या संघटनेचे संस्थापक सदस्य, काही काळ जिल्हा व राज्याचे अध्यक्ष, गरीब विद्यार्थ्यांना मदत, गुणवत्ता वाढ व कष्टकरी घरातील विद्यार्थी हिताला बाधक शासकीय धोरणे बदलणेसाठी प्रबोधन, संघटन व संघर्षात सक्रिय सहभाग आणि पुढाकार होता. १९६९ सीमा भागातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना न्याय मिळावा या मागणीसाठी शे.का.प. च्या वतीने आयोजित जेल भरो आंदोलनात पुरोगामी विद्यार्थी संघटना तुकडीचे संघटन व नेतृत्व केले या आंदोलनात मुंबई ऑर्थर रोड जेलमध्ये चौदा दिवसांच्या तुरुंगवासाची शिक्षा आबांना भोगावी लागली.

नागराळे गावातील विद्यार्थी, युवकांच्या सहभागाने गावातील ग्रामविकास वाचनालयाच्या स्थापना सन १९७५ साली झाली. या वाचनालयाच्या स्थापनेत आबांचा मोठा वाटा होता. वाचनालयाला 'ब' वर्ग वाचनालय म्हणून मान्यता मिळवून वाचनालयाच्या मालकीची स्वतंत्र तीन मजली इमारत उभारण्यात पुढाकार घेतला. वाचनालयाच्या वतीने करीअर गायडन्स सेंटर व श्रीमती भागीरथी यशवंत पाटील यांच्या स्मरणार्थ २९ सप्टेंबर अंधश्रद्धा निर्मूलन संकल्प दिन व परिवर्तनवादी व्याख्यानमाला हे युवक व लोकोपयोगी उपक्रम आबांच्या सक्रिय करण्यात पुढाकाराने सुरू करण्यात आले.

नागराळे गावातील श्री भैरवनाथ ग्रामविकास सहकारी सोसायटी, सर्व पाणी पुरवठा संस्था व ग्रामपंचायतीचा कारभार पारदर्शक लोकाभिमुख व्हावा. त्यातून गावाचा व सभासदांचा विकास घडावा. म्हणून सातत्याने कोणताही अभिनिवेश न बाळगता व पंचकमिटीच्या कारभारात हस्तक्षेप न करता या सर्व संस्थांना

आवश्यक ते सहकार्य व मार्गदर्शन करण्यात आबांचा नेहमी खरीचा वाटा असतो. या साऱ्याचा परिपाक असा की नागराळे गावातील सार्वजनिक संस्थेतील कारभार पारदर्शक सुरू आहेत, तसेच ६५ वयावरील नागरिकांना शासन धोरणाप्रमाणे सोयी व सवलती उपलब्ध देण्यासाठी ज्येष्ठांना इतर देशांतील ज्येष्ठांप्रमाणे पेन्शन मिळावी हा हेतू मनात ठेवून आबांनी नागराळे गावातील ज्येष्ठ लोकांसाठी सत्यदूत ज्येष्ठ नागरिक संघटना स्थापन केली.

१४ नोव्हेंबर २०११ ला क्रांतिअग्रणी डॉ. जी. बापू लाड कालवश झाल्यानंतर शिवाजी विद्यापीठातील कार्यक्षेत्रातील विचारवंतांच्या विचारमंथनातून बापूंच्या कार्याचे खरेखुरे स्मारक व्हावे. या भूमिकेने २०१२ रोजी स्थापन झालेल्या क्रांतिअग्रणी डॉ. जी. बापू लाड फाउंडेशनच्या स्थापनेत सहभाग आणि कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी आबांच्या खांद्यावर देण्यात आली व आबांनी ती यशस्वीरीत्या पार पाडली. स्वातंत्र्य, समता आणि न्यायासाठी संघर्ष म्हणजे विद्रोह या भूमिकेने महाराष्ट्रात कार्यरत असणारे थोर विचारवंत आ. ह. साळुंखे यांच्या प्रेरणेने विद्रोही सांस्कृतिक चळवळीमध्ये सक्रिय सहभाग, तसेच सांगली, परभणी, राहुरी संमेलन संघटनात्मक कामात भागीदारी, सांगली संमेलनाला पलूस तालुक्यातून एक लाखाचा निधी व एक मूठ धान्य या उपक्रमातून दहा पोती धान्य लोकसहभागातून मिळवून दिले. राहुरी संमेलनात प्रतिसरकार आणि क्रांतिअग्रणी डॉ. जी. बापूच्या स्वातंत्र्य चळवळीवरील रथ विचार यात्रेत पुढाकाराने सहभाग घेतला.

ग्रामीण भागातील श्रमिक, कष्टकरी, प्रतिभावंत कवी लेखकांना अभिव्यक्त होण्यास संधीची गरज लक्षात घेऊन व साहित्यातील नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी किरण शिंदे यांच्या सहकार्याने समर्थ कला, क्रीडा, सांस्कृतिक मंडळ, पलूस यांच्यावतीने प्रतिवर्षी संमेलन आयोजित केले जातात त्या साहित्य संमेलनाच्या पूर्व तयारीमध्ये आबांचा सक्रिय सहभाग असतो.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती पलूस- शोषित समाजाला मंत्र, तंत्र, जादूटोणा, नवस, भूतबाधा इतर अघोरी प्रथा, खोट्या रूढी - परंपरा, चालीरीती, याद्वारे देव - धर्माच्या नावाखाली लुबाडणाऱ्या भोंदू बाबांचे पितळ उघडे पाडून समाजाला विवेकी, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन देण्यासाठी व डॉ. दाभोळकरांच्या बलिदानातून साकारलेल्या जादूटोणा विरोधी कायद्याचे प्रबोधन व अंमलबजावणीसाठी पलूस येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीची शाखा आबांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आली.

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, प्रा. डॉ. एन. डी. पाटील, आचार्य शांताराम बापू गरुड यांच्या विचाराचा व

आचाराचा वसा आणि वारसा चालविणाऱ्या कार्यशक्तीतील एक निःस्पृह कार्यकर्ता म्हणून आबांना सामाजिक मान्यता आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची –**

१. विठ्ठलनामा – व्ही. वाय. (आबा) पाटील
२. पुरोगामी सामाजिक कार्यकर्ते व्ही. वाय. (आबा) पाटील – मा. अरुण आण्णा लाड

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज : सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष

**– प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम**

**गोषवारा –**

समाजसुधारक हा समाजाची सुधारणा करणारा व्यक्ती असते. ह्या व्यक्ती स्वतःपलीकडे जाऊन विविध अंगांनी समाजाच्या विकासासाठी काम करतात. लोकांची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक स्थिती सुधारणे समाजसुधारकाचा उद्देश असतो. राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये योगदान देणारे थोर समाज सुधारक, परंपरागत समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोह करून उठणारे व महाराष्ट्रातील बहुजन समाजाला, पददलित जनतेला आणि शूद्रातिशूद्रांना आपल्या हक्क न्यायाची जाणीव करून देणारे आणि त्यांचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणारे व मानव धर्माचा स्वीकार करून सर्वांगीण समतेचा पाया घालणारे आदर्श राजा व समाजसुधारक म्हणून ओळखले जातात.

**प्रस्तावना –**

आधुनिक काळात महाराष्ट्राची जडणघडणीमध्ये कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान महत्त्वाचे आहे. एकोणिसाव्या शतकात महात्मा जोतीराव फुले यांनी समतेचे जे बीज पेरले होते, त्याला खतपाणी घालून त्याचे काळजीपूर्वक संगोपन करण्याचे काम शाहू छत्रपतींनी केले. शेकडो वर्षे जे लोक ज्ञान, सत्ता, संपत्ती यांच्यापासून वंचित राहिले होते, त्यांना स्वाभिमानाने जगता यावे, त्यांच्यासाठी शिक्षणाच्या आणि प्रगतीच्या वाटा खुल्या व्हाव्यात यासाठी शाहू महाराजांनी आयुष्यभर प्रयत्न केले. राजकीय स्वराज्य मिळविण्याच्या प्रश्नापेक्षा, सामाजिक व धार्मिक समतेच्या प्रश्नाला त्यांनी अग्रक्रम दिला. आपले संपूर्ण जीवन लोकसेवेसाठी खर्च केले.

एक समाजक्रांतिकारक राजा, भारतातील सामाजिक व आर्थिक लोकशाहीचा संस्थापक, हिंदी शास्त्रीय संगतीचा पुरस्कर्ता, मराठी रंगभूमीचा शिल्पकार, मल्लयुद्धाचा आश्रयदाता, भारतातील हरितक्रांतीचा अग्रदूत अशा अनेक भूमिका त्यानी वठविल्या.

राजर्षी शाहू महाराज हे दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर या लहानशा संस्थानाचे अधिपती होते; परंतु एक संस्थानाधिपती यापेक्षा महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे

महान नेते, हीच त्यांची खरी ओळख होय. येथील बहुजन समाजाने त्यांना आपले दैवतच मानले आहे. राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून, १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. त्यांचा जन्म कोल्हापूर येथील राजवाड्यात झाला. हे स्थळ आता विश्रामधाम (सर्किट हाउस) म्हणून ओळखले जाते. त्यांचे मूळचे नाव यशवंतराव असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब घाटगे, तर आईचे नाव राधाबाईसाहेब असे होते. जयसिंगराव घाटगे हे कागल जहागिरीचे प्रमुख होते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी यांना इंग्रजांनी वेडसर ठरवून अहमदनगर जिल्ह्यात कैदेत ठेवले होते. तेथेच त्यांचा सन १८८३ मध्ये दुर्दैवी अंत झाला. त्यांना औरसपुत्र नसल्याने त्यांच्या पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी १७ मार्च, १८८४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यातील जयसिंगराव घाटगे यांचा मुलगा यशवंतराव यास दत्तक घेतले. दत्तकविधानानंतर त्यांचे नाव शाहू असे ठेवण्यात आले. राजघराण्याच्या प्रथेनुसार शाहू महाराजांचे प्रारंभी शिक्षण खासगी शिक्षकामार्फतच झाले. पुढे ३१ डिसेंबर, १८८५ रोजी कोल्हापूरहून राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना राज्याधिकार (२ एप्रिल १८९४) प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर त्यांचा विवाह झाला (१८९१). त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई (अक्कासाहेब) व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन-यंत्रणेनची पुनर्रचना करून भास्करराव जाधव, दाजीराव विचारे, आ. ब. लठ्ठे यांसारख्या बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली. तरुण शाहूंनी धैर्याने त्यांवर मात केली. १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले.

**राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य –**

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिला होता, शिक्षण ही फक्त वरिष्ठ वर्गाचीच मक्तेदारी बनली होती. येथील बहुजन समाजाच्या मागासलेपणाचे एक महत्त्वाचे कारण त्याच्यातील शिक्षणाचा अभाव होय, ही गोष्ट शाहू महाराजांनी ओळखली. म्हणून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या कार्याला त्यांनी

अग्रक्रम दिला.

**विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती –**

बहुजन समाजातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या देऊन त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्याचे धोरण राजर्षी शाहूंनी ठेवले होते. २० मे, १९११ रोजी त्यांनी एक जाहीरनामा काढून १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारी देण्याची घोषणा केली. ही सवलत प्रथम गरीब विद्यार्थ्यांना देऊन नंतर राहिल्यास इतर विद्यार्थ्यांना द्यावी, असा आदेश त्यांनी काढला.

**सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण –**

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात उचललेले आणखी एक क्रांतिकारक पाऊल म्हणजे त्यांनी आपल्या राज्यात राबविलेली सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना होय. ८ सप्टेंबर, १९१७ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासंबंधीचा आदेश जारी केला. त्या संदर्भात आपले विचार व्यक्त करताना महाराजांनी म्हटले होते– शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत, म्हणून ३० सप्टेंबर, १९१७ पासून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना करवीर संस्थानात लागू केली. करवीर तालुक्यातील 'चिखली' या गावी सक्तीचे पण मोफत प्राथमिक शिक्षण देणारी पहिली शाळा ४ मार्च, १९१८ रोजी सुरू झाली.

**वसतिगृहांची स्थापना –**

महाराजांनी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे कोल्हापुरात निरनिराळ्या जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी केलेली वसतिगृहांची स्थापना होय. वसतिगृहे ही त्या काळातील एक महत्त्वाची गरज होती; कारण त्या काळी शिक्षणाच्या सोयी फक्त शहरातच उपलब्ध होत्या. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोक अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत होते. साहजिकच, आपल्या मुलांना शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी पाठविण्याची कुवत त्यांच्याकडे नव्हती. तेव्हा ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांचे शिक्षण मार्गी लावायचे असेल, तर शहरात त्यांच्या वास्तव्याची अल्पखर्चात व्यवस्था करणे गरजेचे आहे, ही गोष्ट शाहू महाराजांच्या लक्षात आली. म्हणून त्यांनी कोल्हापुरात वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला. शाहू महाराजांच्या निर्णयानुसार १८ एप्रिल १९०१ रोजी मराठा विद्यार्थ्यांसाठी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊसची स्थापना केली.

**मागासवर्गीयांसाठी राखीव जागा –**

२६ जुलै, १९०२ रोजी 'करवीर गॅझेट' मध्ये एक जाहीरनामा प्रसिद्ध करून

छत्रपती शाहूंनी एक क्रांतिकारक आणि भारताच्या इतिहासातील अभूतपूर्व निर्णय घेऊन आपल्या द्रष्ट्या पुरोगामित्वाचे दर्शन घडविले. या जाहीरनाम्याच्या तारखेपासून सरकारी खात्यात रिक्त होणाऱ्या जागांपैकी ५० टक्के जागांवर मागासवर्गीय सुशिक्षित तरुणांची भरती करण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले. ज्या सरकारी कार्यालयात मागासवर्गीयांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे तेथे या पुढे मागासवर्गीयांची भरती करावी, असा आदेश त्यांनी दिला.

**स्त्रीसुधारणा –**

महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज यांच्या तत्त्वज्ञानाचा जबदरस्त प्रभाव छत्रपती शाहू महाराजांवर होता. त्यामुळे त्यांनीही स्त्रीशिक्षण, स्त्री–पुरुष समानता, स्त्रीसुधारणा यादृष्टीने प्रयत्न केले. महात्मा फुले यांनी पुण्यामध्ये मुलींसाठी बालहत्याप्रतिबंधक गृह काढले. त्यांच्याकडे राजसत्ता किंवा धनसत्ता नव्हती, तरीही सनातन्यांच्या प्रखर विरोधाला तोंड देत त्यांनी आपला लढा सुरूच ठेवला. राजर्षी शाहूंकडे सत्ता व संपत्ती असल्यामुळे त्यांना हा लढा पुढे चालू ठेवता आला. सत्यशोधक चळवळीने निर्माण केलेल्या वातावरणाचा फायदा त्यांनी करून घेतला. स्त्रीशिक्षणाचे प्रयत्न तर त्यांनी केलेच, पण स्त्रीला स्वातंत्र्य दिले तरच तिच्या कर्तृत्वाला वाव मिळेल अशी भूमिका घेऊन पडदा पद्धतीचा निषेध केला. १९१७ मध्ये त्यांनी विधवाविवाहाला मान्यता देणारा कायदा पास केला. ते स्वतः आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते होते. १९१९ मध्ये स्त्रियांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध करणारा कायदा केला. १९२० मध्ये घटस्फोटाचा कायदा केला. याशिवाय देवदासींची प्रथा बंद करण्यासाठीही त्यांनी कायद्याच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या चुलत बहिणीचा विवाह १९१८ मध्ये त्यांनी धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी केला. बालविवाहांना विरोध करण्यासाठी मुलीचे विवाहयोग्य वय १४ वर्षांचे असावे, तर मुलाचे १८ वर्षांचे असावे असा दंडक त्यांनी घालून दिला. कोल्हापूर संस्थानात १२ जुलै १९१९ रोजी झालेल्या कायद्यात १८ वर्षांवरील मुलीला विवाहस्वातंत्र्य दिले गेले. ती स्वतःच्या मतानुसार विवाह करू शकेल अशी मान्यता देण्यात आली.

**राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्योद्धाराचे कार्य –**

मागासलेल्या वर्गाची उन्नती हे शाहू महाराजांनी आपले जीवितकार्य मानले होते. साहजिकच, अस्पृश्यांवरील अन्यायाचे निवारण करण्यासाठीही ते सतत प्रयत्नशील राहिले. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून १९०७ मध्ये राजर्षींनी त्यांच्यासाठी कोल्हापुरात 'मिस क्लार्क बोर्डिंग' या नावाचे एक वसतिगृह उभारले. १४ एप्रिल, १९०८ पासून या वसतिगृहाचे कामकाज प्रत्यक्षात सुरू झाले. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या

वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. अर्थात, अस्पृश्यतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी अस्पृश्यांना प्रथम आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभे राहता येईल, अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे, याची महाराजांना जाणीव होती. अस्पृश्यांना मानाने जगता यावे म्हणून शाहू महाराजांनी त्यांना सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. महार, मांग, चांभार इत्यादी जातींतील सुशिक्षित लोकांना त्यांनी वकिलीच्या सनदा दिल्या. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले. दुकाने, हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदतदेखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवणयंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले. राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली. गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्यवस्तीत चहाचे दुकान काढून दिले. अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान, चांभार यांना सरदार, अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या. अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली.

**शेतकऱ्यांच्या हिताचे कार्य –**

शाहू महाराजांचे शिक्षण ब्रिटिश अधिकारी फ्रेजर यांच्या हाताखाली झाले. पुढील शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेजमध्ये व धारवाड येथे झाले. अभ्यास व् शैक्षणिक सहलीद्वारे मिळालेले व्यवहारज्ञान यामुळे शाहूराजे यांचे व्यक्तिमत्त्व विकसित झाले होते. १८९६चा दुष्काळ व नंतर आलेली प्लेगची साथ या काळात त्यांची कसोटी लागली आणि त्याला ते पूर्णपणे उतरले. दुष्काळी कामे, तगाईवाटप, स्वस्त धान्य दुकाने, निराधार आश्रमाची स्थापना हे कार्य पाहता 'असा राजा होणे नाही' असेच प्रजेला वाटते. 'शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हिंग मिल', शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, असे उपक्रम त्यांनी आपल्या संस्थानात राबवण्यात कमालीचे यशस्वी केले. शेती, उद्योग, सहकार या क्षेत्रांत राजर्षींनी नवनवे प्रयोग केले. शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिटट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या 'या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. राजांनी त्याकाळी पाण्याचे महत्त्व लक्षात

घेऊन भविष्यात रयतेला दुष्काळाला सामोरे जावे लागणार नाही यासाठी राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषी विकासाकडे लक्ष पुरवले.

**सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व –**

राजर्षी शाहू महाराज यांची सर्वांत महत्त्वाची कामगिरी अशी की, महात्मा फुले यांच्यानंतर निष्प्राण होत चाललेल्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी संजीवनी देऊन तिच्यात नवचैतन्य निर्माण केले; त्यामुळे येथील बहुजन समाजाची आस्मिता जागृत झाली. त्यातूनच पुढे ब्राह्मणेतर चळवळीचा उगम झाला. या चळवळीला शाहू महाराजांच्या रूपाने खंबीर व प्रभावशाली नेतृत्व लाभले. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली.

**कलांना प्रोत्साहन –**

शाहूंनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. हिंदी शास्त्री संगीताचे जतन करण्याच्या हेतूने १८८३ साली कोल्हापूरमध्ये गायनसमाज स्थापन झाला होता. हैदरबक्षखाँ, भूर्जीखाँ, सूरश्री केसरबाई, गानचंद्रिका अंजनीबाई मालपेकर, भास्करराव बखले, अल्लादिया खाँ, अब्दुल करीम खाँ, रामकृष्णबुवा वझे, बालगंधर्व अशा प्रसिद्ध गायकांनी समाजाला भेट देऊन विनावेतन आपले संगीत लोकांना ऐकवले होते. १८९५ पासून शाहूंनी अल्लादिया खाँ यांना राजाश्रय दिला. पेटीवादक गोविंदराव टेंबे यांना उत्तेजन दिले. अशा अनेक गायक-गायिकांनी शाहूंच्या आश्रयाने अखिल भारतीय कीर्ती संपादन केली. राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर सहा हजारांची देणगी देऊन शाहू त्याचे आश्रयदाते झाले होते. त्याशिवाय ते वार्षिक अनुदान देत असत. प्रारंभी त्यांचे वर्ग राजाराम महाविद्यालयात भरत असत. नंतर छत्रपतींनी इमारत बांधण्यासाठी जमीन दिली. १९१८ मध्ये संस्थेने त्यावर इमारत बांधली.

बालगंधर्व व संगीतसूर्य केशवराव भोसले हे थोर कलावंत शाहूंनीच महाराष्ट्राला दिले. संगीत व नाट्यकलेच्या जोपासनेसाठी त्यांनी कोल्हापुरात भव्य पॅलेस थिएटर (केशवराव भोसले नाट्यगृह) बांधले. त्याच्या शेजारीच खुल्या नाट्यगृहाचीही सोय केली. शाहूंच्या दरबारात आबालाल रहिमानसारखा महान चित्रकार कलावंत होऊन गेला. बाबूराव पेंटर, दत्तोबा दळवी प्रभृती चित्रकारांना त्यांचे प्रोत्साहन मिळाले. मल्लविद्येच्या प्रांतात शाहूंनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे

मैदान बांधले. त्यांच्या कारकिर्दीत कोल्हापूर ही 'मल्लविद्येची पंढरी' बनली. खुद्द शाहू हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. यांशिवाय त्यांनी कोल्हापुरात साठमारी हा हत्तीचा खेळ सुरू केला. शिकार तर त्यांचा आवडीचा छंद होता. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी शिवाजी महाराजांचे चरित्र हा ग्रंथ शाहूंना अर्पण केला, तेव्हा छत्रपतींनी त्यांना एक हजार रुपये पारितोषिक दिले आणि एक हजारांच्या शिवचरित्राच्या प्रती विकत घेतल्या. सुधारक पत्राचे संपादक विनायक जोशी ह्यांना आगरकरांचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी आर्थिक मदत केली. छत्रपतींच्या सहकार्यामुळेच डॉ. आंबेडकरांनी मूकनायक पत्र सुरू केले होते. त्यांना इंग्लंडला जाण्यासाठी छत्रपतींनी अर्थसाहाय्य केले होते.

**उल्लेखनीय कार्य –**

सन १९१६ मध्ये बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली. त्यांच्या प्रेरणेने बहुजन समाजातील असंख्य कार्यकर्ते ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी पुढे आले. २७ जुलै, १९२० रोजी हुबळी येथे ब्राह्मणेतर सामाजिक परिषद भरली होती. तिचे अध्यक्षस्थान शाहू महाराजांनी भूषविले होते. ब्राह्मणेतर चळवळीच्या कार्याचा विस्तार करण्यासाठी महाराजांनी महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत दौरे काढून अनेक सभा घेतल्या आणि तिला लोकांचे समर्थन मिळवून दिले. ब्राह्मणेतर चळवळीचे लोण महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचण्यास राजर्षी शाहूंचे नेतृत्वच प्रामुख्याने कारणीभूत ठरले होते. या चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे यापुढील काळात महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनात बहुजन समाजाला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त होऊ शकले. याचे श्रेय अर्थातच राजर्षी शाहू महाराजांकडेच जाते. त्यांच्या या कार्याबद्दल बहुजन समाज त्यांचा सदैव ऋणी राहील. सर्व प्रकारचे राजवैभव हाताशी असतानादेखील त्याकडे पाठ फिरवून राजर्षी शाहूंनी बहुजन समाजाच्या हिताचा ध्यास घेतला होता आणि त्यासाठी कोणताही त्याग करण्याची तयारी त्यांनी ठेवली होती. आपल्या राज्यात गावचे दप्तर हातात असलेले वंशपरंपरागत कुलकर्णी आपल्या हाती असलेल्या सत्तेचा आणि आपल्या थोड्या–बहुत शिक्षणाचा उपयोग करून गोरगरीब शेतकऱ्यांना नाडतात, त्यांची पिळवणूक करतात व लांड्यालबाड्या करून पैसे खातात. कुलकर्णी वतन वंशपरंपरागत असल्याने ते कोणाचीही पर्वा करीत नाहीत. त्यांना कोणाचा धाक वाटत नाही; असे शाहू महाराजांना जाणवले. त्यामुळे २५ जून, १९१८ रोजी एक हुकूम काढून त्यांनी कुलकर्णी वतने रद्द केली.

**निष्कर्ष –**

१. शाहू महाराजांचा २६ जून हा जन्मदिवस महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून पाळला जातो. त्यादिवशी सार्वजनिक कार्यक्रम होतात.

२. शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने त्यांना 'राजर्षी' पदवी बहाल केली (१९१९). त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक समजले जाते.

३. रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

**संदर्भ सूची –**


१. भगत रा. तु., राजर्षी शाहू छत्रपती – जीवन व शिक्षणकार्य. कोल्हापूर: रिया पब्लिकेशन्स. २०१६.

२. जाधव नरेंद्र., महाराष्ट्रातील मानचिन्हे. पुणे: मॅजेस्टिक प्रकाशन. १९८०.

३. नाईक तु. बा., छत्रपती राजर्षी शाहू महाराज, पुणे, २००५.

४. पवार जयसिंगराव संपा., राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, २००१.

५. सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू : राजा व माणूस, पुणे, १९८४.

# व्यवस्थापनातील जागतिक गुरू– डॉ. सी. के. प्रल्हाद

**– प्रा. बबन धोंडीराम पाटील**

अत्यंत कमी जणांना खऱ्या अर्थाने मॅनेजमेंट गुरू म्हणता येईल, त्यातली काही निवडक नावे म्हणजे पीटर ड्रकर, फिलीप कोटलर आणि त्याच तोडीची असामान्य बुद्धिमत्ता आणि विचारक्षमता लाभलेले डॉ. सी. के. प्रल्हाद. हे पराकोटीचे व्यासंगी, द्रष्टे आणि खरंच ज्यांच्या अंगी गुरुस्थानी असण्याची पात्रता असावी असे हे व्यवस्थापन विषयातील तत्त्वज्ञानी होत.

दिनांक ०८ ऑगस्ट १९४१ रोजी त्यांचा जन्म तमिळनाडूमधील कोईम्बतूर या गावी झाला, तसेच त्यांचे नावही गावावरूनच कोइम्बतूर ठेवण्यात आले. लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धीचे होते. वयाच्या एकोणीसाव्या वर्षी चेन्नई मधील लोयोला महाविद्यालयातून त्यांनी भौतिकशास्त्राची पदवी प्राप्त केली आणि लगेच ते युनियन कार्बाईड या अमेरिकन कंपनीमध्ये रुजू झाले. या कंपनीमधील चार वर्षांच्या अनुभवानंतर राजीनामा देऊन पुढील उच्चशिक्षणासाठी इंडियन इंन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट म्हणजेच आय.आय.एम. अहमदाबाद येथे व्यवस्थापनशास्त्र शाखेत पदव्युत्तर अभ्यासक्रमास सुरूवात केली. या नामांकित शिक्षण संस्थेच्या प्रथम तुकडीचे ते पदवीधर स्नातक होते. आणि याच वर्षी सुवर्णपदकाचे मानकरी ठरून आपली शैक्षणिक चुणूक त्यांनी दाखवून दिली होती. पुढे त्यांनी याच शिक्षण संस्थेमध्ये ज्ञानदानाचे कार्यही केले; पण मुळातच अफाट बुद्धिमत्तेच्या या व्यक्तीने इथेच न थांबता पुढील शिक्षणासाठी देशाबाहेर जाण्याचे ठरविले आणि शिक्षकी पेशा सोडून ते अमेरिकेतील हार्वर्ड या जगविख्यात विद्यापीठामध्ये वयाच्या पस्तिशीमध्ये संशोधनकार्यासाठी निघून गेले. येथे त्यांनी बहुराष्ट्रीय व्यवस्थापन या विषयात संशोधनकार्य करून याच विषयावर अनेक शोधनिबंध सादर केले. पुढे त्यांनी १९७५ साली हार्वर्ड विद्यापीठाची अत्यंत सन्मानाची 'डॉक्टर ऑफ मॅनेजमेंट सायन्स' ही पदवी संपादन केली. आणि पुन्हा मायदेशी परत येण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान भारतातील राजकीय घडामोडी अत्यंत गतीने बदलून आणीबाणी लागू झाली. त्यामुळे पुन्हा त्यांनी आपला शिक्षकी पेशा निवडला; पण १९७७

साली आणिबाणी उठताच ते अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील रॉस महाविद्यालयात व्यवस्थापन विषयाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यानंतर मात्र त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. एकंदरच उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या कॉर्पोरेट जगतात आणि व्यवस्थापन शास्त्रातील नावीण्यपूर्ण प्रयोगासाठी अत्यंत सुयोग्य वातावरण असलेल्या अमेरिकेत त्यांच्या बुद्धिमत्तेची चुणूक दिसून आली.

'कोअर कॉम्पिटन्स' या अलीकडील काळात कंपन्यांच्यामध्ये प्रचलित झालेल्या संकल्पनेचे तेच मूळ जनक आहेत. भारतीय वंशाची ही हुशार व्यक्ती अमेरिकेतील नावाजलेल्या महाविद्यालयात व्यावसायिक व्यूहरचना या विषयाची प्राध्यापक म्हणून कार्य करू लागले. त्यानंतर त्यांनी हार्वर्डबिझनेस रिव्ह्यू या प्रतिष्ठित नियतकालिकात अनेक लेख आणि शोधनिबंध लिहित राहिले. कोअर कॉम्पिटन्स या विषयावर भरपूर लिखाण केले. आणि व्यवस्थापन जगतातील विविध ठिकाणी प्रकाशझोतात आले. व्यवस्थापन ही विद्याशाखा शास्त्र आणि कला या दोघांच्याही मध्यस्थानी असल्याचे त्यांच्यामुळेच आणखी गडदपणे नमूद झाले.

या सर्व विषयांच्या बाहेर जाऊन कागदोपत्री असणाऱ्या संकल्पना प्रत्यक्षात कशा उतरतील याविषयी त्यांनी कार्य चालू केले आणि यामधूनच अर्थशास्त्र, सांख्यिकी, आणि मानसशास्त्र या सर्वांचा अनोखा संगम करून व्यवस्थापनातील समाजोपयोगी संकल्पना त्यांनी जगासमोर सादर केल्या.

प्राबल्याचे तर्कशास्त्र आणि सह-सृजन या आणखी दोन नवीन संकल्पना त्यांनी बाजारपेठेला व्यवस्थित समजावून सांगितल्या. आणि आता मात्र व्यवस्थापन जगताला त्यांच्या संशोधनाला चांगल्या पद्धतीने विचारात घेणे भागच पाडले. व्यापार आणि उदिम जगतातील लोक त्यांचे लिखाण गांभीर्याने घेऊ लागले होते. अनेक व्याख्यानांमधून त्यांनी आपले विचार शांतपणे आणि तितक्याच परखडपणे मांडून अनेक सिद्धांत आणि नव्या विचारांची देणगी त्यांनी व्यावसायिक जगताला दिली. ८० आणि ९० च्या दशकात अमेरिकेतील आणि अमेरिकेबाहेरसुद्धा व्यवस्थापनशास्त्रातील गुरू अशी ख्याती प्राप्त केली.

नंतर त्यांनी पिरॅमिडच्या बॉटममध्ये कशा पद्धतीने संधी लपली आहे याविषयी एक विचार मांडला. तो विचार खूपच मोठ्या प्रमाणामध्ये चर्चिला गेला तसेच कितीतरी कंपन्यांनी प्रत्यक्षात त्यांचा हा विचार अमलात आणून जनसेवेबरोबरच नफासुद्धा कमिवता येतो हे सिद्ध केले.

दि फॉर्च्यून अॅट दि बॉटम ऑफ पिरॅमिड या त्यांच्या विचारांमध्ये डॉ. सी. के. प्रल्हाद सांगतात झोपडी, वाडी आणि वस्तीमध्ये जगातील मोठ्या प्रमाणात लोकसंख्या राहत असते. त्यांना अंघोळीचे साबण, सॅनिटरी पॅड्स, कपडे धुण्याचे

साबण, जेवणाचे प्रश्न, कुपोषणाचे प्रश्न त्यांच्या प्राथमिक शिक्षणाचे प्रश्न असे अगदी साधे पण त्यांच्यापर्यंत न पोहोचलेल्या बाबींबद्दल त्या काळात कोणही अवाक्षर काढत नसताना त्यांनी परखडपणे स्वत:चे मत व्यक्त केले. या गटातील लोकांना वस्तू स्वस्तात देऊनही व्यवसायांना नफासुद्धा मिळवून देईल एवढी लोकसंख्या उपलब्ध आहे. त्यांच्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे निक्षून सांगितले आणि त्याचा परिणामसुद्धा कंपन्याच्या विचारसरणीतील बदलामध्ये होऊ लागला. अनेक कंपन्या आता गरिबांना परवडेल अशा छोट्या डब्यांमध्ये, पाउचमध्ये आणि कमी किंमत आकारून पण जास्तीत जास्त नगांचे उत्पादन घेऊ लागल्या. याचा परिणाम असा झाला की जागतिक दर्जाच्या कंपन्या गरिबांचा विचार करू लागल्या आणि गरीब आणि श्रीमंतांच्यामध्ये एक खूप मोठी सामाजिक दरी निर्माण झालेली होती ती काही प्रमाणात कमी करण्याचे श्रेय सी. के. प्रल्हाद यांच्याकडून कोणीच हिरावून घेऊ शकत नाही. पिरॅमिडचा बॉटम म्हणजेच जगातील त्या वेळची ४०० कोटी लोकसंख्या एवढी मोठी बाजारपेठ पहिल्यांदाच जगासाठी समोर येत होती. यामुळे लोकांचे राहणीमान उंचावण्यास मदत झाली. मोफत नाही पण वाजवी किंमतींमध्ये वस्तू पुरवठ्यांमुळे कंपन्यासुद्धा नफ्यामध्ये राहिल्या. जेवढे जास्त उत्पादन त्याच प्रमाणात कमी होत जाणारे उत्पादनखर्चाचे प्रमाण हा अर्थशास्त्राचा नियम त्यांनी पाया म्हणून वापरलेला पाहवयास मिळाला. प्रत्येक विकल्या जाणाऱ्या दर वस्तूमागील नफा कमी असला तरी उत्पादनाच्या संख्यंचे प्रमाण हे प्रचंड असल्यामुळे व्यवसायांना मोठा नफा होऊ लागला. तसेच केलेल्या गुंतवणुकीवरचा मोबदला लवकरात लवकर आणि पुरेपूर अशी ती सगळी एकंदर प्रक्रिया घडू लागली. म्हणजेच एकीकडे या अतिनिम्न स्तरातील जनतेचे जीवनमान आणि त्यांचे आयुष्मान सुधारले आणि दुसरीकडे उद्योगपती आणि त्यांचे व्यवसाय तोट्यात न येता मोठ्या प्रमाणात नफा कमवू लागल्या. परिणामत: अशा कंपन्यांचेही आयुर्मान वाढू लागले. वरवर पाहता साधीसोपी वाटणारी संकल्पना परंतु ज्या वेळी व्यावसायिक हे फक्त नफ्याचाच विचार करत होते त्यावेळी त्यांनी व्यावसायिकता जपत समाजसेवा कशी करता येऊ शकते याविषयीचे डॉ. सी. के. प्रल्हाद यांचे विचार एकूणच व्यवस्थापनशास्त्राला अंतरबाह्य बदलून टाकणारे होते. ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणण्यामागे प्रचंड मेहनत लागणार, मोठी जोखीम पत्करावी लागणार हे माहीत असूनही त्यांनी सखोल अभ्यास आणि संशोधन करून ते प्रत्यक्षात समाजामध्ये रुजविण्याचा वाखाणण्याजोगा आणि यशस्वी असा प्रयोग केला. याच्या आधारे त्यांनी टाटा कंपनी, प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल, युनिलिव्हर, आय.टी.सी. अशा अनेक कंपन्यांना वस्तू बाजारात आणण्यास भाग पाडून प्रसंगी अनेक कंपन्यांवरती सल्लागार म्हणून

कार्य करून ही गरिबांसाठीची संकल्पना सत्यात उतरविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. आज बँकांच्यामध्ये 'मायक्रोक्रेडिट' नावाची जी संकल्पना वापरली जाते. तसेच 'फायनान्सियल इन्क्लुजन' अशा संकल्पनांना एक चांगला पाया उभारणी करून देण्याचे श्रेय डॉ. सी. के. प्रल्हाद यांनाच द्यावे लागेल.

भारत सरकारनेही त्यांच्या या कार्याची दखल घेऊन २००९ साली पद्मभूषण या पुरस्काराने त्यांचा यथोचित सत्कार केला आणि त्यांच्या या योगदानास पोहोच देण्याचा एक प्रयत्न केलेला दिसतो. याच बरोबर त्यांना जागतिक दर्जाचेसुद्धा अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. १६ एप्रिल २०१० रोजी अशा या महान व्यक्तीचे निधन झाले.

# सावित्रीबाई फुले व समाज परिवर्तन

**– प्रा. सागर रामराव कुंडले**

**प्रस्तावना –**

सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव या छोट्याशा गावात खंडोजी व लक्ष्मीबाई नेवासे पाटील या दाम्पत्याच्या पोटी जन्माला आलेल्या या स्त्रीरत्नाने स्त्रीशक्तीचे व्यापक रूपच स्वकर्तृत्वाने समाजाला दाखवून दिले. तत्कालीन समाजाच्या प्रथेप्रमाणे वयाच्या ९ व्या वर्षीच त्या जोतीरावांशी विवाहबद्ध झाल्या. सासरचे प्रेमळ वातावरण व मिशनरी लोकांच्या सहवासाने प्रगत झालेला सामाजिक दृष्टिकोन त्यांना तिथे लाभला. सासरच्या विचारी व संस्कारी वातावरणात सावित्रीबाईचे व्यक्तिमत्त्व घडले. जोतीरावांच्या सामाजिक बंडखोरीच्या विचारांनी त्यांचे मन प्रगल्भ बनत गेले. जोतीरावांप्रमाणेच सगुणाबाई क्षीरसागर व फातिमा शेख यांच्या विचारांचाही सावित्रीबाईंच्या मनावर खोल ठसा उमटला आहे.

**सावित्रीबाईंचे सामाजिक क्षेत्रातील योगदान –**

सावित्रीबाईंचा सारा जीवनपट म्हणजे जोतीरावांबरोबरचा काटेरी वाटेवरील प्रवास. सावित्रीबाई ह्या जोतीरावांसारख्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाच्या सहचारिणी होत्या. एका वादळी, झुंजार माणसाची साथ त्यांना करावयाची होती. जोतीराव म्हणजे साक्षात झंजावात, गतार्थ रुढी परंपरेविरुद्ध सततची भांडणे, संघर्ष ... त्यातील धग जाणवायची ती सावित्रीबाईंना ती धग सोसून जोतीरावांच्या नियोजित कार्यात कृतिशिलतेने सहभागी होणे सामान्य काम नव्हते, पण असामान्य धैर्याच्या सावित्रीबाईंनी ते समर्थपणे पेलले.

महात्मा फुल्यांनी परिवर्तनाचे विचार केवळ बोलून दाखविले नाही तर सामाजिक गुलामगिरी विरोधात त्यांनी रणशिंग फुंकले व क्रांतिज्योत पेटवली. परंपरागत बुरसटलेल्या, रोगट विचारांवर घाव घालून ते मुळासकट उपटून काढण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्वातंत्र्य, समतेचा त्यांनी पुरस्कार केला. चातुर्वर्णावर टीकास्त्र सोडले. या सगळ्या विचारांचा व कृतीचा परिणाम सावित्रीबाईंवरही झाला होता. जोतीरावांचे क्रांतिकारक धगधगते विचार पेलणे ते जाणतेपणी स्वीकारणे आणि अत्यंत प्रामाणिकपणे त्या विचारांची अंमलबजावणी करणे, हे अत्यंत जिकीरीचे काम सावित्रीबाईंनी ते निष्ठेने केले. त्यांच्यातील

स्वयंप्रज्ञा, प्रेरणा अतिशय बळकट विचारांवर अधिष्ठित होती. सावित्रीबाई या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची स्त्री होती. केवळ नवरा डॉक्टर म्हणून बायको डॉक्टरीण अशी नामधारी भूमिका त्यांची कधीच नव्हती. त्या जोतीरावांची प्रतिछाया म्हणून कधीच वावरल्या नाहीत. समाजात चातुर्वर्ण्याची पोलादी चौकट भरभक्कम असणाऱ्या त्या काळात आपल्या स्नेहार्द स्वभावामुळे त्यांनी अनेक दलितांना प्रेम दिले, अनाथ बालकांना आधार दिला. ती त्यांच्या अतुलनीय धैर्याची पावतीच होय. सावित्रीबाई व जोतीराव ही स्वतंत्र प्रस्फुरणे होती.

समाज अशा विपण्णावस्थेच्या काळात असतानाच १८१८ मध्ये उच्चवर्णीयांची जुलमी सत्ता उलटवून टाकत उलथून टाकत इंग्रजांनी आक्रमण केले. पेशवाई बुडाली व इंग्रजांचा युनियन जॅक शनिवारवाड्यावर फडकू लागला. स्वतःच्या राजसत्तेपेक्षा ही राजवट बरी, असे उद्गार सामान्य माणसे पुढे काढू लागली. यावरून उच्चवर्णीयांनी किती भयप्रद व माणुसकीशून्य वर्तन जनतेशी केले असावे याची कल्पना येते. सावित्रीबाईंनी 'बावनकशी सुबोधरत्नाकर' या काव्य ग्रंथात पेशवाईतील समाजस्थितीचे व स्त्रीदास्याचे अचूक वर्णन केले आहे. त्यात त्या म्हणतात–

'पुढे पेशवाई तिने राज्य केले, अनाचार की अतिशूद्र भ्याले
स्वथुंकी थुंकाया मडके गळी ते, खुणा पुसाया ढुंगणी झाप होते
तुला बोलवी भाजी शौरी धनी ग, स्वप्नीस धाडे निलाजरा पती ग
अशा ब्राह्मणीला छळे स्त्रैणशाही, मुखा बोलती त्या नको पेशवाई'

यावरून समाजात त्याकाळी किती अन्याय, अत्याचार व नीतिमत्ताशून्य आचरण घडत असेल याची कल्पना येते. जोतिराव व सावित्रीबाई फुले यांनी किती प्रतिकूल व भयप्रद परिस्थितीमध्ये समाज परिवर्तनासाठी शैक्षणिक कार्यास आरंभ केला, हे लक्षात घेतले म्हणजे त्यांच्या क्रांतिकार्याची कल्पना येते. ज्या काळात स्त्रीशूद्रांनी शिक्षण घेणे हे धर्मबाह्य व निषिद्ध मानले जाई, तेथे एका बहुजन समाजातील माळ्याच्या बायकोने शिक्षिका होणे, हे पुण्यासारख्या धर्म मार्तंडाच्या व भूदेवांच्या व सनातन्यांच्या नगरीत आव्हानच होते. पुरुषांपेक्षा स्त्रियांना शिक्षणात अग्रक्रम दिला पाहिजे, हे सांगणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय राष्ट्रीय व तत्त्वचिंतक होत. शिक्षणाचे व्यवहारात उपयोजन झाले पाहिजे यावर त्यांचा भर होता. सावित्रीबाईंनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये घराबाहेर पडून जे सामाजिक व शैक्षणिक कार्य जिद्दीने, कौशल्याने व तळमळीने केले, त्याला ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. प्रतिगाम्यांचा प्रखर विरोध होत असताना त्यांच्याविषयी कुठलीही द्वेषभावना या दांपत्यांनी दाखवली नाही, त्यांच्या या भूमिकेचा व परिवर्तन पर्वाचा सर्वाधिक फायदा उच्चवर्णीयांच्याच

मुलांनी – विशेषत: मुलींनी अधिक घेतला हे इतिहासावरून दिसून येते.

स्त्री शूद्रातिशूद्राची पहिली शैक्षणिक चळवळ सुरू केल्याबद्दल एका अनामिक समकालीनाने दिनांक २५ मार्च १८५३ रोजीच्या 'द पूना ऑब्झर्व्हर अँड डेक्कन विकली'मध्ये काढलेले उद्गार द्रष्टेपणाचे ठरले आहेत. 'हे काम म्हणजे हिंदू संस्कृतीच्या इतिहासातील एका नव्या युगाचा आरंभ होय.' हे उद्गार आज तंतोतंत खरे ठरले आहेत. उन्नतीच्या वाटा ज्यांच्याकरिता अवघड व अशक्यप्राय होत्या त्यांच्याकरिता ज्ञानाचे दालन उघडून समाजोन्नतीला त्यांनी गतिमान केले.

सावित्रीबाईंनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेली कामगिरी ही समाज परिवर्तनाकरिता अत्यंत उपयुक्त ठरली होती. जोतिरावांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे सावित्रीबाईंना एक डोळस दृष्टी लाभली होती. ज्ञानसाधनेची एक पिपासू वृत्ती त्यांच्यात संक्रमित झाली होती. पाश्चात्य विद्येमुळे भारताला बुद्धिप्रामाण्याची देणगी मिळाली. त्यापूर्वी येथे ग्रंथप्रामाण्य, शब्दप्रामाण्य व रुढीप्रामाण्याचे युग होते.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या इतर सहकारी मित्रांच्या सोबतीने पुण्यातील भिडे वाड्यात त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंना नेमले व भारतातील पहिली स्त्रीशिक्षिका सावित्रीबाईंच्या रूपाने उभी राहिली. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीसाठी मनोविकास आणि नीती धैर्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे आवश्यक असते, असे सावित्रीबाईंचे मत होते. सर्व स्तरांवरील मुला-मुलींना सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. हे या दांपत्याने ओळखले होते. शिक्षणाचा प्रारंभ ही त्यांच्या परिवर्तन पर्वातील महत्त्वाची घटना होय.

त्या काळात प्रथा परंपरांच्या वरवंट्याखाली पिचून गेलेल्या उच्चवर्णीयांच्या विधवा स्त्रिया कुठल्या ना कुठल्या आमिषाला व अत्याचाराला बळी पडत. पोटच्या गोळ्याला नष्ट करण्याचा प्रयत्न करीत. ही बाब सहृदयी अंत:करणाच्या फुले दांपत्याच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना केली. कुठल्याही अडल्या- नडल्या स्त्रियांनी येऊन बाळंतपण उरकून घ्यावे, अशी जाहीर सूचना फुल्यांनी प्रसिद्ध केली आणि सावित्रीबाईंनी मायेच्या मदतीने सुमारे ३५ ब्राह्मण स्त्रियांची बाळंतपणे केली. मुलांचे संगोपनही केले. अशाच एका पडलेल्या काशीबाई या विधवा स्त्रीचे बाळंतपण त्यांनी केले व तिच्या यशवंत नावाच्या मुलास दत्तक घेतले.

दुष्काळग्रस्तांसाठी 'अन्नछत्र' चालवले. यशवंत राधा यांच्यामध्ये 'पहिला आंतरजातीय मिश्र विवाह' १८८९ मध्ये घडवून आणला. बजूबाई ग्यानोबा निंबणकर यांची कन्या राधा आणि सीताराम आल्हाट यांचा ऐतिहासिक असा 'पहिला सत्यशोधकीय विवाह' २५ डिसेंबर १८७३ रोजी सावित्रीबाईंनी स्वखर्चाने

घडवून आणला. खेड्यापाड्यातून शहरात शिकायला आलेल्या गरजू मुलांसाठी सावित्रीबाईंनी एक 'वसतिगृह' सुरू केले व महात्मा फुल्यांच्या निधनानंतर त्यांच्या भाऊबंधांना न घाबरता त्यांनी ती टीटवी हाती धरले व स्वतःच जोतिरावांच्या प्रेताला मुखाग्नी दिला. स्त्रीने प्रेताला अग्नी देण्याची भारताच्या इतिहासातील ही क्रांतिकारक घटना होय. सावित्री आणि जोतिराव यांचे जीवनच धगधगत्या अग्नीकुंडासारखे होते.

सामाजिक राजकीय व शैक्षणिक परिवर्तनासाठी क्रांतीची आवश्यकता असते क्रांतीमध्ये आमूलाग्र व्यवस्था परिवर्तनाची ताकद असते. सर्व जगाच्या इतिहासात १८४८ हे वर्ष महान क्रांतिकारक वर्ष ठरले आहे. कार्ल मार्क्स यांनी याच वर्षी 'क्मुनिस्टांचा जाहीरनामा' हा ऐतिहासिक महत्त्वाचा प्रबंध प्रसिद्ध केला. अमेरिकेत स्त्रियांच्या उद्धाराची चळवळ याच वर्षी न्यूयॉर्क येथील वेल्सीयम चर्च येथे सुरू झाली. फ्रान्समध्ये मानवी हक्कासाठी क्रांती, इंग्लंडमध्ये स्त्रीस्वातंत्र्याची मागणी व भारतात जोतिराव व सावित्रीबाई यांचे शिक्षणाचे युगप्रवर्तन कार्य, या युगप्रवर्तक महत्त्वाच्या घटना होत. क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी केलेली केलेले कार्य समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे व नवनिर्माणाचे होते. सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक अशा अनेक गोष्टींचा प्रारंभ त्यांनी केला. गतानुगतिक अंधारात खितपत पडलेल्या व चाचपडणाऱ्या समाजाला आवश्यक अशा अनेक गोष्टींचा प्रारंभ त्यांनी केला. प्रवाहाचा विरोधात जाऊन परखडपणे आपली मते मांडण्याचे व त्याप्रमाणे समाजाला वळण देण्याचे कार्य उभयतांनी केले. नवसमाजाच्या घडणीत त्यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

**निष्कर्ष –**

१. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या.
२. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा दिवस 'बालिका दिन' म्हणून साजरा केला जातो.
३. १० मार्च १९९८ रोजी भारत सरकारने सावित्रीबाई यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचे महत्त्व अधोरेखित करीत दोन रुपयांचे टपाल तिकीट मुद्रित केले.
४. सावित्रीबाई फुले यांचे कार्य महान होते म्हणूनच त्यांना 'क्रांतिज्योती' म्हणून संबोधिले जाते.

**संदर्भ सूची –**

१. प्रेमा गोरे, थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले, द्वितीयावृत्ती, १९८९ श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३ पृ.१०

२. सावित्रीबाई फुले, काव्यफुले, सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, 'पेशवाई' पृ.८४
३. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्व, संपा. डॉ. मा. गो.माळी, म.रा. साहित्य संस्कृती मंडळ. मुंबई, प्रथमावृत्ती मार्च १९९८ पृ.४२.
४. पु. ग. सहस्रबुद्धे, महाराष्ट्र संस्कृती, पृ.६५२.
५. उनि., डॉ. मा. गो. माळी पृष्ठ ४३

# महात्मा जोतीराव फुले : कृतिशील समाजसुधारक

– प्रा. दिलीप महादू कोने

**गोषवारा –**

महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेताना अगदी स्पष्टपणे दिसते की, सामाजिक धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रांतील अमूलाग्र परिवर्तनासाठी त्यांनी आयुष्यभर निकराचा लढा दिलेला आहे. बुद्धिप्रामाण्यवादी व इहवादी दृष्टिकोनातून आपले समाजकार्य व साहित्यलेखन करताना विवेकवादी, तर्कशुद्धतेला त्यांनी अधिक प्राधान्य दिले आहे. विवेकवादी तर्कशुद्धतेच्या जोरावरच धार्मिकतेच्या नावाखाली लुबाडणूक करणाऱ्या स्वार्थी पुरोहितशाहीचा ते पर्दापाश करतात. चातुर्वर्ण्य, जातिभेद, स्त्रीदास्य व अस्पृश्यता यांसारख्या विषमताप्रवण गोष्टींचा धर्माशी काहीही संबंध नाही, असा एकंदर विचार ते मांडतात. मानवी समतेच्या आड येणाऱ्या कोणत्याही गोष्टींना ते आपले लक्ष बनवितात. समता, न्याय, बंधुता, नीती, सदाचार, सहिष्णुता, आत्मपरीक्षण, शिक्षण यांसारख्या मानवी मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी ते आपले जीवनकार्य समर्पित करतात.

महात्मा फुले हे महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्युथर' आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये योगदान देणारे थोर समाजसुधारक, परंपरागत समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोह करून उठणारे व महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे पहिले समाजसुधारक, महाराष्ट्रातील बहुजन समाजाला, पददलित जनतेला आणि शूद्रातिशूद्रांना हजारो वर्षाच्या गुलामगिरींच्या निद्रेतून जागे करून त्यांना आपल्या हक्क व न्यायाची जाणीव करून देण्याचा आणि त्यांचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी जिवाचे रान करणारे व मानवधर्माचा स्वीकार करून सर्वांगीण समतेचा पाया घालणारा, महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक म्हणून महात्मा फुले यांचे नाव अग्रस्थानी दिसू येते. फुले हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते.

**प्रास्ताविक –**

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. त्यांच्या पूर्वजांचे मूळ गाव हे सातारा जिल्ह्याती कटगुण हे होते. आणि त्यांचे मूळ अडनाव 'गोऱ्हे' होते. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंद आणि आईचे नाव चिमणाबाई

त्यांचा व्यवसाय हा फुलांचा असल्यामुळे त्यांचे आडनाव हे 'फुले' पडले. अवघ्या नऊ महिन्यांचे असताना ज्योतिरावांच्या आईचे निधन झाले. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांचा सावित्रीबाई यांच्याशी विवाह झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सरकारी नोकरीचा विचार न करता समाजातील दीनदुबळ्यांच्या उद्धारासाठी त्यांनी लोकसेवेला आपले संपूर्ण जीवन वाहून घेतले. त्यांनी अनेक ग्रंथनिर्मिती केली 'सत्यशोधक समाज' नावाची संस्था स्थापन केली. महात्मा फुले यांचे ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, सार्वजनिक सत्यधर्म इ. ग्रंथ प्रसिद्ध आणि महत्त्वपूर्ण आहेत. शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवत पुरोगामी विचाराची मांडणी केली. महाराष्ट्रातील जनतेने त्यांना 'महात्मा' ही उपाधी बहाल केली.

महात्मा फुले यांच्या व्यक्तिमत्त्वावर चार्वाक, बुद्ध, कबीर, तुकाराम, दादोबा पांडुरंग या देशी विचारवंत समाजसुधारकांबरोबरच, थॉमस पेन, मार्टिन ल्युथर, रेमिचल, डॉ. स्टिव्हनसन, डॉ. विल्यम इत्यादी पाश्चात्त्य विचारवंताच्या कार्याचा प्रभाव दिसतो. थॉमस पेन यांच्या The Rights of Man या ग्रंथाचा खूप मोठा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर दिसतो. मानवी हक्क व प्रतिष्ठेसाठी लढण्याचे बळ त्यांना या ग्रंथामुळेच मिळाले. त्यातील पेन यांचे धर्मचिंतन त्यांना विशेष भावले. पेनने केलेल्या धर्मचिंतनामध्ये त्यांना खऱ्या अर्थाने मानवी कल्याणाचे व समतेचे तत्त्व दिसले. महात्मा फुलेंच्या 'सार्वजनिक, सत्यधर्म', 'गुलामगिरी', 'अखंडादी' काव्यरचनांमधील विचार चिंतनावर, पेनच्या विचारांचा खोलवर झालेला प्रभाव दिसतो.

**प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश हा पुढीलप्रमाणे–**

१) महात्मा फुले यांच्या समाजसुधारणेचे कार्य समजून घेणे.
२) महात्मा जोतिबा यांचे जीवनकार्य स्पष्ट करणे.
३) महात्मा फुले यांचे विचार आजच्या काळाची गरज आहे, हे स्पष्ट करणे.
४) मिळालेल्या तथ्याच्या आधारे निष्कर्ष मांडणे.

**प्रस्तुत शोधनिबंधाचे गृहीतके हे पुढीलप्रमाणे –**

१) महात्मा जोतिबा फुले हे थोर समाजसुधारक होते.
२) भारतातील परंपरागत समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोह करून उठणारे पहिले समाजसुधारक.
३) जोतीबा फुले यांनी महाराष्ट्राच्या समाजकारणाला आणि सामाजिक चळवळीला वेगळी दिशा दिली.
४) महात्मा फुले यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान दिले.

**तथ्य संकलन –**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्याचा आधार घेण्यात आला महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्याचा आढावा घेतल्याशिवाय आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास लिहिला जाऊ शकत नाही. ज्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजकार्यासाठी वाहून घेतले, त्यांच्या कार्याचा धावता आढावा पुढीलप्रमाणे घेण्याचा प्रयत्न केला. स्त्रीउद्धाराचे कार्य वाईट प्रथा परंपरेच्या बेड्यांमध्ये बंदिस्त असलेल्या स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य महात्मा जोतिबा फुले यांनी हाती घेतले. स्त्रियांचा उद्धार करायचा असेल तर त्यांना शिक्षण देणे आवश्यक आहे. हे त्यांनी ओळखले आणि स्त्रीशिक्षणाचे कार्य त्यांनी प्रथम हाती घेतले. समाजातील सनातनी मंडळीचा विरोध पत्करून महात्मा फुले यांनी १ ऑगस्ट १८४८ मध्ये पुण्याच्या बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. स्वतंत्रपणे मुलीसाठी शाळा काढणारे ते पहिले भारतीय होते. स्त्रीशिक्षणाची सुरुवात फुले यांनी स्वतःच्या पत्नीपासून केली सावित्रीबाईला शिकविले आणि पहिली महिला शिक्षिका निर्माण केली. मुलीच्या शाळेच्या विकासासाठी युरोपियन व्यक्तीने फुल्यांना मदत केली. मात्र भारतीय सनातनी यांनी त्यांना आतोनात त्रास दिला. या काळामध्ये बालविवाह, जरठकुमारी विवाह मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे विधवांची संख्या ही अधिक होती. विधवांची समाजातील दयनीय अवस्था पाहून फुले यांना विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. स्वतः पुढाकार घेऊन विधवा पुनर्विवाह घडवून आणले. बालहत्या थांबविण्यासाठी त्यांनी आपल्या घरी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. या ठिकाणी कुमारी माता आणि विधवा स्त्रिया गुप्तपणे येऊन बाळंत होऊन मुलांना ठेवत असे. अशाच मुलांची जबाबदारी सांभाळणाऱ्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचा मुलगा यशवंत याला फुले यांनी दत्तक घेतले व शिकवून डॉक्टर बनविले. केशवपन प्रथेला त्यांनी विरोध केला. सावित्रीबाई यांनी पुढाकार घेऊन न्हाव्याचा संप घडवून आणला होता.

